हें पुस्तक बडोदें येथें लुहाणामित्र स्टीम प्रिन्टींग प्रेसमध्यें विठ्ठलभाई आशाराम यांनीं तारीख ८ माहे नोव्हेंबर सन १९२० इसवीं रोजीं प्रकाशकातर्फे छापून प्रसिद्ध केलें.

दोन शब्द.

प्रयोजनमनुद्दिश्य मन्दोऽपि न प्रवर्तते । 'प्रयोजना शिवाय मंद पुरुष देखील प्रवृत्ति करीत नाहीं' ही एक सामान्य लोकोक्ति आहे. तेव्हां हें 'ब्रह्मचर्यदिग्दर्शन' लिहिण्यांत सुद्धां कांहीं तरी खास कारण असलें पाहिजे हें उघड सिद्ध होतें. तें कारण दाखविण्यासाठींच—जरी या ल्हानशा पुस्तकाला भूमिकेची जरुरी नाहीं तरी—कांहीं थोडीशी प्रस्तावना लिहिण्याचें जरूर वाटल्यावरून दोन शब्द लिहिण्यांत येत आहेत.

एका कवीची खालील उक्ति दरेकाच्या जवळ जवळ पाठांतरांतच असेल कीं:—

> शरीरें सुखी तो सुखी सर्व रीन ॥
> शरीरें दुःखी तो दुःखी दीन गणें ॥

गोष्ट अगदीं खरी आहे कीं—शरीराच्या स्वास्थ्यांतच सर्व सुखाचा समावेश आहे. करोडो रुपयांची संपत्ति—विपुल लक्ष्मी हत्ती, घोडे, बागबगीचे, गाड्या, रथ आदि करून सर्व प्रकारचें वैभव असून देखील जर तो इसम शरीरानें सुखी नाहीं तर त्याला आपल्या वैभवापासून काडी इतका देखील फायदा नाहीं. त्याला त्या वैभव सुखाचा आनंद अनुभविता येत नाहीं. याप्रमाणें

धर्मपालनाच्या सर्व किंवा दुसरे देखील शरीर स्वास्थ्याची फार आवश्यकता आहे. एतद्विषयीं महाकवि कालिदासानें देखील असेंच म्हटलें आहे कीं —शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्. ! म्हणून मनुष्याला सर्वांच्या अगोदर शरीरानें सुदृढ असलेंच पाहिजे. परंतु अशा तऱ्हेनें शरीरानें सुखी माणसें या संसारात फार थोडीं दृष्टीस पडतात. शरीरानें सुदृढ शरीराच्या स्थूलपणावर—आकारावर—अवलंबून नाहीं तसेंच तें शरीराच्या कृशपणावर—सडपातळपणावर—देखील अवलंबून नाहीं. परंतु शरीरानें सुदृढ शरीरांत ओतप्रोत भरून राहिलेल्या शक्तिमध्यें आहे. ज्याची शरीरांतील शक्ति मोठी, मजबूत आणि दृढ असा तो मनुष्य वास्तविक शरीरानें सुखी आहे असें म्हणता येईल. आणि असा मजबूत आणि शक्तिवान मनुष्य, आपल्या मनोबळाचा एवढा विकास करूं शकतो कीं, एखादे वेळीं अनेक हत्यारबंद मनुष्यांच्या बरोबर दोन हात करण्याचा प्रसंग आल्यास, तो माघार घेत नाहीं इतकेंच नाहीं तर आपल्या एका डुरकणीनें—मोठ्या आवाजानें—तो पुष्कळ माणसांना हालवून सोडण्याला सामर्थ्यवान होतो. त्याच्या नुसत्या आरोळीनेंच मनुष्यें भयभीत होतात. खरोखर ज्यांच्या ठिकाणीं, शरीरबळ, मनोबळ आणि वाग्बळ ह्या तीन शक्ति असतात तो मनुष्य वाटेल तें कठीण कार्य जरी करावयाला लागला तरी त्यांत त्याला अपयश येत नाहीं. या सर्व बळांचा मूळ पाया शरीरबळांत आहे. या सर्व बळांचें मूळ शरीरबळ

आहे आणि शरीर बळ हें अमुक प्रकारचा माउ मनाला किंवा मालमगीच्यांची हवा खाण्यानें प्राप्त होत नाहीं. तें फक्त एक ब्रह्मचर्यव्रताच्या पालनानेंच प्राप्त होतें. ब्रह्मचर्य म्हणजे वीर्य रक्षण. कोरडी भाकरी आणि ताक अथवा चटणी खाणाऱ्या पण ब्रह्मचर्यव्रत पाळणाऱ्या इसमाच्या ठिकाणीं आपण इतकें शारीरबळ पाहतों कीं नित्य रोज शिरा पुरी खाणाऱ्या, केशरी दूध पिणाऱ्या, व राजमहाला सारख्या इमारतींत ऐष आराम करणाऱ्या–पण वीर्याचें रक्षण न करणाऱ्या–माणसांचें ठिकाणीं–त्याच्या नखाला ये नाहीं. असे ऐष आराम करणारे पण ब्रह्मचर्य न पाळणार चार पांच इसम एखाद्या जंगलांतून चालले असतांना त्यांना प्रमथवशात त्या जंगलांत जर एखादा भील मिळाला तर दूरून पाहताक्षणींच त्यांनी पाचावर धारण बसते. 'अरे रे ! हाय हाय ! हा चोर तर नसेल ना ! तो आम्हाला लुटणार तर नाहींना ! अशा तऱ्हेची भीति त्यांच्या मनांत उत्पन्न होते. हेंच त्याच्या मनाच्या दुर्बलतेचें प्रत्यक्ष प्रमाण आहे. शिवाय अशीं ऐषआरामी–वीर्य रक्षण न करणारीं–मनुष्यें यांच्या जवळ धारबळ ही कमी असतें, ही तर प्रख्यात गोष्ट आहे.

या वरून आपण असा निर्णय करूं शकूं कीं, मनुष्याचा उपयोगी पडणाऱ्या तीन शक्ति म्हणजे शरीरबळ, मनोबळ व धारबळ यांचा आधार मुख्यत्वेंकरून ब्रह्मचर्यावर आहे. दिलें

दिवस दिवस भारतवर्षांत ब्रह्मचर्याचा ऱ्हास जास्त प्रमाणांत होत आहे असें परमपूज्य गुरुश्री विजयधर्मसूरी आपल्या गुजरात काठियावाड, मारवाड, मेवाड, उत्तरहिंदुस्थान, मगध, बंगाल, वगैरे देशांतील प्रवासाच्या प्रसंगी अनुभवानें सांगतात. शास्त्रकारांनी आणि वैद्यक नियम यांना फांटा देऊन गृहस्थ वर्ग तथा साधु-वर्गाच्या पवित्र नियमांचा बहुतांशीं भंग होत आहे. तथापि भारतवर्षांत असे विवेकी साधु आहेत कीं ते आपण महात्मे आहोंत असा अभिमान बाळगतात. परंतु बारीक दृष्टीनें त्यांचें आंतरिक वर्तन पाहिलें तर ते दुराग्रहाचीं कार्यें करितांना दृष्टीस पडतात. गृहस्थ आणि महात्म्यांची वर प्रमाणें स्थिति आहे तर दुसरी कडे भारतवर्षाची भावी नररत्नें, भारतवर्षाच्या उन्नतिचे आधार स्तंभ म्हणुन मानले जाणारे युवक आणि बालकयांची स्थिति त्याच्या अगर त्यान्या सारख्या सुंदर घरांतून त्याच्या शाळांतून आणि विश्वविद्यालयातून जाऊन पाहिल्यास खरोखर खेद झाल्या शिवाय राहणारच नाहीं. याच वरील प्रधान कारणा वरून या लहानशा पुस्तकाची योजना करण्यांत आली आहे.

ब्रह्मचर्य कोठपावेतों पाळलें पाहिजे, लग्न करण्यांत कोणता हेतु असावा, साधूंनीं ब्रह्मचर्यव्रताचें पालन करण्या साठीं कोण कोणते नियम पाळलेंच पाहिजेत, पुत्र आणि कन्या यांच्या वर आई बापांनीं कसें लक्ष ठेविलें पाहिजे, व ब्रह्मचर्य पाळल्यानें

आत्म लाभ होतो हाच या पुस्तकाच्या रचनेचा प्रधान लक्ष्यबिंदु आहे. थोडक्यात सांगावयाचें म्हणजे गृहस्थ अथवा साधु, स्त्री पुरुष, बालक किंवा वृद्ध या सर्वांना आपआपल्या अधिकारा प्रमाणें ब्रह्मचर्य पाळण्या विषयींचे नियम त्याच्या कारणा सहित या पुस्तकांत देण्यांत आले आहेत. या बाबतींत आतां जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण पुस्तकाच्या वाचनानें तें वाचकांना कळेलच. हातच्या कांकणाला आरसा कशाला.

गुजराती पुस्तक परमपूज्य शास्त्रविशारद–जैनाचार्य श्री विजयधर्मसूरि असोसियेट मेंबर, एशियाटिक सोसायटी बंगाल यांनीं लिहिलेलें असून सदरहु गुजराती पुस्तकाच्या द्वितीय आवृत्तीचा प्रस्तुत पुस्तक अनुवाद आहे.

अंजनीसुत–हनुमान–हा केसरीनंदनाचा वेळीं एकट्या सर्वांना पुरून उरला. एकट्या हनुमंतानेंच द्रोणागिरी पर्वत उचलला व याच मारुतीनें आपल्या निःसीम भक्तीच्या योगानें प्रभु रामचंद्राला–प्रत्यक्ष विष्णुच्या अवताराला–वश करून घेतलें. या सर्वांचें कारण आपण पाहूं गेलों तर आपल्याला असें आढळून येईल कीं मारुती एक महा–कट्टर–ब्रह्मचारी होता. ब्रह्मचर्याचा केवढा अद्भुत प्रताप !!!

ज्या भरतभूमींत भीष्मपितामह, हनुमान

आदर्श ब्रह्मचारी होऊन गेले, ज्या भारतभूमींत ब्रह्मचारी साधूंचें ब्रह्मचारी विद्यार्थ्यांचे ठिकठिकाणी आश्रम दृष्टीला पडत असत तसेंच ज्या भरतभूमींत ब्रह्मचर्यव्रताच्या नियमा प्रमाणें गृहस्थाश्रम धर्म पाळला जात असे त्याच भरतभूमींत आज खरा कडकडीत ब्रह्मचारी मिळण्याची मारामार पडावी काय ! ब्रह्मचर्याच्या अंगभूत जें शारीरिक व मानसिक बळ त्याचा ब्रह्मचर्याच्या भंगानें लोप झाल्या मुळेंच हिंद मातेला अशी अवनत दशा प्राप्त झाली आहे. मातृभूमीची उन्नती करण्याला ब्रह्मचारी घरोघर दृष्टीस पडले पाहिजेत ब्रह्मचर्याचा लोप हें अवनतीचें खरें कारण आहे असें लक्षांत आल्या वरूनच त्या दिशेनें राष्ट्रांतील पुढाऱ्यांचे प्रयत्न चालू आहेत व स्वामी श्रद्धानंदजींचें गुरुकुल, कविवर्य टागोर यांचें शांतिनिकेतन आणि महात्मा गांधींचा ... आश्रम हीं त्याचीं दृश्य फळें आहेत.

शेवटीं या पुस्तकाच्या वाचनानें अशा अशाच तुमच्या [illegible] वाचनानें उत्तरोत्तर आर्यभूमींत ब्रह्मचर्यव्रताचें पालन करणाऱ्यांची संख्या वृद्धिंगत होऊन ते आपल्या विकास पावलेल्या मानसिक बळाचा आर्यभूमीच्या–मातृभूमीच्या उन्नति करितां उपयोग करोत अशी मी ईश्वराला प्रार्थना करून तसेंच या पुस्तकांनी ब्रह्मचर्यासंबंधीं गूढ ग्रंथकारांनी ज्या ज्या पुस्तकाचा ग्रंथ घेतला त्या त्या पुस्तकाचे ऋणक देतोंय या

पुस्तकग्रच्या योजनेनें होणाऱ्या पुण्याचे वाटेकरी होवोत अशी आशा प्रदर्शित करून हा प्रस्तावना लेख आटोपता घेतो.

तो करुणासागर, भक्तांचा कैवारी, ब्रह्मचारी हनुमंताचा स्पर्शबिंदु जानकीनाथ भारत संतानांना ब्रह्मचर्यव्रताचें पालन करण्याची सुबुद्धि देवो एवढीच त्या एक पत्नीव्रत श्री रामचंद्र प्रभूंच्या पवित्र चरणीं नम्र प्रार्थना आहे.

सुदामापुरी.
मुकुंदाश्रम-१३-६-१९२०
जेष्ठ कृष्ण १२ रविवार शके
१८४२ सं. १९७६

सौभद्र.

विषयानुक्रम.

विषय	पृष्ठ
१ उपक्रम	१
२ ब्रह्मचर्य म्हणजे काय ?	४
३ वीर्य रक्षणाची आवश्यकता.	६
४ ब्रह्मचर्याचे दोन प्रकार.	१०
५ ब्रह्मचर्याचीं दहा स्थानें.	१२
६ हिंदुधर्म शास्त्रांतील आज्ञा.	२७
७ बौध्य धर्मशास्त्रांतील आज्ञा	३०
८ साधूचा खरा अलंकार म्हणजे ब्रह्मचर्य.	३४
९ गृहस्थांनीं पाळावयाचें ब्रह्मचर्य.	३९
१० वीर्य रक्षण कर्मीत कर्मी कोठपावेतों करावें ?	४१
११ वर्तमान काळांतील तरुण आणि बालक यांची स्थिति.	४६
१२ बाल्यावस्थेंत जडलेल्या वाईट सवयी.	५३
१३ आईबापांचें कर्तव्य.	६०
१४ लोकांची चुकीची समजूत.	६२
१५ आजन्म ब्रह्मचर्य पाळल्याचा प्रभाव.	६४
१६ पुत्रेच्छेनें ब्रह्मचर्यव्रताचा भंग	६६
१७ लग्न कोणाबरोबर करावें ?	७२

॥ अर्हम् ॥

शान्तमूर्तिपरमगुरुश्रीवृद्धिचंद्रेभ्यो नमः ।

ब्रह्मचर्यदिग्दर्शन.

उपक्रम.

पुष्कळ वेळा मनुष्याच्या अगाध शारीरिक बलाच्या आणि अति तीव्र मानसिक शक्तीच्या आपण गोष्टी ऐकतों. अशा वेळीं त्या रम्य गोष्टी ऐकून आपणाला कल्पनातीत आश्चर्य वाटतें. भीष्मपितामहाच्या महान पराक्रमाच्या गोष्टी वाचणारे तसेंच सती द्रौपदीचीं वस्त्रें हरण केल्याची कथा ऐकणारे आश्चर्यांनें गुंग होतात खरें. परंतु भीष्मपितामहा सारखे पुरुष अशा तऱ्हेचे पराक्रम कसे करूं शकत तसेंच सती द्रौपदी सारख्या स्त्रीचीं वस्त्रें भरसभेंत हरण केलीं जात असून ती नग्न कां दिसली नाहीं या बाबतींत विचार करणारे फारच थोडे जण म्हणजे अगदींच शेलकीं मनुष्यें आपण पाहूं शकतों. भीष्म पितामह अथवा सती द्रौपदी यांचे दृष्टांत फारच प्राचीन काळचे आहेत. कित्येक लोकांना त्या रम्य कथा अशाव्यात असेंही वाटेल साहजीक आहे कारण त्या पुरातन काळांतील पुराणांतल्या गोष्टी आहेत. त्या अर्वाचीन

काळांतील गोष्टी नाहींत. असें जरी आहे तरी या विसाव्या
शतकांत आपल्या दृष्टीसमोर अशी अनेक कार्यें घडत आहेत
आपणाला त्या कार्यापासून पुरातन काळाच्या गोष्टी इतकें
आश्चय वाटते इतकेंच नाहीं पण अर्वाचीन काळांतील गो
आपल्या मनांत अतिशय कुतुहल उत्पन्न करितात कारण आप
त्या प्रत्यक्ष पाहतों. प्रोफेसर राममूर्ति (हिंदुस्थानांतील सॅन्डो
हे आपल्या चार चौघा सारखेच साडेतीन हाताचे पुरुष आहे
पण आपल्या अद्भुत शक्तिबळानें ते वेगांत असलेल्या मोट
गाडीला उभे करितात, लोखंडाच्या जाड आणि मजबूत साखळ
दंडाला एका हिसक्यानें तोडून टाकतात, आपल्या छातीवर हत्
सारख्या अगडबंब प्राण्याला उभें करून त्याचा भार सहन क
तात इतकेंच नाहीं पण माणसांनीं गच भरलेली गाडी (हमा
लोकांचा माळाचा खटारा) आपल्या अंगावरून चालवितात. य
सर्व गोष्टी काय लहान आहेत? अथवा या सर्व गोष्टी काय कम
अद्भुत आहेत ! पण ही प्रोफेसर राममूर्ति यांची गोष्ट झाली
ते पुरुष आहेत. त्यांच्या अंगात शक्ति आहे. तेव्हां त्यांची गो
आपण बाजूस ठेवूंया. कारण पुरुषाची गोष्ट उदाहरणाला आप
कराला घ्यावी ! मिस ताराबाई या भारत वर्षातील महिले
काय कमी शक्तिचें काम करून दाखविलें आहे ! प्रोफेसर राममू
प्रमाणेच मिस ताराबाईनें देखील आपल्या अतुल शक्तिबळा
सर्वांना थक करून सोडलें आहे पण हें सर्व ते कोणाच्या प्रतापा

करूं शकतात याचा विचार करण्याची गरज तरी कोणाला आहे. प्रोफेसर राममूर्ति अथवा मिस ताराबाई यांचे अद्भुत शक्तिप्रयोग पाहून घटकाभर आनंद मानला की काम झालें. परंतु ज्या कोणी या बाबतींत चौकशी केली असेल अथवा ज्या कोणी अमल्या अद्भुत शक्तीच्या कार्याची खरी किल्ली कशांत आहे याचा तपास केला असेल अथवा ज्यांनीं प्रोफेसर राममूर्ति यांना विचारून आपल्या शंकेचें निरसन केलें असेल त्यांना असें नक्कीच आढळून आलें असेल अथवा त्याची अशी पूर्णपणें खात्रीच झाली असेल कीं अमलीं मोठमोठीं पुरुषार्थाचीं कामें करण्याचें सामर्थ्य प्रोफेसर राममूर्ति मिस ताराबाई वगैरेंना केवळ ब्रह्मचर्याच्याच प्रतापानें मिळालें आहे. प्राचीन काळीं देखील ज्या ज्या पुण्यपुरुषांनीं मोठमोठीं शौर्याचीं अथवा अद्भुत वाटतील अशीं पराक्रमाचीं कार्ये केलीं तीं देखील त्यांनीं केवळ एका ब्रह्मचर्याच्याच प्रतापानें केलीं होतीं. या बाबतींत जास्त अवलोकन आपण पुढें करूं. सारांश, सर्वा पुरतें इतकेंच समजणें जरूरीचें आहे कीं ब्रह्मचर्याच्या प्रतापानें संसारातील दरेक मनुष्य लहान मोठीं कार्ये करूं शकतो. जितक्या प्रमाणांत जो मनुष्य ब्रह्मचर्य पालन करील तितक्या प्रमाणात तो विशेष महत्वाचीं कामें करण्याला समर्थ होईल. आपणाला या संसारांत आपल्या तोंडावरील माशी उडविण्याला देखील समर्थ नाहींत अशीं मनुष्यें दिसत नाहींत काय ! व जर अशीं मनुष्यें या दुनियेंत आहेत

तर त्याचें कारण काय असावें बरें? त्यानें कारण एवढेंच कीं असा मनुष्यें ब्रह्मचर्यापासून सर्वथैव दूर राहिलीं असावींत. ब्रह्मचर्य व्रताचें त्यांनीं आजन्मांत पालनच केलें नसलें पाहिजे. नाहींतर त्यांची अशी करुणाजनक स्थिति झाली नसती.

ब्रह्मचर्य म्हणजे काय ?

आतां ब्रह्मचर्य कशाला म्हणतात, अथवा ब्रह्मचर्य हें काय वस्तु आहे याचा खुलासा करण्याची जरूरी आहे. उत्पत्ति दृष्ट्या ब्रह्मचर्याचा अर्थ करण्यांत आला तर ' ब्रह्मणि चरणमिति ब्रह्मचर्यम् ' असा आहे. म्हणजे ' ब्रह्मपदीं जाणें ' यांचें नांव " ब्रह्मचर्य ". पण आपण वीर्य रक्षणांत दक्ष असलों अथवा आपण वीर्याचें रक्षण केलें तरच आपणाला ब्रह्मपदाला जाण्याचें कार्य करिता येईल. अतएव ब्रह्मचर्य या शब्दाचा येथें वीर्यरक्षण असाच अर्थ करूं. अर्थात् वीर्याचें रक्षण करणें यांचें नांवच ब्रह्मचर्य होय. पातञ्जलयोगसूत्राच्या साधन पादाच्या ३८व्या सूत्रांत असें सांगितलें आहे कीं:— 'ब्रह्मचर्यप्रतिष्ठायां वीर्यलाभः' अर्थात् ब्रह्मचर्याचें बळानें म्हणजे ब्रह्मचर्य पाळल्यानें वीर्य लाभ होतो. याची टीका करतानां भोजदेव म्हणतात:—

यः किल ब्रह्मचर्यमभ्यस्यति तस्य तत्प्रकर्षान्निरतिशयं

वीर्यं सामर्थ्यमाविर्भवति । वीर्यनिरोधो हि ब्रह्मचर्यं तस्य प्रकर्षाच्छरीरेन्द्रियमनःसु वीर्यं प्रकर्षमागच्छति ।

अर्थात्:—जो मनुष्य ब्रह्मचर्य व्रतानें राहतो—ब्रह्मचर्य पाळतो—त्याचे ठिकाणीं ब्रह्मचर्याच्या विशेषतेनें निरतिशय वीर्याचा—सामर्थ्याचा—आविर्भाव होतो. शिवाय 'वीर्याचा निरोध' म्हणजेच 'ब्रह्मचर्य'. वीर्य वृद्धीच्या योगानें शरीर, इंद्रिय, आणि मन यांचे ठिकाणीं विशेष शक्ति प्राप्त होते.

या वरून आपणाला एवढेंच नक्की लक्षांत ठेवावयाचें आहे कीं:-' वीर्याचें रक्षण करणें याचेंच नांव ब्रह्मचर्य होय.

दुसरी 'ब्रह्मचर्य' याची विस्तृत व्याख्या अशी देखील करता येईल कीं.—" स्त्री अथवा पुरुष यांनीं विषयवासनेनें अथवा विषयाच्या इच्छेनें एकमेकांना स्पर्श देखील करूं नये. 'स्पर्श करूं नये' एवढेंच नाहीं परंतु विषय अथवा कामवासना याच्या विचाराला देखील आपल्या मनांत स्थान देऊं नये. "

विषयवासनेच्या बाबतींत स्वप्नांत देखील विचार आला नाहीं म्हणजेच ब्रह्मचर्याची पराकाष्ठा झाली असें मानतां येईल. या स्थितीला पोहोंचणाराच खरोखर ब्रह्मचर्याच्या पराकाष्ठेला पोहोंचला असें म्हणतां येईल. व या स्थितींत जितकी न्यूनता तितकी ब्रह्मचर्यव्रतांत न्यूनता असें प्रत्येकानें समजण्याचें आहे.

वीर्यरक्षणाची अवश्यकता.

ब्रह्मचर्य पालन–वीर्य रक्षण–साधु वा गृहस्थ, बालक अथवा वृद्ध किंवा स्त्री वा पुरुष या प्रत्येकानें करण्याचें आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे वीर्यरक्षण करणें हें आत्मरक्षण करण्या सारखेंच आहे; कारण धार्मिक नियमाला एका बाजूला ठेऊन वैद्यकशास्त्राच्या नियमाप्रमाणें आपण पाहूं लागलों तर आपणाला असें आढळून येईल कीं मुख्यत्वें करून वीर्यांत जीवांची वसति आहे. वैद्यक ग्रंथ भावप्रकाशांत सांगितलें आहे कीं:—

जीवो वसति सर्वस्मिन् देहे तत्र विशेषतः ।
वीर्ये रक्ते मले यस्मिन् क्षीणे याति क्षयं क्षणात् ॥

अर्थात्:—शरीराच्या सर्व भागांत जीव आहेत. त्यांतूनही वीर्य, रक्त, आणि मळ यांत तर विशेष करून जीवांची वसति आहे. प्रसंगवशात वीर्य, रक्त आणि मळ यांचा नाश झाला तर आत्मा देखील शरीराला सोडून जातो–मनुष्यदेह नाश पावतो.

यावरून आपल्या हें जरूर दसांत येईल कीं आत्मा आणि वीर्य यांचा एकमेकांशीं अति निकट संबंध आहे. वास्तविक रीत्या पाहिलें असतांना वीर्य क्षयाच्या योगानें आत्मिक शक्ति कमी होणें–जरळ मरळ नष्ट होणें–यांत आश्चर्य मानण्याजोगें असें कांहीच नाहीं. म्हणून प्रत्येक शरीरधारी प्राण्यानें–स्त्रांतूनही

मनुष्यानें तर—वीर्य रक्षणाच्या बाबतींत विशेष काळजी ठेविली पाहिजे. वीर्य आपल्या शरीरांतील राजा आहे ही गोष्ट अगदीं सत्य आहे. जशी राजाची सत्ता अमुक एका विवक्षित स्थानावर नसते परंतु राज्यांत सर्वत्र ठिकाणीं असते तशीच वीर्याची सत्ता शरीरांतील अमुक एकाच स्थानावर नसून सर्वत्र ठिकाणीं व्यापलेली असते. विशेष स्पष्टतेनें सांगावयाचें म्हणजे शेंडीच्या टोकापासून पायाच्या बोटापर्यंतच्या शरीरांतील सर्व भागावर वीर्याच्या सत्तेचेंच साम्राज्य पसरलेलें आहे. चरक संहितेच्या चिकित्सा स्थानाच्या दुसऱ्या अध्यायांत सांगितलें आहे कीं:—

रस इक्षौ यथा दध्नि सर्पिस्तैलं तिले यथा ।
सर्वत्रानुगतं देहे शुक्रं संस्पर्शने तथा ॥

तत् स्त्रीपुरुषसंयोगे चेष्टासंकल्पपीडनात् ।
शुक्रं प्रच्यवते स्थानाज्जलमार्द्रात् पटादिव ॥

अर्थात् —ज्याप्रमाणें ऊंसांत रस, दह्यांत लोणी, आणि तिळांत तेल असतें त्याचप्रमाणें सर्व शरीर आणि शरीराशी बाबती या मध्ये—यांतील प्रत्येक परमाणूंत—वीर्याची व्याप्ति आहे. शिवाय ज्याप्रमाणें ओल्या अथवा भिजलेल्या कापडांतून पाणी निघतें त्याचप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या संयोगापासून तसेंच चेष्टा, संकल्प आणि पीडनापासून वीर्य आपल्या स्थानांतून खालीं उतरतें.

थोडी विचार करण्यासाठीं गोष्ट आहे कीं जेव्हां आपण ऊंसाला चरकातून पिळून काढतो तेव्हां ऊंसांतील रस बाहेर येतो. रस बाहेर आला म्हणजे ऊंसाची सुंदरता नष्ट होते; व ऊंसाच्या फक्त चिपट्याच शिलक राहत नाहींत काय ? दह्यांत असलेलें सत्व–लोणी–निघतें तेव्हां पाण्या सारखें ताकच शिलक नसतें काय ? तसेंच तिळांतून तेल निघाल्या वर तिळाचा भूसा–ढेप याशिवाय दुसरें काय शिलक राहतें ? वरील प्रमाणेंच जेव्हां या शरीरांतील सत्वस्वरूप–शरीराच्या राजरूप–वीर्याचा नाश होतो तेव्हां निसत्व धमणी–भात्या–प्रमाणें फक्त श्वासोच्छ्वास घेणारी या शरीराची लाकडी पेटी शिलक राहते इतकेंच नाहीं पण सर्वथा शक्तिहीन झालेल्या या शरीरांतील प्राणवायु उडून गेला तर त्यांत कांहीं नवीनता नाहीं आणि म्हणूनच तसें झालें तर त्यांत आश्चर्य मानण्याजोगेंही नाहीं. एक मनुष्य सिंहाप्रमाण गर्जना करताना दिसतो तर दुसरीकडे असा दुर्बल आणि हळु आवाजाचा मनुष्य दिसतो कीं त्यानें बोलणें मोठ्या मुष्किलीनें त्याला स्वतःलाच ऐकूं येते. या भयंकर भेदाचें काय बरें कारण असावें ? एकीकडे एक मनुष्य वीस वीस अथवा पंचवीस पंचवीस मण वजनाचें ओझें एका घडाक्यानें उचलून फेंकून देतो तर दुसरीकडे एक मनुष्य पांच शेराचें वजन देखील उचलूं शकत नाहीं याचें काय बरें कारण असावें ? एकाद्या माणसाची बुद्धि इतकी तीव्र असते कीं एका तासांत तो पंचवीस पन्नास श्लोक

शंभर श्लोक देखील सहज हांना रोजच मुखपाठ करितो उलट दुसरा इसम पंचवीस तासांत पंचवीस श्लोक देखील पाठ करूं शकत नाहीं. या सर्वांचें मूळ कारण काय असलें पाहिजे ! वीर्य रक्षणाचा सद्भाव व वीर्य रक्षणाचा अभाव. ज्यानें जेवढ्या प्रमाणांत वीर्याचें रक्षण केलें असेल तो त्या प्रमाणांत जास्त बुद्धिवान असतो.

सारांश यावरून आपणाला सहज कळून येईल कीं वीर्याचें रक्षण करणें–ब्रह्मचर्यव्रताचें पालन करणें–हें मनुष्य–मात्राला अति जरूरीचें अथवा फारच फार महत्वाचें आहे. स्वर्ग–नरक, पुण्य–पाप, आणि मोक्ष आदि यांची आस्था करणारे सर्व याचा 'मनुष्य मात्र' या शब्दांत आम्ही समावेश करितो व अशा सर्वांनीं ब्रह्मचर्य पालन करणें हें अति जरूरीचें आहे. परंतु जे पुण्य–पाप, स्वर्ग–नरक आणि मोक्ष आदि याना मानीत नाहींत, आणि जे फक्त या संसारातील दुःखा (१) ला खरें सुख मानून ऐषआरामांत मस्त राहतात अशांनीं देखील ब्रह्मचर्यव्रताचें पालन करणें अति जरूरीचें आहे. अशा तऱ्हेचे धर्मतत्वाला न जाणणारे अज्ञानी पुरुष देखील ब्रह्मचर्याच्या आवश्यकतेचा स्वीकार करितात हें आपण प्रत्यक्ष पाहतो. शिवाय ही सूर्यप्रकाशा इतकी सत्य गोष्ट आहे कीं–शरीराचा नाश होणें–शरीर पडणें–शरीरांत अनेक प्रकारचे रोग होणें या गोष्टी मग तो आस्तिक असो

नास्तिक असो, धर्मात्मा असो वा नसो, कोणालाही प्रिय नाहींत. सारांश धर्माची गोष्ट आपण बाजूला ठेवली तरी देखील ब्रह्मचर्य अर्थात् वीर्य रक्षण करणें हे प्रत्येक मनुष्याचें सर्वांत पहिलें आणि अति जरूरीचें व महत्वाचें कर्तव्य आहे.

ब्रह्मचर्याचे दोन प्रकार.

मनुष्यामध्यें आपण दोन वर्गांचीं मनुष्यें पाहतो. एक साधु आणि दुसरा गृहस्थ. या दोन वर्गां मुळेंच शास्त्रकारांनीं ब्रह्मचर्याचे दोन प्रकार केले आहेत. एक सर्वथा आणि दुसरें देशतः म्हणजे साधूंनीं सर्वथा ब्रह्मचर्य पाळावयाचें व गृहस्थांनीं देशतः ब्रह्मचर्य पाळावयाचें. 'सर्वथा' ब्रह्मचर्य म्हणजे जगांतील कोणत्याही स्त्री विषयीं कामवासना न ठेवणें यासाठीं स्पष्ट आणि शुद्ध असें आचरण [illegible] ब्रह्मचर्याचा काळ घालविणें. देशतः ब्रह्मचर्य म्हणजे आपल्या विवाहित पत्नी बरोबर शास्त्राप्रमाणें नियमित काळीं विषय सेवन करून या व्यतिरिक्त सर्व स्त्रियांबरोबर माता, भगिनी आणि कन्या तुल्य व्यवहार ठेवणें. या दोन प्रकारच्या ब्रह्मचर्यांस निरनिराळ्या 'मुख्य ब्रह्मचर्य' आणि 'गौण ब्रह्मचर्य' या नांवानें देखील ओळखतात.

[illegible]

करून विरक्तता धारण करून दीक्षेचा स्वीकार केला आहे व जे आपल्या व दुसऱ्याच्या कल्याणा साठीं केवळ भिक्षे वरच आपला उदर निर्वाह चालवून पृथ्वी तलावर परिभ्रमण करितात त्यांना साधु असे म्हणतात. साधूंनीं संसारांतील समस्त स्त्री वर्गाला माता, भगिनी आणि कन्या तुल्य मानून विषय वासनें पासुन सर्वथैव दूर राहिले पाहिजे. व या प्रमाणें ब्रह्मचर्य पाळणारा तोच खरा साधु. अशा साधूंनीं आपल्या ब्रह्मचर्यव्रताचें रक्षण करण्यासाठीं शास्त्रकारांनीं—ज्ञानी पुरुषांनीं—घालून दिलेल्या नियम रूपी किल्ल्यांतच राहणें जरूर आहे. संसारांत असे प्रबळ योगायोग उपस्थित होतात कीं त्यावेळीं मी मी म्हणविणाऱ्यांची अक्कल गुंग होते. योगायोग आपला परिणाम केल्या शिवाय राहत नाहीं. अग्नि जवळ ठेवलेलें तूप किती वेळ घट्ट राहूं शकेल ! तें पातळ झालेंच पाहिजे. सिंहाच्या गुहेच्या तोंडावर बांधून ठेवलेला मृग किती वेळ जिवंत राहील ! तो सिंह भक्षण करणारच. अतएव जे साधु आपल्या ब्रह्मचर्य रक्षणाची खरोखर मनापासुन इच्छा करितात ते नियम रूपी किल्ल्या बाहेर जाण्याची केव्हांही इच्छा करीत नाहींत. सन्यासी लोकांना—साधूंना—शास्त्रकारांनीं दगडा सारख्या निर्जीव वस्तुच्या बनविलेल्या पुतळीला देखील पादस्पर्श करण्याची मनाई केली आहे. हें त्यांनीं का बरें केलें असावें ? याचें कारण दुसरें कांहीं ही नाहीं. फक्त साधूंच्या ब्रह्मचर्य रक्षणासाठींच असे कडक नियम घालून दिले आहेत.

साधूंच्या मनावर विषय वासनेचा थोडा देखील परिणाम होऊंनये म्हणूनच असे तीव्र नियम घातले आहेत. आपणाला हें नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं—कारण आपण सर्व ते जाणतच आहांत. या संसारांत अशी सेंकडो उदाहरणें नाहींत काय ? कीं स्त्रीयांच्या सहवासा मुळें पहिल्या प्रतीच्या ब्रह्मचारी योग्यांना देखील योगा पासुन भ्रष्ट व्हावे लागले.

एवढ्या साठींच शास्त्रकार कंठरव करून सांगतात कीं सर्वथा ब्रह्मचर्य पाळणाऱ्या पुरुषांनीं—साधूंनीं—अशा परिस्थितींत केव्हांही येऊं नये—शिवाय असा कधीं देखील व्यवहार ठेवुं नये कीं जेणे करून आपल्या ब्रह्मचर्यव्रताचा भंग होण्याचा समय प्राप्त होईल.

ब्रह्मचर्याचीं दहा स्थानें.

जरी साधुपुरुष आपल्या शीलामुळें—शील सुगंधामुळें—हमेशा सुगंधित असतात, सत्यरूपी रत्नाच्या योगानें धनाढ्य असतात, समभावानें सदोदित अलंकृत असतात, निरहंकारानें सदासर्वदा मस्त राहतात, अस्तेय भावामुळें अस्तकर्मा असा [illegible] नाहीं पण अहिंसा धर्म पाळणाच्या योगानें नेहमीं अहिंसक म्हणून नांवाजलेले असतात तरी देखील त्यांना आपण कोणते वेळीं आपल्या ब्रह्मचर्यापासून स्खलित होऊं याची नेहमीं भीति

असते. या कठिण मनापासून स्खलित होऊं नये म्हणून उत्तराध्ययन सूत्राच्या सोळाव्या अध्यायांत समाधीचीं दहा स्थानें सांगितलीं आहेत तीं खालीं दिलीं आहेतः—

जं विवित्तमणाइण्णं रहिअं थीजणेण य ।
बंभचेर रक्खट्ठा आलयं तु निसेवए ॥
मनपल्हायजणणी कामरागविवड्ढणी ।
बंभचेररओ भिक्खू थीकहं तु विवज्जए ॥
समं च संथवं थीहिं संकहं च अभिक्खणं ।
बंभचेररओ भिक्खू निचसो परिवज्जए ॥
अगपचगसंठाणं चारुल्लविअपेहिअं ।
बंभचेररओ थीणं चक्खुगिज्झ विवज्जए ॥
कुइअं रुइअं गीअं हसिअं थणिअकंदिअं ।
बंभचेररओ थीणं सोअगिज्झं विवज्जए ॥
हासं किड्डं रइं दप्पं सहसावत्तासिआणि अ ।
बंभचेररओ थीणं नाणुचिंते कयाइवि ॥
पणिअं भत्तपाणं च खिप्पं मयविवड्ढणं ।
बंभचेररओ भिक्खू निचसो परिवज्जए ॥
धम्मलद्धं मिअं काले जतत्थं पणिहाणवं ।
नाइमत्तं तु भुंजिज्जा बंभचेररओ सया ॥

विभूसं परिवज्जिज्जा सरीरपरिमंडणं ।
बंभचेररओ भिक्खू सिंगारत्थं न धारए ॥
सद्दे रूवे अ गंधे अ रसे फासे तहेव य ।
पंचविहे कामगुण निच्चसो परिवज्जए ॥

वरील दहा श्लोकांत दहा समाधींची स्थानें सांगितली आहेत. त्यांत पहिलें समाधीचें निवास स्थान आहे. अर्थात् जे स्थान स्त्री, पशू आणि नपुंसक यांच्या संबंधापासून दूर आहे अर्थात् ज्या ठिकाणीं वरील जातीचा वास नाहीं अशा एकांत स्थानांत ब्रह्मचर्य पालन करण्याची इच्छा ठेवणाऱ्या साधूंनीं निवास केला पाहिजे. खऱ्या ब्रह्मचर्य भक्तांना असलेंच निवास स्थान आवश्यक आहे.

खरी गोष्ट अशी आहे कीं ज्या स्थानांत स्त्री वगैरेंचा वास आहे त्या पूर्वोक्त ठिकाणीं साधु पुरुषानें ब्रह्मचर्य कायम राहण्याचा बराच कमी संभव आहे इतकेंच नाहीं पण अशा ठिकाणीं ब्रह्मचर्य कायम ठेवणें हें अतिशय कठिण काम आहे. कारण त्या ठिकाणीं स्त्रियांचे हावभाव, चेष्टा वगैरे वारंवार दृष्टीस पडतात व त्यामुळें एकमेकांना परस्परांशी थोडा थोडा परिचय होत जातो. याचाच परिणाम अति स्नेहाचा पडण्याचा संभव असतो व जेव्हां स्त्री आणि पुरुष यांना परस्पर अतिस्नेह होतो तेव्हां मदननिदर्शक ते दोघेही हितकर वचनांना विसरून जातात व

नास्तिक वचनेंच खरी असें मानण्याला लागतात. हळू हळू त्यांची मोठी विव्हळ स्थिति होते. त्यांच्या स्थितीच खालील श्लोकांत यथार्थ वर्णन दिले आहे.

सत्यं वच्मि हितं वच्मि सारं वच्मि पुनः पुनः ।
अस्मिन्नसारे संसारे सारं सारंगलोचना ॥

वरील प्रमाणें तो दुष्ट वासना अथवा भावना राखणारा होतो. आणि मिथ्यत्वाच्या उदयानें त्या स्त्रीच्या सेवेंत आपलें मन गुंगविता–इतकेंच नाहीं पण ' शास्त्रकारांनीं स्त्री सेवनांत जे दोष दाखविले आहेत ते खरे आहेत कीं नाहीं ' या विषयीं देखील त्याच्या मनाला शंका येऊं लागते. या शिवाय त्याच्या मनांत ' साधु पुरुषाच्या नियमा प्रमाणें मिळणारा शुष्क आहार–विहार–भूमिशय्या आणि केशलुंचन आदि–केश उपटून काढणें–कष्टाचें फळ खरोखर मिळेल कीं नाहीं ' अशी देखील शंका उत्पन्न होऊं लागते व अशी शंका उत्पन्न झाल्या मुळें त्याचें लक्ष आपोआपच स्त्री सेवना कडे धांव घेते–तो आपल्या मनोरूपी अश्वाला स्त्रीसेवनाकडे दौडविता. वरील प्रमाणें स्त्री परिचया पासून अनेक प्रकारचे विकल्प आणि वाईट परिणाम होण्याचा बराच संभव असल्यामुळें स्त्रियांचा ज्या ठिकाणीं संसर्ग आहे अशा गृहांत साधु पुरुषांनीं केव्हांही राहूं नये. वरील प्रमाणेंच पशूंचा संसर्ग देखील साधुपुरुषांना नुकसान करणारा–अहितकारक–

आहे. कारण पशूंना एथे मनुष्यांचा वास आहे करितां विषय-सेवननयें हें ज्ञान नसतें व ज्या ठिकाणीं पशु राहतात त्या ठिकाणीं साधूचा वास असला तर पशूंना विषय भोग वारंवार साधूच्या दृष्टीला पडण्याचा प्रसंग येतो व विषय भोग नजरेला पडल्यामुळें त्या साधूची मनोवृत्ति बिघडण्याचा पुष्कळच संभव असतो म्हणून ज्या ठिकाणीं पशूंचा संसर्ग आहे अशा ठिकाणीं देखील साधूंनीं राहणें योग्य नाहीं. असें ठिकाण साधुपुरुषानें *वसतिस्थान म्हणून अयोग्य आहे नपुंसकाचा संसर्ग तर प्रत्यक्ष* अहितकारक आहेच. नपुंसकांच्या वावर्नीत जाण्याचें विवेचन करण्याचें प्रयोजनच नाहीं. वरील सर्व कारणांवरून या तीन जातींचा जेथें संसर्ग आहे असें स्थान साधु पुरुषाकरितां सर्वथैव अनुचित म्हणून शास्त्रकारांनीं ठरविलें आहे व त्यानीं जें ठरविलें आहे तें सर्वथा योग्यच आहे.

समाधीन दुसरे स्थान म्हणजे कथे संबंधी होय. म्हणजे मनाला आल्हाद उत्पन्न करणारी आणि कामवासना अगर विषयोपभोगाला प्रदीप्त करणारी स्त्रीकथा मजालसींचे ठिकाणीं होत राहणाऱ्या साधूंनीं स्वतः करू नये इतकेंच नाहीं पण अशा तऱ्हेच्या हरीच्या नांवासाठीं केल्या जाणाऱ्या हरिकथा साधूंनीं ऐकू देखील नयेत. गोष्टी, कथा वगैरे मध्यें इतकं सामर्थ्य असतें कीं त्यांचा ऐकणाऱ्यांच्या मनावर तात्काळ परिणाम होतो.

वैराग्याच्या गोष्टी ऐकल्या म्हणजे मनुष्याच्या मनांत वैराग्यभाव उत्पन्न होतो त्याच प्रमाणें कामोत्तेजक गोष्टींच्या कथा ऐकल्यानें मनुष्याच्या मनांत कुविचार उत्पन्न होतात. एखाद्या साठींच स्त्रियाच्या रूपा–लावण्या–संबंधींच्या तसेंच स्त्री वेष धारण करून अमक्या पुरुषानें अमुक एका कामी पुरुषाला फसविलें अथवा अमक्या स्त्रीनें पुरुष वेश घेऊन एक भयंकर शौर्याचें कार्य केलें व या तिच्या कृतीमुळें तिची चोहीकडे वाहवा झाली, तिच्या प्राप्तीची मोठमोठे राजे रजवाडे इच्छा करूं लागले वगैरे वेषा वावर्तींच्या रम्य कथा देखील साधूंनीं कोणाला सांगूं नयेत व आपण स्वतः त्या ऐकूं नयेत. त्यांनीं असल्या गोष्टी पासून सदैव दूरच राहिलें पाहिजे.

तिसरें स्थान स्त्री बरोबर व्यवहार करण्या संबंधींचें होय म्हणजे स्त्री बरोबर परिचय करूं नये. याचा स्पष्ट अर्थ असा कीं:–एका आसनावर स्त्री आणि पुरुष यांनीं बसूं नये. स्त्री एकटी असतांना तिच्या बरोबर गोष्टी करूं नयेत. तसेंच स्त्री बरोबर वारंवार बोलण्या चालण्याचा प्रसंग आणूं नये–अथवा येऊं देऊं नये. वरील प्रमाणें व्यवहार राखणारा साधूच ब्रह्मचर्याचें रक्षण करूं शकेल. कारण स्त्री जातीचा नैसर्गिक स्वभाव चंचल आहे. स्त्रियांना थोडीशी गोष्ट करावयाला मोकळीक दिली, कीं त्या घंटेच्या घंटे गोष्टी करीत राहतील तरी त्या दमणार

नाहींत. त्याचा साहजीक परिणाम असा होतो कीं या गोष्टीच्या पुढें हास्यरसाची छटा दिसूं लागते व या हास्यरसांतून प्रसंगोपात अतिरेक झाल्यामुळें काम आणि क्रोध या दोन रसांची उत्पत्ति होते. तेव्हां प्रथम पासूनच विचार ठेऊन आल्यास व अशा तऱ्हेनें स्त्री बरोबर व्यवहार न ठेवल्यास असला वाईट परिणाम देण्याचा प्रसंगच ओढवणार नाहीं.

दुसरें ध्यान दृष्टि संबंधीं आहे. ब्रह्मचर्यानें पालन करणाऱ्या साधूनीं त्यांच्या दृष्टीला पडणाऱ्या स्त्रीचा शिरोभाग, त्या स्त्रीचे केस कपाळ, त्या स्त्रीचें मुख कमळ, स्तन आणि बगल वगैरे ध्यानपूर्वक अथवा बरा पूर्वक पाहूं नये. त्याच प्रमाणें त्या स्त्री बरोबर मनोहर भाषण करूं नये. तसेंच नेत्रकटाक्षादि कामचेष्टा पासून दूर रहावें. दृष्टिगोचर झालेल्या प्रत्येक वस्तूचा पाहण्याचा नेत्रांचा धर्म आहे तरी ब्रह्मचर्य पालन करणाऱ्या प्रत्येक साधूनें स्त्रीचे प्रत्येक अंग टक लावून पाहूं नये, आणि जरा कदाचित् [illegible] दृष्टि [illegible] जरा [illegible] सूर्या [illegible] आपण टक लावून पाहूं शकतो कीं नाय [illegible] आपली दृष्टि [illegible] परत घ्यावी लागते - त्याच प्रमाणें [illegible] त्या मूर्तीकडे पाहूं शकत नाहीं—[illegible] [illegible] मन, [illegible] [illegible] आहे, [illegible] [illegible] दृष्टि [illegible].

पांचवें स्थान नाद शब्दाचें होय. नाद शब्द म्हणजे कूजन, रुदन, गायन आणि हास्य वगैरे विषयसेवनाच्याकामीं होणारा शब्द. वरील कालचे ध्वनि अथवा वरील नाद आपल्या कानावर आला तर ब्रह्मचर्यांत व्यपाय होणाऱ्या भावनें त्या नादाचें ठिकाणीं चित्त होऊं नये. असें कांहीं जो नाद आपण ऐकलाच नाहीं अशी वृत्ति ठेवावी.

सहावें स्थान म्हणजे पूर्वावस्थेंत स्त्री बरोबर केलेल्या क्रीडा, हास्य, रति, वगैरेंचें विस्मरण. तसेंच पूर्वावस्थेंत एखाद्या स्त्रीचा नशा उपभोगण्याची केलेली प्रतिज्ञा, एखाद्या स्त्रीला त्रास देण्याकरितां निन्द्य भाषणें नेत्र कटाक्ष, यांची देखील ब्रह्मचर्यांत लीन राहणाऱ्या भावनें केव्हांही आठवण करूं नये. या देखील गोष्टी त्यानें विसरल्याच पाहिजेत. पूर्वावस्थेंतील वरील सर्व अथवा एखाद्या देखील गोष्टीच्या स्मरणानें काम रागाची उत्पत्ति होते व त्या मुळें ब्रह्मचर्याचा भंग होतो.

सातवें स्थान म्हणजे प्रणीत आहार प्रतिबंध. ज्या पदार्थांतून तुपाचे बिंदु टप टप गाळीं गळतात अशा पदार्थांच्या आहाराला प्रणीत आहार म्हणतात. अशा आहारा पासून कामाची वृद्धि होते म्हणून असा आहार ब्रह्मचारी पुरुषाला अनुचित आहे.

थोडी विचार करण्या सारखी गोष्ट आहे कीं व्यापारी लोक

देश सोडून परदेशांत जातात, तेथें ते अनेक कष्ट सहन करतात खाण्यापिण्यांत देखील ते कारन विचारानें राहतात व प्रत्येक बाबतींत ते व्यवहार दक्षतेनें चालून मनांत अशी खूण गांठ बांधतात कीं 'कशा तऱ्हेनें द्रव्य संग्रह करून आम्ही स्वदेशाला परत जाउं; ' वरील उदाहरणा प्रमाणेंच खरा साधु गृहस्थाश्रमाचा त्याग करून साधु वेष धारण करितो; देश सोडून विदेशांत संचार करितो; अनेक प्रकारचे कष्ट सहन करितो; ' आत्म लक्ष्मीला कसें प्रकट करूं ' या विचारानें रसादिकांचा त्याग करून ब्रह्मचर्य रूप रत्नचिंतामणीचें रक्षण करण्या साठीं मिष्टान्न भोजनाच्या इच्छेला दूर झुगारुन देउन केवळ पोटाची खळगी भरण्या साठी निर्दोष आहार ग्रहण करितो; आणि नेहमीं सावधान राहून विचार करितो कीं ' साधु होण्यांत माझा काय उद्देश आहे ! इंद्रिय निग्रह आणि शुद्ध ब्रह्मचर्य पालन हेंच माझें ध्येय आहे. ' जो साधु वर प्रमाणें वर्तन करीत नाहीं तो दवळ्या दिवसा व भरबाजारांत लुटला गेला असें समजावें. या वरून आपणाला एवढेंच ध्यानांत ठेवावयाचें आहे कीं आहाराचा परीणाम ताबड-तोब होतो म्हणून ब्रह्मचर्याचें रक्षण करण्याची इच्छा ठेवणाऱ्या साधूंनीं प्रणीत आणि गरिष्ट–कामाला ओकर प्रदीप्त करणारा आहार घेउं नये. कदाचित एखाद्यावेळीं विविक्षित परिस्थिती मुळें–मिष्टान्न भोजनाचा आहार घेतल्या शिवाय गत्यंतरच नाहीं अशी स्थिति प्राप्त झाली, तर–आहार घ्यावा लागला तर थोड

वेंगळी; पण शरीराची सुंदरता वाढविण्या साठीं, अथवा शरीर पुष्ट व्हावें म्हणून असल्या तऱ्हेचा आहार करण्याची अनीबात मनाई करण्यांत आली आहे. अशी मनाई असुन देखील जर कोणी आपल्या शरीराला घटपुष्ट करण्यासाठीं, व आपल्या रसनेंद्रियाची तृप्ति करण्या साठीं वरील प्रकारचा आहार ठेवील अथवा करील तर तो खरोखर नांवाचाच साधु—अथवा वेषधारी साधु म्हणून समजावा. खरा कर्तव्यपरायण साधु तर याहून फारच निराळा असतो. धर्मशास्त्रकारांनी साधूंना तूप, दूध, मिष्टान्न, दहीं, तेल वगैरे विकृति करणाऱ्या जिनसा खाण्याची आपल्या ग्रंथांतून ठिकठिकाणीं मनाई केली आहे साधु अथवा सत्पुरुषांचे भक्त न असल्या विकृति उत्पन्न करणाऱ्या जिनसांच्या आहाराच्या वस्तु आपल्या भक्तीच्या आवेशांत वाटेल तितक्या देतील परंतु आत्मार्थी साधुनें त्या ग्रहण कराव्यात कीं नाहीं या विषयीं विचार करण्याचा आहे. गृहस्थ संपत्ती मिळविण्या साठीं आपलें घर सोडतात तद्वतच साधु पुरुष—आत्मार्थी पुरुष—शिव मंदिरांत जाण्या साठीं (ब्रह्मपदीं लीन होण्या साठीं) आपल्या गृहाचा त्याग करितात. या साठीं प्रत्येकानें आपलें मुख्य ध्येय लक्षांत ठेवलें पाहिजे तरच त्याला आपल्या व्रत—नियमादिकांचें रक्षण करिता येईल. ध्येयाची विस्मृति झाली तर घर इकडे ना तिकडे अशी त्याची स्थिति होते. सारांश आपल्या ब्रह्मचर्य व्रताचें रक्षण करण्याची इच्छा ठेवणाऱ्यानें असा आहार पासून सर्वदैव दूर

राहिलें पाहिजे. अशा तऱ्हेचे प्रणीत आणि गरिष्ट
आपल्या साठीं नाहींत हे त्यांनीं सदासर्वदां लक्षांत ठेवले प

आठवें स्थान परिमित आहारा संबंधीं आहे.
मनाच्या साधूंनीं संयमाची आपली यात्रा पूर्ण व्हावी म्ह
संयमन करता यावें म्हणून–वेळेवर भिक्षेंत मिळालेलें निर्दो
परिमित अन्न खावें. परंतु कारणाशिवाय जास्त आहार कर
येथें कारणाशिवाय हें शब्द घालण्याचे प्रयोजन असें आ
अरण्यांतून प्रवास करावयाचा असल्यास–म्हणजे अरण्य ओ
जावयाला पुष्कळ दिवस लागतील, मध्यंतरी कोठें भिक्षेची
नाहीं, रस्त्यांत फलादि मिळणें शक्य नाहीं अशी स्थिति अ
तर–अथवा एखादी मोठी तपश्चर्या करावयाची असली तर
वेळीं पोटभरून म्हणजे नेहमीं पेक्षां थोडा जास्त आहार के
हरकत नाहीं; अशावेळीं आज्ञाभंग होत नाहीं; परंतु ए
स्वादिष्ट वस्तु भिक्षेंत आली व जिव्हेंद्रियाची लालसा तृप्त क
साठीं आपल्या नियमित आहारा पेक्षां जास्त आहार
अजीर्ण होईल इतकें जेवणें, य ा म.त्र आज्ञाभंग म्हणता
ब्रह्मचर्याचें रक्षण हें ज्याचें ध्येय आहे त्यानें परिमित अ
ठेवणें अति जरूरीचें आहे कारण आहार जास्त झाला म्ह
गाढ झोंप लागत नाहीं. नेहमीं स्वप्नें येतात. मनुष्य सर्व
जरळ जाळ विचारांत म ळविटो, व स्वप्नांत चुकून भलस
स्वप्न पडल्यास त्याचें ब्रह्मचर्य नाश पावतें.

याच बाबतींत आपण असा खोल अथवा दूरवर विचार करून पाहिला तर आपणाला असें आढळून येईल कीं धर्मशास्त्राच्या आज्ञेप्रमाणें जर आपण आपलें आहारविहार करूं लागलों तर प्राय आपल्याला रोगादि उपद्रवापासुन खात्रीनें दूर राहता येईल. रोग आपल्याला भिऊन पळून जातील. शास्त्रकार सांगतात त्याप्रमाणें आपल्या जठराचे-पोटाचे सहा भाग आहेत अशी कल्पना कराः—

अद्धमसणस्स सव्वंजणस्स कुज्जा दवस्स दो भाए ।
वाऊपवियारणट्ठा छब्भागं ऊणगं कुज्जा ॥

अर्थातः—पोटाचे सहा भाग आहेत अशी कल्पना करा; त्यांत तीन भाग शाक रहित भोजनानें भरावेत; दोन भागांत पाणी भरावें आणि राहिलेला एक भाग वायूच्या परिचारनामाठीं खाली ठेवावा. म्हणजे सहाभागा पैकीं पांच भाग शाकपाकादि अन्न आणि पाणी यानी भरावें व एक भाग अगीचात खाली ठेवावा अर्थात् ऊनोदरता अवश्य ठेवावीच. या शिवाय कलिकाल सर्वज्ञ श्रीहेमचंद्राचार्य देखील आपल्या योगशास्त्रांत असें सांगतात कीं.—" यो मितं भुङ्क्ते स बहु भुङ्क्ते "—जो थोडें खातो तो जास्त खातो. याचें असें कारण आहे कीं थोडें खाल्लेलें अन्न लौकर पचतें. शिवाय अल्पाहारापासुन दुसर दखील पुष्कळ फायदे आहेत. म्हणून ब्रह्मचर्याचें रक्षण करणाऱ्यांनीं

अल्पाहार करणें अति जरूरीचें आहे. शिवाय अल्पाहार हा जर भिक्षेंत निर्दोष रीतीनें होत असला तर जरूर करावा. पण कोणाचें आमंत्रण घेऊं नये किंवा एकाच घरच्या भिक्षाक्षचा आहार करूं नये. साधू लोकांनीं दुसऱ्याच्या येथील जेवणाची आमंत्रणें स्वीकारल्यानें अथवा एकाच घरीं भिक्षा करून त्या भिक्षेवर आपली क्षुधाशांत केल्यानें काय काय नुकसानी होते याविषयीं **परमपूज्य गुरुश्री विजयधर्मसूरि** यांनीं लिहिलेलें **गुरुतत्त्वदिग्दर्शन** नांवाचें पुस्तक वांचण्याबद्दल शिफारस करण्यांत येत आहे.

नववें स्थान म्हणजे ब्रह्मचर्यांत लीन राहणाऱ्या साधूनें स्वतःला उत्तम, सुशोभीत वगैरे वस्त्रादिकांनीं शृंगारूं नये. कारण चांगलीं वस्त्रें अंगावर घातल्यानें शरीर जास्त खुलून उठतें. तसेंच जेणेंकरून शरीराच्या शोभेत वृद्धि होईल अशा तऱ्हेची कोणतीच गोष्ट करूं नये. उदाहरणार्थ—डोई वरचे केस पद्धतशीर ठेवणें अथवा चांगले मोहक दिसतील अशा तऱ्हेनें कापणें. तसेंच दाढी चांगली दिसेल अशा रीतीनें चांगल्या ठेवणीची कापून तिला व्यवस्थेशीर विंचरणें. सारांश शरीराला मग वस्त्रप्रावरणांनीं म्हणा किंवा अन्य तऱ्हेनें म्हणा शृंगारण्याचा साधूंनीं प्रयत्न देखील करूं नये.

साधु झाल्यानंतर वस्त्र, पात्र, कांबळ आणि रजोहरण (धाग्याचा कुंचा. हा जैन साधु लोक तसेंच जैनधर्मी व क्वचित

वैष्णव लोक वापरतात. या कुंचल्याचा मुख्य उद्देश जीव जंतूंची हिंसा न घडावी हा होय.) आदि उपकरणें करण्यासाठीं आहेत याचा विचार मात्र जर साधूंना आला तर ते केव्हांही मोहांत पडणार नाहींत. शीत कालांत अग्नीला प्रदीप्त करून त्याच्या पासुन आपली थंडी दूर करण्याचें कारण पडूं नये म्हणून वस्त्राचा उपयोग आहे. जेवणांत जीव जंतु जाऊं नयेत हें पाहण्याला सुलभ पडावें तसेंच प्रसंगोपात दुसऱ्या साधु पुरुषांची सेवा करता यावी यासाठीं पात्राची योजना आहे. कांबळीचा उपयोग जीवाचें रक्षण आणि शीतादिका पासून निवारणासाठीं आहे. दव पडत असतांना—पहाटेस—धुकें पडलें असतांना तसेंच *वावळ असेल त्या वेळीं व पाऊस पडत असेल अशा वेळीं अंगा*वर कांबळी पांघरणें अतिशय जरूरीचें आहे. तसेंच कांबळी जमीनीवर आथरण्याच्या मुद्दां उपयोगी पडते. याच प्रमाणें रजोहरण—तागाचा कुंचा—आदि वस्तू या देखील जीवांच्या रक्षणासाठीं ठेवण्यात येतात. आतां या वस्तूचे ठिकाणीं जर मोह उत्पन्न झाला तर ज्या कामा करिता त्या वस्तूंचा उपयोग होणें शक्य आहे—ज्या कार्यासाठींच साधु लोक या वस्तू संग्रही ठेवितात—त्या कामीं त्या वस्तूंचा उपयोग न होतां त्या वस्तु आपण केवळ जतनच करून ठेवाव्यात अशी त्या मोहापासुन इच्छा उत्पन्न होते. शिवाय जे साधु शरीर शृंगारण्याकडे तसेंच आपण चांगले दिसावें, लोकांच्या व आपल्या भक्तजनांच्या डोळ्यांत

आपण मरून जावें म्हणून टापटीपीनें राहतात तें मी कांहीं तर महामोहांत फसले गेले असें समजावेत. पण आपण मोहांत फसलों नाहीं अशी लोकांची समजूत घालण्याचा ते येत्न करितात. त्यमनी माणमाला आपण विचारलें कीं बावा तुम्हा ला चहाचें, विडीचें अथवा दारूचें व्यसन आहे काय ? तो मनां आठवेनें उत्तर देतो कीं आम्हाला मुळींच व्यसन नाहीं ! आम्ही त्या वाचून अडत नाहीं ! त्याच प्रमाणें वरील साधूची स्थिति जाणावी. तो मोहांत सांपडला हें पूर्णपणें त्याच्या अंतःकरणास कळत समजावयाचें आहे कारण साधूचें मस्तक उघडें आणि केश शिवाय, तसेंच पाय देखील जोड्या शिवाय, तेव्हां शरीर शृंगारण्याचें प्रयोजन कुठें उरलें ! शोभा आणि विभूषा यांची मुख्य स्थानें म्हणजे मस्तक आणि पाद (पाय) व हीं दोन्हीं जर उघडी तर व्यर्थ खटाटोप आणि टापटीप करावा हवी. खरें पाहूं गेलें तर ही टापटीप काम वासना प्रदर्शित करते. म्हणून साधूंनीं शोभा आणि विभूषा यांचा देखील त्याग करावा.

आतां समाधीचें दहावें स्थान म्हणजे ब्रह्मचारी साधूंनीं शब्द, रूप, रस आणि गंध या पांच प्रकारच्या कामी गुणांना सदोदित त्याग करावा. श्रोत्रेन्द्रियाचा विषय म्हणजे शब्द-श्रोतान्द्रची विद्यमान स्थिति अशी आहे कीं कोठें कांहींही शब्द अथवा नाद झाला कीं तो श्रोत्रेन्द्रियावर येऊन पडतो व

त्याचें त्यास ज्ञान होतें. परंतु साधूनें गर्दभ अथवा उंट यांचा कठोर आवाज, व उत्कृष्ट पक्षी वीण्याचा सुमनोहर नाद या दोघांचे ठीकाणीं अनुक्रमें संताप आणि आनंद न मानतां समभावना ठेविली पाहिजे. श्रोत्रेंद्रिया प्रमाणेंच इतर इन्द्रियांचे विषया बाबतींत मनांत राग अथवा आनंद या पैकीं कोणत्याही मनोवृत्तीला थारा न देतां समभावनेनें सर्व यत्न केले पाहिजे, मग ते विषय द्वेष उत्पन्न करणारे असोत अथवा आनंद देणारे असोत म्हणजे ते चांगले असोत अथवा वाईट असोत. या प्रमाणें कामगुणाच्या निकृष्ठ शिक्षण [illegible] उत्तम तऱ्हेनें पाळतां येत नाहीं ही गोष्ट अगदीं [illegible] ठेवली पाहिजे.

हिंदुधर्म शास्त्रांतील आज्ञा.

उपर निर्दिष्ट समाधीची दश स्थानें [illegible] ध्यानांत ठेवण्यासाठी आहेत. ध्यानात [illegible] केंव नाहीं पण आपण [illegible] आणि [illegible] तर दरेक पंथांतील साधूनें समाधीचें [illegible] जेव अशी धर्म मर्यादा आहे [illegible] सातव्या अध्यायांत [illegible]

ब्रह्मचर्य [illegible]
स्मरणं कीर्तनं [illegible]

संकल्पोऽध्यवसायश्च क्रियानिर्वृत्तिरेव च ।
एतन्मैथुनमष्टांगं प्रवदन्ति मनीषिणः ॥ ३२ ॥

अर्थात्:—मैथुन आठ प्रकारचें आहे. स्मरण, कीर्तन, क्रीडा, निरीक्षण (पाहणें) गुह्य भाषण, संकल्प, अध्यवसाय आणि क्रियेची उत्पत्ति (कुचेष्टा). वर प्रमाणें मैथुनाचे आठ प्रकार सांगितले असल्यामुळें ब्रह्मचर्याचें रक्षण देखील आठ प्रकारांनीं करण्याचें आहे. अर्थात् उपर्युक्त मैथुनाच्या आठ प्रकारापासुन दूर राहिल्यानेंच ब्रह्मचर्याचें रक्षण होणें शक्य आहे.

याच प्रमाणें उशन स्मृतीच्या तिसरा अध्यायांत देखील सांगितलें आहे कीं:—

अनन्यदर्शी सततं भवेद् गीतादिनिःस्पृहः ।
नादर्शं चैव वीक्षेत न चरेद्दन्तधावनम् ॥ २० ॥

अर्थात्:—साधूनें जेथें तेथें दृष्टि टाकूं नये, गीत वगैरे विषयीं निःस्पृह रहावें, आरशांत तोंड पाहूं नये व दांतण (तोंड-धुणें) करूं नये. अर्थात् शरीराला कोणत्याही प्रकारें सुशोभित करूं नये.

वरील आज्ञा तर आहेतच. या शिवाय स्मृतिकार मनु आपल्या मनुस्मृतीच्या दुसऱ्या अध्यायांत असें सांगतात कीं:—

मात्रा स्वस्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत् ।
बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥ २१८ ॥

अर्थात्—आई, बहीण आणि कन्या यांचे बरोबर देखील मनुष्य रहित स्थानांत एका आसनावर बसूं नये; कारण बलवान् असा इन्द्रियांचा समूह विद्वानांना देखील विषयाकडे ओढून नेतो.

हें देखील समाधीचें स्थान अथवा विद्या नाहीं तर काय ?

याच प्रमाणें श्रीमद् भागवताच्या अकराव्या स्कन्धांतील चौदाव्या अध्यायांत देखील सांगितलें आहे कीं:—

स्त्रीणां स्त्रीसंगिनां संगं त्यक्त्वा दूरत आत्मवान् ।
क्षेमे विविक्त आसीनश्चिन्तयेन्मामतन्द्रितः ॥

अर्थात्—स्त्रीयेचा आणि तिच बरोबर असणाऱ्या तिच्या सहचरीचा देखील त्याग करून आत्महितेच्छु पुरुषानें निर्भय-निरुपद्रवी स्थानाचें ठिकाणीं रहावें आणि अप्रमादी राहून माझें चिंतन करावें.

याच स्कंधांत पुढें असें ही सांगितलें आहे कीं:—

न तथाऽस्य भवेत् क्लेशो बन्धश्चान्यप्रसङ्गतः ।
योषित्संगाद्यथा पुंसो यथा तत्संगिसङ्गतः ॥ १० ॥

अर्थात्:—स्त्रीयेच्या संगतीनें—सहवासानें—तसेंच तिच्या सहचरी बरोबर प्रसंग पडला तर, त्यामुळें जे क्लेश आणि बंधन होते त्या प्रकारचें अन्य पुरुषांच्या संगतीनें, सहवासानें अथवा त्यांचे बरोबर प्रसंग पडल्यानें क्लेश किंवा बंधन होत नाहीं.

वरील प्रमाणावरून आपल्या लक्षांत येऊन चुकलें असेल कीं साधु पुरुषांनीं ब्रह्मचर्याचें रक्षण करावें म्हणून हिंदुधर्मशास्त्रांत देखील साधूनीं अमुक अमुक नियम पाळावेत म्हणून सांगितलेलें आहे. वर प्रमाणभूत दाखविलें आहेत या शिवाय याच आणि ईतर धर्म ग्रंथातून ब्रह्मचर्य पालनाविषयीं ठिकठिकाणीं आज्ञा आणि नियम आहेत पण ते सर्व देऊन ग्रंथ गौरव करण्याचे व त्याच त्या बाबतीनें चर्वितचर्वण करणें युक्त नसल्यानें नमुन्या दाखल वरील नियम दाखविण्यांत आले आहेत.

बौध्य धर्मशास्त्रांतील आज्ञा.

बौध्य धर्मग्रंथातून देखील बौध्यसाधूंनीं ब्रह्मचर्य पालन करावें म्हणून वरील प्रमाणेंच त्रित्येक नियम सांगण्यांत आले आहेत. उदाहरणार्थ—

१ यो पन भिक्खु मातुगामेन सद्धिं सहसेय्यं कप्पेय्य, पाचित्तियं।

७ यो पन भिक्खु मातुगामस्स उत्तरि छप्पञ्चवाचाहि धम्मं-
देसेय्य अञ्ञत्र विञ्ञुना पुरिसविग्गहेन, पाचित्तियं ।
(भिक्खु पातिमोक्खं, पाचित्तिया धम्मा, पृ. २९)

अर्थात्—जो कोणी भिक्षु (बौद्ध धर्मातील साधु) स्त्री बरोबर एकान्त ठिकाणी—ज्या आसनावर अथवा आंथरुणावर स्त्री निजली असेल त्या आसनावर अथवा आंथरुणावर अथवा ज्या खोलींत स्त्री एकटी असेल त्या खोलींत—शयन करील तर तो प्रायश्चित्ताचा भागीदार होईल म्हणजे त्याला त्या बद्दल प्रायःश्चित घ्यावें लागेल तसेंच ज्ञानी पुरुषाच्या गैरहजरींत अथवा सुज्ञ पुरुषाची साक्ष न ठेवितांना जो कोणी साधु एकाद्या स्त्रीला पांच अथवा सहा वाक्या पेक्षा जास्त धर्मोपदेश देईल तो देखील प्रायःश्चित्ताच्या वांटेकरी होईल म्हणजे त्याला पण प्रायःश्चित घ्यावें लागेल.

कितीतरी कडक निर्बंध. दुसऱ्या शहाण्या पुरुषांच्या गैरहजरींत स्त्रीला धर्मोपदेश देखील देण्याची सक्त मनाई करण्यांत आली आहे.

हें तर एकांतात असतांना मना करण्यांत आली आहे त्या बद्दलचें वचन; पण बौद्ध धर्मातील त्याच ग्रंथांत एथ पर्यंत सांगितलें आहे कीं:—

२१ यो पन भिक्खु असम्मतो भिक्खुनियो ओवदेय्य, पाचित्तियं ।

२२ सम्मतोपि चे भिक्खु अत्थं गते सुरिये भिक्खुनियो ओवदेय्य, पाचित्तियं ।

२३ यो पन भिक्खु भिक्खुनूपस्सयं उपसङ्कमित्वा भिक्खुनियो ओवदेय्य अञ्ञत्र समया, पाचित्तियं ।

(. २८)

अर्थात्‌:—जो कोणी भिक्षू संघाची संमति घेतल्या शिवाय साध्वींना उपदेश देतो तो प्रायःश्चित्ताचा वाटेकरी आहे. शिवाय संघाची संमति घेऊन देखील जर तो सूर्यास्ता नंतर साध्वींना उपदेश देईल तरी देखील तो प्रायःश्चित्ताचा भागीदार होईल. तसेंच कोणी एखाद्या साधूनें, एखाद्या साध्वीला अमूक रोग झाला अशा तऱ्हेच्या कारणा शिवाय, अर्थात्‌ कारण नसतांना साध्वीला तिच्या घरीं जाऊन अथवा ती बसली असेल तेथें जाऊन उपदेश दिला तरी देखील तो प्रायःश्चित्ताचा वाटेकरी आहे म्हणजे त्याला प्रायःश्चित्त घ्यावें लागेल.

या शिवाय स्त्रीया बरोबर सहवास न ठेवण्या बाबतींत अथवा स्त्रियांना विशेष संसर्ग नसावा अशा विषयीं धर्मग्रंथांतून ठिकठिकाणीं आणखी देखील पुष्कळ नियम आणि वर्णनें आहेत.

व हें सर्व कशा साठीं ? तर ब्रह्मचर्य पालना साठीं. स्त्रियांचे बरोबर विशेष संसर्ग ठेवणारा मनुष्य मग तो गृहस्थाश्रमी असो, ब्रह्मचारी असो अथवा साधु वा संन्यासी असो, तो अखंड ब्रह्मचारी राहणें कदापि शक्य नाहीं. स्त्रीसंसर्गाचा प्रभावच एवढा जबरदस्त आहे कीं मी मी आणि ज्ञानी म्हणविणाऱ्यांच्या प्रतीक्षा देखील तो पालटवितो. म्हणून स्त्रियांशी विशेष संसर्ग ठेवणें अहितकारक आहे.

याच प्रमाणें ब्रह्मचर्याचें रक्षण व्हावें म्हणून बौद्धसाधूंनी भोजनादि व्यवहारांत देखील व्यवस्थशीरपणा, विचार वगैरे ठेवण्या बाबतींत वरील ग्रंथांतच कांहीं नियम घालून दिले आहेत.

३१ अगिलानेन भिक्खुना एको आवसथपिण्डो भुञ्जितब्बो, ततो चे उत्तरिं भुञ्जेय, पाचित्तियं।

३३ परम्परभोजने अञ्ञत्र समया, पाचित्तियं।

३७ यो पन भिक्खु विकाले खादनीयं वा भोजनीयं वा खादेय्य वा भुञ्जेय्य वा, पाचित्तियं।(पृ. २९. १०)

अर्थात्:–अपीडित साधूने आवसथांतील (आवसथ–बौद्धांच्या सांकेतिक विश्रामगृहाचें नांव.) पिंड घेऊन एकच वेळ भोजन करावें. जर एकापेक्षा अधिक आवसथ पिंडांचें ग्रहण केलें–भोजन केलें–तर तो प्रायश्चित्ताचा अधिकारी होतो. शिवाय

3

शरीर पीडा वगैरे सारख्या विवक्षित कारणाशिवाय जो अनेकदां —वारंवार—भोजन करतो असा साधु देखील प्रायःश्चित्ताचा वाटेकरी होतो. तसेंच जो कोणी साधु अकालीं खाद्य वस्तु खातो, आणि भोज्य वस्तूंचें भोजन करतो म्हणजे अकालीं खानपानादि व्यवहार करितो, तो देखील प्रायश्चित्ताचा वाटेकरी होतो.

याच प्रमाणें तूप, दूध, दहीं, तेल आणि गूळ वगैरे गरिष्ट (पचावयाला कठीण) पदार्थांचें सेवन बौद्ध साधूंनीं करूं नये असेंही सांगण्यांत आलें आहे इतकेंच नाहीं पण साधूंनीं काय काय खावें आणि त्यांना निषिद्ध कोणतें या विषयीं नियम करण्यांत आले आहेत.

हे सर्व नियम केवळ ब्रह्मचर्याचें रक्षण व्हावें म्हणूनच घालण्यांत आले आहेत. कोणत्याही कारणानें इंद्रियांना उत्तेजन मिळूं नये आणि प्रयास न करिता—सहजरीत्या—इंद्रिय दमन व्हावें याच विशिष्ट मुद्यावर वरील सर्व नीयमांची रचना करण्यांत आली आहे. जे या नियमांचें उल्लंघन करितात ते उघड अथवा प्रत्यक्षपणें मन, वचन आणि काया या त्रयीच्या सहायानें देखील ब्रह्मचर्य पाळूं शकत नाहींत.

साधूचा खरा आणि सर्वोत्तम अलंकार म्हणजे ब्रह्मचर्य.

सत्पुरुषांनीं एवढे कडक नियम करण्याचें हेंच कारण आहे

कीं साधूंच्या चारित्र्याचें—साधुत्वाचें—खरें आभूषण म्हणजे ब्रह्मचर्य होय. एखाद्या साधूनें हजारों प्रकारच्या कठिण क्रिया केल्या त्याच्या मस्तकावरील केश उपटून काढण्यांत आले, त्यानें अतिशय कठिण तपश्चर्या केली अथवा गंगातटाकीं जाऊन पंचाग्नि घेऊन ते कष्ट सहन करण्यांत त्यानें पराकाष्टा केली पण त्याच साधूच्या ठिकाणीं एकाच गोष्टीचा म्हणजे ब्रह्मचर्याचा अभाव असला तर त्याच्या सर्व क्रिया त्याची सर्व कठिण तपश्चर्या आणि यानें सहन केलेले सर्व कष्ट निरुपयोगी होत. ब्रह्मचर्या-पासून परिभ्रष्ट झालेला साधु इहलोकींचे जीवनाची तर खराबी करतो इतकेंच नाहीं पण त्याची परलोकची अथवा भविष्यकाळची जीवन यात्रा देखील कष्टमय होते. परलोकांत त्याला नरकादी ? भोगावे लागतात. शतातप स्मृतीच्या १९ व्या अध्यायांत सांगितलें आहे कीं:—

यस्तु प्रव्रजितो भूत्वा पुनः सेवेत मैथुनम् ।
षष्टिर्वर्ष सहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥ ६० ॥

अर्थात्—दीक्षा घेतल्या नंतर म्हणजे संन्यासी झाल्या नंतर जो मनुष्य पुनः विषय सेवन करितो तो साठ हजार वर्षे पर्यंतों विष्टेमध्यें किडा होऊन राहतो.

याच प्रमाणें दरेक धर्मशास्त्रांतून ब्रह्मचर्य व्रताच्या भंग

पासून ओस्त्रगारीं भयंकर दुःखें सांगितलीं आहेत. व ही गोष्ट देशीत अक्षरशः खरी आहे. कारण साधूची स्थिति ही एक उच्च कोटीची अवस्था आहे. अशा तऱ्हेची परिस्थिति प्राप्त केल्या नंतर म्हणजे उन्नतीच्या शिखरावर पोहोंचल्यावर मग आंतून अशा तऱ्हेचें—ब्रह्मचर्य भंगाचें नीच काम करण्यांत आलें तर याहून दुसरें भयंकर पाप तें कोणतें ? शरीरावर ज्यांनीं साधू चा वेष धारण केला आहे—जे आपल्याला साधु म्हणून म्हणवितात—त्यांनीं जर ब्रह्मचर्य पाळलें नाहीं म्हणजे ब्रह्मचर्याचें पालन त्यांनें करून भंग झाला तर त्याची वृत्ति म्हणजे ओकलेलें खाण्या सारखीच आहे. ज्या वस्तूंचा त्याग केला ती वस्तु पुन उपभोगास आणणें म्हणजे ओकलेलें खाणें—वमन भोजन—नाहीं काय ? वमन भोजना शिवाय याला दुसऱ्या कोणत्या शब्दानें संबोधावें ?

तदेव त्या सर्वांना अथवा वेषाचा साधु आणि प्रत्येक सर्वो-त्तम अवस्था सर्व वर्णांतील साधूंनें ब्रह्मचर्य पाळलें पाहिजे व त्यांनीं सर्व प्रकारें एक शास्त्रीय नियम सांगितले आहेत. कोण त्याही दृष्टांतानें ब्रह्मचारी साधूला स्त्री जातीची संगतही होऊं नये. सिद्धसेन सूरीश, भद्रबाहु, हेम आणि यशोवि जये यांनी ब्रह्मचर्याचे विचार सांगितले आहेत, व या सर प्रका रच्या ब्रह्मचर्याच्या बाबत नियमांचा विवेचनीं [illegible]

दाखविले असून प्रत्येकाचे आचार विचार निरनिराळे सांगितले आहेत. परंतु ब्रह्मचर्याच्या बाबतींत तर कोणात्याही प्रकारचा फरक नाहीं म्हणजे ब्रह्मचर्य हें व्रत तर कोणत्याही प्रकारच्या साधूनें—संन्यास्यानें—पाळिलेंच पाहिजे असें आहे. ब्रह्मचर्याच्याच एका बाबतींत मात्र एकवाक्यता आहे; म्हणून प्रत्येकानें ब्रह्मचर्य तर पाळलेंच पाहिजे. जैन साधूच्या कांहीं विशिष्ट क्रियांत फारच कडकपणा दाखविला आहे कीं अमकी एक क्रिया जैन साधूनें केलीच पाहिजे. उदाहरणार्थ —लोच म्हणजे मस्तकावरील केश उपटून काढणें. दरेक साधूनें आपल्या मस्तका वरील केश उपटून काढले पाहिजेत अशी आज्ञा आहे; पण अपवाद रुपानें रोग वगैरेदि कारणा मुळें लोच विधिची माफी देणेंत आली आहे. साधूनें रोगादि कारणामुळें लोच न केला तरी चालते. तशी मात्र ब्रह्मचर्याची गोष्ट नाहीं. वाटेल त्या परिस्थितींत ब्रह्मचर्य हें पाळलेंच पाहिजे अशी आज्ञा आहे. ब्रह्मचर्याच्या आज्ञे बाबतींत मात्र अपवाद म्हणून कोठेंही सोडवणूक नाहीं.

शिवाय जो साधु संदैव ब्रह्मचर्यव्रतानें राहतो व आपल्या वीर्याचा कोणत्याही तऱ्हेनें नाश करीत नाहीं त्या साधुचे ठिकाणीं शारीरिक आणि मानसिक या दोन्ही प्रकारच्या शक्ति इतक्या उत्तम तऱ्हेनें वास करीत असतात कीं त्याला रोगासाठीं कधींही औषध घेण्याची जरूरीच पडत नाहीं. औषध घेण्याची गोष्ट तर दूरच राहिली पण उलट प्रत्येक कामांत त्याचा उत्साह

दांडगाँ असतो व योजलेलें काम तो सहजगत्या करून आपल्या योजलेल्या कामांत अपयश येईल अथवा तें कर्से होईल ही कल्पना देखील त्याला शिवत नाहीं; पण ... स्थिति याच्या अगदींच उलट आहे. आजकालच्या कित्येक धारी साधु–संन्यासी–यांच्या ब्रह्मचर्याविषयीं आपल्या मनांत खरोखर शंका आल्या शिवाय रहात नाहीं. अशक्तता, खोकला दम, छातींत दुखणें, डोकें दुखणें, व मेंदु क्षीण होणें वगैरे सारखीं अनेक कारणें पुढें करून जिकडे तिकडे साधु आणि संन्यासी चंद्रोदय, वसंतमालिनी, मौक्तिकभस्म, ताम्रभस्म, बादशाही याकुती वगैरे ओषधींचें सेवन करताना दृष्टीला पडतात इतकेंच नाहीं पण त्यावर दूध, मलई आदि इतर पौष्टिक पदार्थ कीं जे खाण्याविषयीं साधूंना सक्त मनाई करण्यांत आली आहे त्या निषिद्ध पदार्थांचें सेवन करितात. याचें काय बरें कारण असावें ? त्यांनीं जर आपल्या वीर्याचा नाश केला नसला अथवा जर ते आपल्या वीर्याचा नाश करीत नसले व आपले ब्रह्मचर्यव्रताचा भंग होऊं नये अशी त्यांची खरोखर इच्छा असली अथवा कामसेवनाची त्यांची इच्छा नसली तर अशा तऱ्हेच्या औषधीं व त्या औषधींवर अशा तऱ्हेच्या पौष्टिक पदार्थांचें ते साधु सेवन तरी करतील काय! त्या औषधींपेक्षां वीर्यरक्षण काय कमी शक्ति देणारें आहे ! केव्हांही त्या औषधींपेक्षां वीर्यरक्षणानें जास्तच शक्ति येणार. वीर्याचें

रक्षण केल्यानें कोणत्याही प्रकारच्या रोगाला येण्याला वाव मिळत नाहीं इतकेंच नाहीं पण शरीरांत घर करून बसलेले श्वास खोकला, क्षय, प्रमेह आदि रोग देखील वीर्य रक्षणानें लौकर बरे होतात. परंतु जेव्हांची गोष्ट एवढीच कीं मनुष्यें ब्रह्मचर्यव्रताचें पालन करूं शकत नाहींत. जर पाळूं गेलें तर ब्रह्मचर्यव्रतानें राहणाऱ्याला औषध देण्याचें कारणच पडत नाहीं. यावरून असें समजावयाचें नाहीं कीं हवापाणी यांची शरीर रक्षणाला जरूरी नाहीं; किंवा ते कारणीभूत नाहींत. चांगलें हवापाणी शरीर रक्षणाला अवश्य आहे पण हवापाणी अतिशय उत्तम असलें व रोगी मनुष्य त्या ठिकाणीं वीर्याचें रक्षण करणार नाहीं आणि वीर्याचा वाटेल तसा दुरुपयोग करील तर त्या चांगल्या हवेचा व पाण्याचा काय उपयोग होणार ! म्हणून वरील नियम मुद्दाम ध्यानांत ठेऊन दरेक साधूनें तसेंच दरेक साध्वीनें आपल्या शरीराचें उत्तम प्रकारें रक्षण व्हावें म्हणून व आपलें चारित्र्य उज्ज्वल राहावें म्हणून ब्रह्मचर्यानें राहिलेंच पाहिजे.

गृहस्थांनीं पाळावयाचें ब्रह्मचर्य.

आतां आपण गृहस्थांनीं कोणत्या तऱ्हेचें ब्रह्मचर्य पाळावयाचें या विषयाकडे वळूं. गृहस्थांच्या गृहस्थाईचें मूळ देखील ब्रह्मचर्यच आहे. अर्थात् गृहस्थांना देखील ते आपल्या मर्यादेंत राहतील, आपल्या अधिकाराचें उल्लंघन करणार नाहींत तरच

दांडगों असतो व योजलेलें काम तो सहजगत्या करून टाकतो आपल्या योजलेल्या कामांत अडथळा येईल अथवा तें कसें होईल ही कल्पना देखील त्याला शिवत नाहीं; पण आजकालची स्थिति याच्या अगदींच उलट आहे. आजकालच्या कित्येक नाम धारी साधु–संन्यासी–यांच्या ब्रह्मचर्याविषयीं आपल्या मनांत खरोखर शंका आल्या शिवाय रहात नाहीं. अशक्तता, खोकला, दम, छातींत दुखणें, डोकें दुखणें, व मेंदु क्षीण होणें वगैरे सारखीं अनेक कारणें पुढें करून जिकडे तिकडे साधु आणि संन्यासी चंद्रोदय, वसंतमालिनी, मौक्तिकभस्म, ताम्रभस्म, बादशाही याकुती वगैरे औषधींचें सेवन करताना दृष्टीस पडतात इतकेंच नाहीं पण त्यावर दूध, मलई आदि इतर पौष्टिक पदार्थ कीं जे खाण्याविषयीं साधूंना सक्त मनाई करण्यांत आली आहे त्या निषिद्ध पदार्थांचें सेवन करितात. याचें काय खरें कारण असावें ? त्यांनीं जर आपल्या वीर्याचा नाश केला नसला अथवा जर ते आपल्या वीर्याचा नाश करीत नसले व आपलें ब्रह्मचर्यव्रताचा भंग होऊं नये अशी त्यांची खरोखर इच्छा असली अथवा कामसेवनाची त्यांची इच्छा नसली तर अशा तऱ्हेच्या औषधीं व त्या औषधींवर अशा तऱ्हेच्या पौष्टिक पदार्थांचें ते साधु सेवन तरी करतील काय? त्या औषधीपेक्षां वीर्यरक्षण काय कमी शक्ति देणारें आहे ? केव्हांही त्या औषधीपेक्षां वीर्यरक्षणानें जास्तच शक्ति येणार. वीर्याचें

वीर्य रक्षण कर्मीत कमी कोठ पावेतों करावें ?

अमुक वर्षे पावेतों गुरु समागमांत गुरुगृहीं ब्रम्हचर्य व्रत पाळून गुरुमुखें संपूर्ण विद्या संपादन करणें याला ब्रम्हचर्याश्रम म्हणतात. या प्रमाणें ब्रम्हचर्याश्रमी अथवा ब्रम्हचर्यव्रतानें पालन करून विद्या संपादन करणारे आज किती जण आहेत ! पूर्वकाली असा नियम होता कीं आईबापांनीं आपल्या मुलाला स्वतः जवळ, आपला मुलगा आठ वर्षांचा होई पावेतों ठेवावा; व तदनंतर पंचवीस वर्षांचा होई पावेतों त्याला गुरूजवळ ठेवीत असत. गुरुगृहीं हें बालक ब्रम्हचर्यव्रतानें राहून विद्याभ्यास करीत असे. हिंदु धर्मशास्त्रांतील छांदोग्य उपनिषदांत असें सांगितलें आहे कीः—"मुलानें पांच वर्षांचा होई पावेतों आईजवळ राहावें तदनंतर आठ वर्षांचा होई पावेतों बापाजवळ असावें; व तदनंतर म्हणजे नवव्या वर्षा पासून ४८, ४४, ४०, ३६, ३० निदान २५ वर्षांचा होई पावेतों गुरुगृहीं ब्रम्हचर्यव्रतानें तसेंच जितेन्द्रिय राहून त्यानें विद्या संपन्न करावी. त्याच प्रमाणें मुलीनें देखील आपल्या वयाच्या नवव्या वर्षांपासून २४, २२, २०, १८ निदान १६ व्या वर्षांपावेतों गुरुगृहीं ब्रम्हचर्यव्रतानें व जितेन्द्रिय राहून विद्या संपादन करावी. असा तऱ्हेनें गुरुगृहीं ब्रम्हचर्यव्रतानें राहणारे कुमार व कुमारी हेच विद्वान होतात व धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांच्या सुखाचा अनुभव घेउन परमानंदाची प्राप्ति करूं शकतात."

गृहस्थावस्थेंत खरें सुख अनुभवितां येईल नाहींतर त्यांना देखील त्यांचें जीवन अतिशय कष्टमय स्थितींत घालवावें लागेल. या संसारांत जन्म घेऊन जीं मनुष्यें आपल्या मर्यादेंत राहत नाहींत —मर्यादेंचें उल्लंघन करितात—तें भय, शोक आणि चिंता यांतच आपलें जीवन रात्रंदिवस गाळतात. अशीं पुष्कळ मनुष्यें आपण पाहतों कीं ज्यांच्या नशीबीं जन्मपर्यंत सुखाचा वास नसतो. मरेपर्यंत बिचाऱ्यांना शरीर सुखाची कल्पना देखील शिवत नाहीं याचें इतकेंच कारण आहे कीं जन्मापासून ज्या तऱ्हेनें रहावें त्या तऱ्हेनें तें राहिले नाहींत—अथवा राहूं शकले नाहींत; व एवढ्या साठींच तर असें सांगण्यांत येतें कीं:—मनुष्यानें आपल्या जीवन रूपी इमारतीचा पाया इतका मजबूत करावा कीं त्या जीवनरूपी इमारतीला केव्हांही धोका होण्याचा थोडा देखील संभव नसावा. कोणत्याही अरिष्टाचें त्या इमारतीला भय नसावें. घर बांधणारे ज्या प्रमाणें घराचा पाया मजबूत करितात—पायाच्या कामावर विशेष लक्ष ठेवितात, कारण पायावरच सर्व इमारतीचा आधार असतो—त्याच प्रमाणें प्रत्येकानें आपल्या जीवनाचा पाया वीर्य रक्षणानें खूप मजबूत करून ठेविला पाहिजे व ह्या हेतूनेंच हिंदु धर्मशास्त्रांत मनुष्याच्या जीवनाचे चार विभाग पाडून प्रत्येक विभागांत एकेक आश्रम दाखल केला आहे. त्या चार आश्रमांतील पहिला म्हणूनच व याऱूपी आश्रम ब्रह्मचर्याश्रम होय.

वीर्य रक्षण कर्शीन कमी कोठ पावेतों करावे ?

अमुक वर्षे पावेतों गुरु समागमांत गुरुगृहीं ब्रम्हचर्य पाळून गुरुमुखें संपूर्ण विद्या संपादन करणें याला ब्रम्हचर्याश्रम ह्मणतात. या प्रमाणें ब्रम्हचर्याश्रमी अथवा ब्रम्हचर्यव्रताचें पालन करून विद्या संपादन करणारे आज किती जण आहेत ! पूर्वकाली असा नियम होता कीं आईबापांनीं आपल्या मुलाला स्वतः जवळ, आपला मुलगा आठ वर्षांचा होई पावेतों ठेवावा; व तदनंतर पंचवीस वर्षांचा होई पावेतों त्याला गुरूजवळ ठेवीत असत. गुरुगृहीं हें बालक ब्रम्हचर्यव्रतानें राहून विद्याभ्यास करीत असे. हिंदु धर्मशास्त्रांतील छांदोग्य उपनिषदांत असें सांगितलें आहे कीं.—" मुलानें पांच वर्षांचा होई पावेतों आईजवळ राहावें तदनंतर आठ वर्षांचा होई पावेतों बापाजवळ रमावें; व तदनंतर म्हणजे नवव्या वर्षा पासून ४८, ४४, ४०, ३६, ३० निदान २५ वर्षांचा होई पावेतों गुरुगृहीं ब्रम्हचर्यव्रतानें तसेंच जितेन्द्रिय राहून त्यानें विद्या सरत करावी. त्याच प्रमाणें मुलीनें देखील आपल्या वयाच्या नवव्या वर्षापासून २४, २२, २०, १८ निदान १६ व्या वर्षापावेतों गुरुगृहीं ब्रम्हचर्यव्रतानें व जितेन्द्रिय राहून विद्या संपादन करावी. अशा तऱ्हेनें गुरुगृहीं ब्रम्हचर्यव्रतानें राहणारे कुमार व कुमारी हेच विद्वान होतात व धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष यांच्या सुखाचा अनुभव घेऊन परमानंदाची प्राप्ति करूं शकतात. "

उपनिषदांतील वरील विवरणावरून आपणाला हें कळून येईल की पुरुषानें कमीतकमी आपल्या वयाच्या २५ व्या वर्षा पावेतों व स्त्रीनें कमीतकमी आपल्या वयाच्या १६ व्या वर्षा पावेतों ब्रम्हचर्य पाळलें पाहिजे.

उपनिषदांत सांगितलेल्या नियमानें चालणारा मनुष्य आपल्या शरीराला इतकें सुदृढ करूं शकतो कीं भविष्यकाळीं त्याला कोणत्याही तऱ्हेची पीडा होत नाहीं अथवा भविष्य काळीं त्याला कोणत्याही तऱ्हेची शारीरिक यातना भोगावी लागत नाहीं. ब्रम्हचर्य पाळण्या बाबतीचा हा नियम शरीर शास्त्राच्या नियमाशीं अगदीं जुळता आहे. कारण शरीर शास्त्राच्या नियमा प्रमाणें असें सांगण्यात येते कीं--" मनुष्यांच्या शरीरांत सात धातु आहेत. १ रस, २ रुधिर, ३ मांस, ४ मज्जा, ५ मेद, ६ अस्थि, आणि ७ वीर्य. या सात धातूत पंचवीस वर्षे पावेतों वाढ होत असते. २५ पासून ४० व्या वर्षा पावतों यौवनाचें पोषण होऊन सर्व धातू पुष्ट होतात, व त्या वयांत शरीराचा आकार, शरीराचा बांधा, व एकंदर अंगकाठी बरोबर पूर्ण होते; व तदनंतर त्यांत क्षीणता येऊं लागते. आणि हळू हळू सुमारें शंभर वर्षांच्या वयाला या शरीराचा नाश होतो. "

जैनधर्म शास्त्रांत देखील वरील नियमा प्रमाणेंच नियम आहे. जैनागमांत देखील ठिकठिकाणीं 'जोव्वणगमणमणुपत्ता'

जो बदल आहे. अर्थात जेव्हां स्त्री आणि पुरुष यौवनामध्ये
न येतां वर्तनात तेव्हांच त्यांचें लग्न करावें. शिवाय प्रवचन-
सारोद्धार नांवाच्या ग्रंथात असें सांगितलें आहे की सोळा
वर्षांची स्त्री व पंचवीस वर्षांचा पुरुष यांच्या संयोगा पासून जें
संतान उत्पन्न होतें तें बलवान आणि सुदृढ निपजतें. या प्रवचन
सारोद्धार ग्रंथांतील वरील वचना वरून बाल विवाह आणि वृद्ध
विवाह या दोहोंचा निषेध म्हटलेला सिद्ध होतो.

वरील नियमाबद्दल वैद्यक शास्त्राच्या हें म्हणणें ध्यानांत ठेवावें की २१ वर्षें पावेतों तर शरीराच्या वाढीशी वाढ होत असते. व या काळांत शरीर वाढीच्या नाशाचे उपाय योजणें म्हणजे निसर्गाच्या विरुद्ध वर्तन करण्या सारखेंच आहे इतकेंच नाहीं पण निसर्गा बरोबर युद्ध करण्या सारखें आहे. निसर्गाशी युद्ध करून आजपावेतों कोणी जिंकला आहे काय ! ज्या वेळेस तलावांत पाणी भरण्याला सुरवात होते त्याच वेळीं दुसऱ्या बाजूनें पाणी जाण्याचा मार्ग खुला केला तर तलावांत केव्हां तरी पाणी भरेल काय ! व अशा तऱ्हेनें कृत्य करणारा इसम तलाव पाण्यानें भरलेला पाहण्यास कधीं तरी भाग्यशाली होईल काय ! आपल्याला आंबे खावयाला मिळावेत या हेतूनें आम्रवृक्ष लावला व ज्या वेळेला त्या अंकुराच्या झाडाच्या बुंध्या मजबूत होण्याचा काळ असेल त्याच वेळेला,

खाण्याची अथवा आम्ररसाची इच्छा करणाऱ्या इसमानें त्या वृक्षावर कुऱ्हाडीचा घाव केला तर त्याची इच्छा कधीं तरी पूर्ण होईल काय ? वर्तमान काळांत ब्रम्हचर्यव्रताची काय स्थिति आहे त्याकडे आपण थोडेंसें लक्षपूर्वक पाहूंया. मुलगा आठ वर्षांचा होतो न होतो तोंच त्याला असल्या वाईट खोडी लागतात कीं तेव्हां पासूनच तो वीर्यनाश करावयाला सुरु करतो. कित्येकांचे आईबाप याच वयांत आपल्या मुलांचे मोठ्या हौसेनें लग्न करितात. व आपल्या लहानग्या मुलाशी एखाद्या मुलीचा (लहान मुलींना खेळांतील बाहुली) अर्थात मुलगी एवढ्या मुलीचा पति करण्याचे व त्या मुलीला सौभाग्यवती (! ! !) करण्याचे श्रेय (! ! !) संपादन करितात. मुलगा म्हणजे एक मुलगा व त्याची विवाहिता पत्नी म्हणजे एक मुलगी. या मुलगा मुलगीच्या खेळाचा परिणाम मोठाच मजेदार घडावयाला मिळतो. तो मुलगा चौदा अथवा पंधरा वर्षांचा होत नाहीं तोंच कुमारिकेच्या तिला सारख्या लहान मुलाचा बाप होऊन बसतो व एखादी अर्भक म्हणजे कन्या वयी प्रमाणें असलेली १०-१२ वर्षांची बालिका मुलाची आई होऊन बसते. पंधरा वर्षांचा बाप व १०-१२ वर्षांची आई या पेक्षां जास्त उद्वेगजनक स्थिति ती कोणती ! शारीरिक स्थितीला भयंकर प्राचीन काळचे अधिकारी पुरुष झुगारून देण्या सारखे आचरण करण्याचा काळ कधींतरी

पंचवीसावें वर्षापासुन चाळीसाव्या ' वर्षापावेतों दाखवितात. त्यांच्या मतें २५ ते ४० हाच गृहस्थाश्रमाचा उत्तमोत्तम काल आहे पण सद्यस्थिति कडे पाहिल्यास गृहस्थाश्रमाची गोष्ट तर बाजूलाच राहूंद्या पण ज्या वयांत ब्रह्मचर्याश्रमाच्या बाराखडीला सुरवात व्हावयाची त्या कालांत अर्थात वयाच्या १४ व्या अथवा पंधराव्या वर्षी ब्रह्मचर्याश्रमांत अर्धी उमेदवारी करणारे उमेदवार ब्रह्मचर्याश्रमाची परीक्षा न देता तसेंच गृहस्थ श्रमांतील प्रवेश परीक्षेची तयारी देखील न करितां गृहस्थाश्रमाच्या परिक्षेंत उत्तीर्ण झाल्या बद्दलचें सरटिफिकीट अथवा दाखला मिळवितात—याला बीसाव्या शतकाचा ब्रह्मचर्याश्रम म्हणावा किंवा ब्रह्मचर्याश्रमाच्या फार्स म्हणावा हेंच समजत नाहीं। बा बीसाव्या शतका! धन्य आहे तुझी!! ज्या वयांत वीर्य देखील परिपक्वदशेला आलें नाहीं त्या दशेंतील अपरिपक्व वीर्यापासुन उत्पन्न झालेले बालक दीर्घायुषी आणि सशक्त होणें संभवनीय तरी आहे काय! या बाबतींत थोडा जरी विचार केला तरी समजण्या सारखे आहे कीं सुदृढ व निरोगी संतती हवी असली तर ठराविक काल पावेतों स्त्री आणि पुरुष या दोघांनीं ब्रह्मचर्यव्रताचें शास्त्राज्ञे प्रमाणें पालन केलें पाहिजे, खरोखर पाहूं गेलेतर सुप्रसिद्ध चरक ग्रंथांत असें सांगिले आहे कीं:—

ऊनषोडशवर्षायामप्राप्तः पंचविंशतिम् ।
यद्याधत्ते पुमान् गर्भं कुक्षिस्थः स विपद्यते ॥ १ ॥

अथवा भस्म या पासून लाभ तो काय होणार ? बाल्यावस्थेत विषयसेवनाच्या मर्यादेला न जाणणारे व स्त्रीला पाहिल्या बरोबर वेडे होऊन जाणारे बालक लग्न झाल्यानंतर लौकरच आपल्या आयुष्याची इतिश्री करून मृत्युमुखीं पडलेले आपल्या पाहण्यांत नाहीं काय ? शरीरांतील वीर्याचा नाश झाल्यामुळें मासिकें व वर्तमानपत्रें यांतील वीर्यवर्धक औषधांच्याच जाहिराती वाचणारे व तीं मागविणारे तरूण आपण पाहिले नाहींत काय ? विषय सेवनाच्या मर्यादेला तिलांजलि देऊन आपल्या स्त्रीच्या संगतीनें संतोष न पावतां एखाद्या दारूबाजा प्रमाणें वेश्यांच्या दारोदार भटकणारे तरूण आपण पाहिले नाहींत काय ! शेवटीं हळू हळू अशा तरुणांची एथवर स्थिति येते कीं ते कोणच्याही कह्यांत वागत नाहींत. व अशी निरंकुशता प्राप्त झाली म्हणजे मग वीर्य नाशाच्या व्यसना शिवाय अभक्ष भक्षण तसेंच मदिरापान या व्यसनाचाही त्या तरुणावर अम्मल बसतो.

वरील गोष्ट विवाहितांना लागूं होईल. विवाहित मनुष्य वीर्य रक्षण करूं शकत नाहींत ही गोष्ट वाईट तर खरीच पण त्या पेक्षांही अति आश्चर्याची गोष्ट ही कीं अविवाहित युवकांची देखील तशीच दीन दशा पहाण्यांत येते. अविवाहित युवकांनीं मन आणि शरीर इतकें मजबूत–दृढ–अमावयाला पाहिजे कीं त्यांना

त्यांच्या अभ्यासादि इतर व्यवसायांत थोडी देखील न्यूनता पडूं नये. पण वस्तुस्थिति याच्या अगदींच उलट आहे. एखाद्या विश्वविद्यालयांत अथवा हायस्कुलांत आपण जाऊन तपासणी केल्यास अगर एखाद्या मराठी अथवा गुजराथी शाळेंतील वरच्या वर्गांतील युवकांची शरीर संपत्ति कशी आहे हें पाहिल्यास आपणाला आपल्या भावी पिढीच्या शरीर संपत्तीचें एक भयानक चित्र दृष्टीला पडेल. त्या भयानक चित्राचें वर्णन लिहूं लागल्यास तें अतिशय मनोरंजक होईल पण स्थलसंकोचामुळें त्या युवकांच्या स्थितिचें थोडेसेंच वर्णन देणेंत येत आहे:—

" पांढरा फटफटीत चेहरा त्यावर सुरकुत्या पडलेले, डोळ्यांची दृष्टि कमी झाली असल्यामुळें चाळशी लावलेले, फारच कमी दिसत असले मुळें अगदीं डोळ्या जवळ पुस्तक घेऊन वांचणारे, कंबर मोडलेले अथवा कंबरेपासून वाकडे झालेले, थोडेसे परिश्रम झाले कीं लागलींच थकून गेल्यामुळें कपाळावर हात देऊन निराशेनें बसणारे, असे अथवा या पेक्षांही दीन स्थितीला पावलेले युवक दृष्टीला पडतात. या बरोबरच जर आपण या युवकांच्या आंतरिक जीवनाची तपासणी केली तर आपणाला बाह्य स्थितीहून देखील अतिशय भयानक असें चित्र दृष्टीला पडेल:—कोणी प्रमेहाच्या विकारानें आजारी, तर कोणाला धातू-विकार, कोणाला स्वप्नावस्था तर कोणी अशक्ते मुळें क्षीण

स्नेचा, कोणाच्या छातींत दुखत असेल तर कोणाला म-
स्तकाची व्यथा, कोणाला गहू पडले असतील तर कोणाला
स्फोटक असेल या प्रकारच्या नानाविध रोगांपैकीं बहुतेक शुश्रू-
षा [illegible] दुसऱ्या रोगाच्या व्यथा भोगी। [illegible]
पडतील, अरेरे 'आता मारे तेंव पाणी काढूं' एवढी शक्ति
त्यांच्या अंगीं आहे—असावयास पाहिजे—ते आपले अतिहित
समानधर्मी यांशी [illegible] अशी शोचनीय स्थिति असावीना!
या अविवाहित आणि शिक्षणातीत स्त्रियांचे असे हाल ! ज्यां
च्याच देशोद्धाराची सर्व आशा या भगिनीत लोक ठेवितात,
त्यांची या मातृभूमीस तारणारी भावी स्थिति म्हणून गणना
होते, त्यांचे असे [illegible] वरचेवर हालांनी
येईल ! अशी अविश्वसनीय स्थिति !! [illegible] हातून किं
[illegible] होणार ? [illegible] बालपणापासून [illegible]
[illegible] नाहीं, [illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

तरी मिळूं शकतील काय ? अथवा असे पांच सुदृढ पुरुष तुम्ही दाखवूं शकाल काय ? कॉलेजांत अभ्यास करणाऱ्या शंभर विद्यार्थ्यांकडे पहा व त्यांतून तेजस्वी प्रफुल्ल मुखकमळाचे, तसेंच ज्यांचे नेत्र चकाकित आणि पाणिदार असून जे चपळ व हरिणा सारखे वेगानें धावूं शकतात असे, तसेंच दाण्यानें भरलेल्या शेंगासारखे शरीर व ज्यांचे अवयव सर्व प्रकारें मजबूत आहेत असे, आणि डोकें वगैरे दुखण्याची ज्यांना कधींही माहिती नसून, दुर्बलता, स्मरणशक्तीचा अभाव, आणि अशाच प्रकारच्या शेकडों तक्रारींचा ज्यांना गंधही नाहीं असे पांच तरी तरुण आपण दाखवूं शकाल काय ? शंभरांतच काय पण हजारांत देखील खरोखर धष्टपुष्ट, सशक्त आणखी निरोगी पांच विद्यार्थी तुम्हाला मिळणार नाहींत. "

गोष्ट अगदीं सत्य आहे. आतांचे सुशान पुरुष तसेंच विद्यार्थी दृष्टीनील मुलें यांची स्थिति अशी आहे खरी; व ही स्थिति खरोखरच दयाजनक आहे. आतां आपणाला हें पाहिलें पाहिजे कीं त्यांची अशी स्थिति कशानें झाली ? आजकालच्या शिक्षणांत अशाच्या प्रकारचे दोष आहेत काय कीं त्यांच्या योगानें–अति अभ्यासानें–विद्यार्थ्यांची शरीर संपत्ति बिघडली ? अथवा त्यांच्या शरीरांत अभ्यासाच्या योगानें वरील प्रकारच्या रोगांच्या उत्पत्तीला अवसर मिळाला ? अथवा सर्वां विद्यार्थ्यांना

पुरेसे खावयाला मिळत नाहीं किंवा त्यांना दूध, दहीं, तूप वगैरे सारखे पौष्टिक पदार्थ खावयाला मिळत नाहींत म्हणून त्यांची अशी स्थिति झाली !

आमच्या दृष्टीनें वरील सर्व कारणें कुचकामाचीं आहेत. शिक्षणा बाबतींत जे कांहीं दोष आहेत अथवा जो कांहीं कमीपणा आहे त्यामुळें अभ्यास करणाऱ्यांच्या शरीरांत रोगांची उत्पत्ति होते ही मानण्यालायक गोष्ट नाहीं. ही गोष्ट मात्र खरी आहे कीं शिक्षणांतील कमतरतेमुळें अथवा दोषामुळें कदाचित विद्यार्थ्यांचें भावी जीवन आर्थिक दृष्टीनें सुखमय होणार नाहीं, परंतु त्या कमतरतेंत अगर शिक्षण विषयक दोषांत विद्यार्थ्यांच्या शरीरांत रोग उत्पन्न करण्याचें अथवा शरीर अशक्त करण्याचें सामर्थ्य नाहीं हें मात्र खरें आहे. तर मग खाण्यापिण्याचा अभाव हें कारण आहे ! तें देखील खरें नाहीं. दरेक मनुष्य आपल्या शक्तीनुसार खुराक तर नेहमींच घेतो, तेव्हां तें देखील कारण असावें असें मानतां येत नाहीं. खाण्यापिण्या विषयीं म्हणाल तर श्रीमंतांचीं मुलें तसेंच चांगल्या गृहस्थांचीं मुलें रोज चांगलें अन्न खातात इतकेंच नाहीं पण केशरी दूध, बदामीचा शीरा तसेंच उत्तमोत्तम पौष्टिक पदार्थांचें सेवन करितात; इतकें असून देखील आपण बारकाईनें पाहूं लागलों तर आपणाला असें आढळून येईल कीं याच वर्गांतील मुलें वरील प्रकारच्या रोगांना जास्त

बळी पडलेलीं आढळतात. उलटपक्षीं गरीबांचीं मुलें जीं भाजी भाकरी खाऊन आपलें जीवन गाळतात तीं सुदृढ दिसतात व दिवसे दिवस अंगानें धष्टपुष्ट होत जातात. तेव्हां पौष्टिक खुराकाच्या अभावीं रोगांची उत्पत्ति होते असें आपणाला मानतां यावयाचें नाहीं. तर मग ज्या जवानींत ' लात मारूं तेथून पाणी काढूं ' अशी तरुणांच्या अंगांत धमक असावयाची त्या भर जवानीच्या वयांत तरूण पुरुष कमजोर आणि अशक्त तसेंच रोगी दिसतात याचें काय खरें कारण असावें ! ' बाल्यावस्थेंत जडलेल्या वाईट सवयी ' या शिवाय दुसरें कोणतें खरें कारण असणार ! बाल्यावस्थेंमधील वाईट सवयींचाच हा परिणाम होय.

बाल्यावस्थेंत जडलेल्या वाईट सवयी.

विषय सेवनाची प्रवृत्ति संसारी जीवांना अनादिकाळापासून जडलेली आहे; तेव्हां मनुष्याची प्रवृत्ति साहजिकपणेंच विषय सेवनाकडे वळते. अशा स्थितींत विषय वासनेला वाढविणारे निरनिराळे प्रसंग कोमळ वयाच्या बालकाच्या वारंवार दृष्टीला पडतात व त्या शिवाय विषय वासनेच्या रम्य कथा त्यांच्या कानावर येऊं लागतात आणि अशा तऱ्हेनें विषयरूपी विष त्यांच्या कोमल बुद्धीवर ओतलें जाऊन त्यांच्या सर्व शरीरांत पसरतें. हें विष कोमल बालकांच्या शरीरांत न जावें म्हणून त्यांच्या मातपित्यांनीं जेवढें लक्ष पुरवावयास पाहिजे तेवढें ते पुरवीत नाहींत. व या

मुळें त्यांना इतकी स्वतंत्रता मिळते कीं त्या स्वतंत्रतेमुळें त्यांना असंख्य वाईट सवयी जडतात. असल्या वाईट सवयी मुलांच्या ठिकाणीं अथवा तरुणांच्या ठायींच जडलेल्या सांपडतात इतकेंच नाहीं पण लहान लहान मुली आणि युवावस्थेंत प्रवेश करणाऱ्या स्त्रियांच्या ठिकाणीं देखील सांपडतात. या सर्व वाईट सवयींत अत्यंत घातुक आणि हाल हाल करून प्राण नाश करणारी वाईट सवय म्हणजे ' मुष्टि मैथुन ' ही होय. या वाईट सवयींच्या नादीं लागून मनुष्यें आपल्या जवानीला वेगळी जवानी बनवितात इतकेंच नाहीं पण या घातुक सवयीनें कित्येक इसम अकालीं मृत्यु-मुखीं पडले आहेत याची आज शेंकडों उदाहरणें आहेत. विश्वविद्यालय, इंग्रजीशाळा अथवा मराठी, गुजराथी शाळा यां मधील विद्यार्थ्यांच्या वरील शरीर ऱ्हासाचें सर्वांत मुख्य कारण " मुष्टि मैथुनाची वाईट सवय " हें होय. शरीर आणि मन यांची भयंकर रीतीनें खराबी करणारा हा मोठाच दुर्गुण आहे. या दुराचरणानें मनुष्याची जी खराबी होते अथवा जी हानि होते त्याचें स्पष्ट शब्दांत वर्णन करणें हें सभ्यपणाला सोडण्या सारखें आहे. त्याचें वर्णन करण्यासाठीं या सभ्य जगांत असभ्य-पणाचा अवतार धारण केला पाहिजे. अत्यंत निंद्य आणि मनुष्य शक्तीचा विनाश करण्यांत प्रमुख असें हें दुराचरण ज्या युवान पुरुषावर अथवा बालकावर आपला पगडा बसवितें त्या तरुणाची थोड्याच दिवसांत पायमल्ली होते. ज्या कालांत मनुष्याला

वीर्यरक्षण करणें अवश्य आहे व ज्या कालांत आपल्या भावी आयुष्याचा मजबूत पाया करावयाचा आहे त्या कालांत करावयाचें तें कार्य तर दूरच राहिलें पण उलट वीर्य नाश अथवा वीर्य क्षय करण्याची तयारी करण्यांत येते याला काय म्हणावें ? व या अशा उलट तयारी करणाऱ्यांच्या कार्याला दुर्दैवी कार्य न म्हणावें तर दुसरें कोणतें कार्य म्हणतां येईल. अमल्या शिक्षित आणि शहाण्या मुलांचें या वाईट सवयी पासुन रक्षण करणें हें आईबापांचें तसेंच त्या मुलांच्या शिक्षकांचें अवश्यमेव कर्तव्य नाहीं काय ? आपल्या मुलाला शाळेंत टाकलें म्हणजे आपलें कर्तव्य सपलें अशी आज पुष्कळशा आईबापांची प्रामाणिक समजूत आहे कारण आपल्यापेक्षां शिक्षक मुलांवर चांगल्या तऱ्हेनें दाब ठेऊं शकतात असें ते समजतात. विद्यार्थ्यांच्या शारीरिक संपत्ति कडे तसेंच मानसिक संपत्ति कडे लक्ष देऊन ती वाढविणें हें नोपर्यंत आपलें आद्य कर्तव्य आहे असें शिक्षक मानणार नाहीं तों पर्यंत अनिष्ट वाईट सवयी पासुन विद्यार्थी दूर राहणें संभवत नाहीं. आतांचा पोटा साठीं अति उद्योग करावा लागत असल्यामुळें आईबाप देखील आपल्या मुलांच्या शरीर प्रकृतिकडे बरोबर लक्ष पुरवीत नाहींत ही त्यांतल्या त्यांत अत्यंत खेदजनक गोष्ट आहे. मुलें तसेंच तरुण पुरुष स्वाभाविक लाजे मुळें खरी हकीकत आईबापा पासुन चोरून ठेवितात—त्यांना सांगू शकत नाहींत व कांहीं तरी निराळाच रोग झाला असें सांगतात.

मुलें अगर तरूण पुरुष लज्जेमुळें जेव्हां आपल्या आईबापा जवळ डोकें दुखतें, छातींत दुखतें, चक्कर येतात, अथवा अशाच प्रकारच्या एकाद्या रोगाचें नांव पुढें करितात तेव्हां आईबाप थोडा देखील विचार न करितां त्या रोगाचा उद्भव सध्याच्या शिक्षणाच्या माथीं मारतात व ज्यास्त अभ्यासामुळें असें झालें असेल अशा खोट्या समजुतीनें कांहीं काल पावेतों आपल्या मुलाला शाळेच्या त्रासा पासून मुक्त करितात. पण कांहीं तर आपल्या मुलाच्या शरीर प्रकृतींतील रोगबिजाचें कारण शाळेंतील अभ्यासाचें माथीं मारून आपल्या मुलाला शाळेच्या कटकटी पासून कायमचें मुक्त करितात; कांहीं भोळे बाप मुलाला गरम दुधाचा रतीब लावतात. व कित्येक फारच मायाळु बाप.आपल्या रोगी मुलाला डाक्टर अगर वैद्याकडेस घेउन जाऊन सांगतात कीं डाक्टर साहेब ! या मुलाच्या अंगात इतकी उष्णता झाली आहे कीं त्या उष्णते मुळें याला मस्तकशूळाची व्यथा जडली आहे, याचें डोकें फार दुखतें; महेरबानी करून कांही शीत उपचार करावा. डाक्टर साहेब तरी विनाकारण मागे तसदीक कशाला घेतील ! मुलाच्या बापाला जेवढी कटकट असणार त्यामानानें अर्थात डाक्टराला थोडी कमी असणार. बापानें सांगितलें कीं डोकें दुखतें आणि तें उष्णतेनें दुखतें. लागलीच औषध तयार ' डोकें दुखायाचा लागलें अथवा गरम व्हावयाचा लागलें म्हणजे बर्फाचा तुकडा ठेवा अथवा

...श करणारे या शिवाय दुसरे उदाहरण मिळणे.

—

...थुनाच्या वाईट सवयी मुळे कित्येक वेडे झाले
... दवील विद्वान डॉक्टरांनीं पुष्कळदां अभिप्राय दिला
...याचें तात्पर्य हें कीं मुष्टिमैथुनाची वाईट सवय या
... मूळ आहे. या वाईट सवयीच्या पचनीं पडलेले
...ईट सवयीचे दास बनलेले युवक अशा रोगांच्या
...सापडले आहेत तरी ते वाईट सवयी सोडतात अथवा
...थतनाला लागतात असें मात्र क्वचित होत नाहीं;
...ठू हळू आपल्या सोबत्यांच्या खोट्या प्रेमांत फसून
...चाराच्या मार्गाला लागतात; व शेवटीं ते कोण-
...ही मर्यादा राखूं शकत नाहींत. अस्तु.

...तु इतकेंच सांगावयाचें आहे कीं आजकालच्या तरु-
...णु अनेक प्रकारच्या रोगानें पीडित झालेले पाहतो
...र्दैव आहे कीं ते आपल्या वीर्याचा अनादर करि-
...त—म्हणू... ...चे रक्षण करीत नाहींत. एका
... ...आपल्या वयाच्या ११
...ची सुरवात करतो. त्यांत
...तर वरील रोगाचे निस्सीम
... हकीकत होवून सदैव-

गुप्तमैथुनाच्या वाईट सवयी पासून अशा अनेक रोगांची उत्पत्ति होते कीं त्या मुळें मनुष्याचा जीवनाची अजीबात पायमल्ली होते-त्याचें जिणें असून नसून सारखेंच होतें. पोटशूळ, दांताला कीड, केस पांढरे, शरीर पिवळें पडणें, डोळे खोल जाणें, सर्व दिवसभर उदासीनता राहणें, चेहरा निस्तेज होणें या तर सर्व साधारण नेहमींच्याच गोष्टी असतात. परंतु हळू हळू तो पुरुष पुरुषत्वांतून नाहींसा होऊन नपुंसक होतो, हीही भयंकर आपत्ति त्याचावर ओढवते. पुढें जरी तो पुरुषत्वांत नसतो तरी लोकांना हौस दाखविण्या साठीं मनात कांहींही सत्व नसतांना मोठ मोठ्या गोष्टी करून, लोकांना फसविण्याच्या हेतूनें वेश्यांनें अवडंबर माजवितो. उद्देश हा कीं पुरुषत्वांतून आपण गेलों नाहीं असें लोकांना वाटावें. अशा स्थितीत सदाहू इतर दिस रात मोठ्या कष्टानें घालवितो व पुढें ना त्याचा असा परिणाम होतो कीं लौकरच तो क्षय रोगाच्या तावडीत सांपडून अंती त्या रोगाला बळी पडतो. या बाबतींत एक अनुभवी वैद्यानें खालील प्रमाणें आपला अभिप्राय दिला आहे — "ज्याला निरोगीपणा पाहिजे व्हावयाचें असेल, ज्या सुदृढ, सशक्त आणि निरोगी सगळ्या रोगी व्हावयाचें असेल, ज्याला आयुष्य-सुरक्षा-सौख्य आधि-व्याधि यांना आपल्या पासून दूर करावयाचें असेल व रोग, दुःख आणि आळसी व्हावयाचें असेल त्याचा त्याग निश्चयानें करावा म्हणजे "गुप्त मैथुन", आपल्याच हातानें

...न आपला सत्यानाश करणारें या शिवाय दुसरें उदाहरण ...ण अशक्य आहे.

मुष्टिमैथुनाच्या वाईट सवयी मुळें कित्येक वेडे आहेत असा देखील विद्वान डॉक्टरांनी पुष्कळदां अभिप्राय ... आहे. सांगण्याचें तात्पर्य हें कीं मुष्टिमैथुनाची वाईट सवय ...र्व विनाशाचें मूळ आहे. या वाईट सवयीच्या पचनीं पडले ...थवा या वाईट सवयीचे दास बनलेले युवक अशा रोगांच्या कचाट्यात सापडले आहेत तरी ते वाईट सवयी सोडतात अथवा सोडण्याचा प्रयत्नाला लागतात असें मात्र कधींच होत नाहीं; पण उलट हळू हळू आपल्या सोबत्यांच्या खोट्या प्रेमांत फसुन जाऊन व्यभिचाराच्या मार्गाला लागतात, व शेवटीं ते कोण-त्याही तऱ्हेंची मर्यादा राखूं शकत नाहींत अस्तु.

मस्तुत इतकेंच सांगावयाचें आहे कीं आजकालच्या तरु-णांना आपण अनेक प्रकारच्या रोगानें पीडित झालेले पाहतो याचें कारण एवढेंच आहे कीं ते आपल्या वीर्याचा अनादर करि-तात—नाश करितात—म्हणजे ते वीर्य रक्षण करीत नाहींत. एका वैद्यानें असें मत दिलें आहे कीं मनुष्य आपल्या वयाच्या १२ व्या वर्षापासून वीर्य नाशाच्या चेटांची सुरुवात करतो. त्यांत १६ ते २६ वर्षांच्या वयाचे तरूण तर वरील रोगाचे निस्सीम भक्त बनलेले दिसतात. वाचकांना वरील हकीकत वांचून सतेदा-

अर्थ वाटल्या शिवाय राहणार नाहीं; कारण वास्तविक पाहिलें तर १९ ते २१ हा ब्रह्मचर्यव्रताचा काल असें आपण यापूर्वीच सांगितलें व कमींत कमी २५ वर्षें पावेतों तर ब्रह्मचर्यव्रतानें पालन केलेंच पाहिजे. असें असून हा काल वाईट सवयीनें आणि कुसंगतीनें तारुण्याचा राहिला नसून वृद्धापकालाचा प्रारंभकाल झाला आहे असें म्हटलें तर कोणत्याही तऱ्हेचा बाध यावयाचा नाहीं. म्हणून प्रत्येक मनुष्यानें आपल्या मुलाला तसेंच मुलीला विवाहाच्या बंधना पासून अनुक्रमें २५ व १६ वर्षें पावेतों दूर ठेवावें. म्हणजे त्या वयापावेतों त्यांनीं लग्नें देखील करूं नयेत; इतकेंच नाहीं तर त्या वया पावेतों त्यांच्या कडून कडकडीत ब्रह्मचर्यव्रताचें पालन होतें कीं नाहीं यावर लक्ष ठेवावें.

आईबापांचें कर्तव्य.

मागें पाहूं गेलों तर प्राचीन रुढी प्रमाणें मुलांना गुरुजींच्या समागमांत व मुलींना गुरुपत्नींच्या समागमांत ते आहेत तों पावेतों त्यांनीं ब्रह्मचर्यव्रतानें व मन वळून विद्याध्ययन केलें पाहिजे. आतांशा प्राचीन रुढी नष्ट भ्रष्ट होऊन गेली आहे व त्यामुळें प्राचीन रुढी प्रमाणें नाहीं तर नाहीं पण निदान आईबापांनीं आपल्या मुलामुलींना स्वतःपाशीं ठेऊन बेऊन त्यांच्याकडून ब्रह्मचर्यव्रतानें पालन करविलें पाहिजे. व ते त्या प्रमाणें वागतात कीं नाहीं या वर

अवश्य लक्ष ठेविलें पाहिजे. म्हणजे मुलामुलींच्या अंतःकरणांत अनुक्रमें पंचवीस आणि सोळा वर्षे पावेतों वाईट संस्काराचा उद्भव होऊं नये, त्यांना वाईट संस्कार जडूं नयेत, मनाचा कल विषय वासनेकडे वळूं नये या विषयीं विशेष सावधानता ठेविली पाहिजे. ब्रह्मचारी मुलामुलींचें जीवन एका उत्तम साधूच्या अथवा साध्वीच्या जीवना प्रमाणें होईल असें केलें पाहिजे. स्वच्छ व साधा पोषाख, निर्मळ व साधें अन्न व शक्य तोंवर जितकें कमी होईल तितकें मुलांनीं तरुण स्त्रियांच्या सहवासा पासुन र राहिलें पाहिजे. तसेंच मुलींनीं तरुण पुरुषांच्या सहवासा पासुन र राहिलें पाहिजे. त्यांच्या उठण्या बसण्याच्या, फिरण्याच्या व निजण्याच्या मार्गावर तसेंच त्यांच्या प्रत्येक हालचाली वर आईबापांनीं विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. विषयांच्या गोष्टी ऐकल्यानें, वाचल्यानें अथवा पाहिल्यानें आपल्या मुलामुलींचीं निर्मळ अंतःकरणें विषयानें मलीन होऊं नयेत त्यांच्या सरळ आणि निर्मळ हृदयांत विषयरूपी विष मिसळलें जाऊं नये या गोष्टीवर आईबापांनीं शक्य तितकें जास्त लक्ष पुरविलें पाहिजे रण त्यांच्या मुलामुलींचें पुढील आयुष्यक्रम सुखमय होणें शक्य ाहे. आईबापांच्या दृष्टीनें आईबापांनीं आपलें वरील कर्तव्य ाजावणें जितकें महत्वाचें आहे त्या पेक्षांही जास्त महत्वाची ष्ट ही आहे कीं आपला संसारांतील आयुष्यक्रम सुखमय व्हावा ी इच्छा असल्यास वरील बाबती वर मुलामुलींनींही विशेष

ख्य ठेऊन त्या प्रमाणें पाळणें हेंच आपलें कर्तव्य आहे असें द नलें पाहिजे व त्या प्रमाणें त्यांनीं वर्तन केलें पाहिजे. अशा तऱ्हे विचार करणारे व विचार करीत उतरविणारेच मर्यादा आपदेंतून पार पडूं शकतात. माझ्या हातून माझें मुख मी नष्ट करूं! माझ्या कुऱ्हाडीचा घाव मीच माझ्या पायावर कसा मारून घेऊं ! अशा तऱ्हेचे विचार ज्या मुलामुलींच्या हृदयांत उत्पन्न होत नाहींत ते आपला जीवन काळ केव्हांही सुखांत घालवूं शकत नाहींत.

अशा रीतीनें पुरुषानें पंचविस वर्षे पावेतों व स्त्रीनें सोळा वर्षे पावेतोंचा काल अस्खलित ब्रह्मचर्य दशेंत घालविला म्हणजेच ते शास्त्रोक्त मर्यादे प्रमाणें गृहस्थाश्रमाचे अधिकारी होतात. अर्थात् तदनंतरच ते लग्न करण्याला लायक होऊं शकतात.

लोकांची चुकीची समजूत.

लोकांची अशी समजूत होऊन गेली आहे व जवळ जवळ अशी रूढी पण पडून गेली आहे कीं कन्या रजस्वला होण्याच्या अगोदर तिचें लग्न झालेंच पाहिजे. पित्याच्या घरीं कन्या जर रजस्वला झाली म्हणजे रजस्वला होण्याच्या अगोदर जर कन्येचें लग्न झालें नाहीं तर तें एक मोठें पाप करण्यासारखें आहे असें मानलें जातें पण आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं अशी खोटी

अथवा भ्रममूलक समजूत ठेवणारे यांना शास्त्राची खरोखर काय मर्यादा आहे हेंच माहीत नाहीं. हिंदूंचे परमपूज्य स्मृतिकार मनु यांनीं मनुस्मृतीच्या नवव्या अध्यायांत असें सांगितलें आहे कीं:—

त्रीणि वर्षाण्युदीक्षेत कुमार्यृतुमती सती ।
ऊर्ध्वं तु कालादेतस्माद्विन्देत सदृशं पतिम् ॥ ९० ॥

अर्थात्:—कन्येनें ऋतुस्नात झाल्यानंतर तीन वर्षे पावेतों आपल्याहून अधिक गुणवान अशा वराची वाट पहावी. त्या अवधींत जर तसा वर मिळाला नाहीं तर आपल्या बरोबरीच्या गुणाच्या वरा बरोबर लग्न लावावें.

या वरून आपणाला असें स्पष्ट दिसून येईल कीं शास्त्रकार देखील *स्त्री जातीला ऋतुस्नान झाल्या पासून तीन वर्षां नंतर लग्न* करण्याला सांगतात. व इकडे तर अज्ञान आईबाप लोकापवादाच्या भीतीनें अथवा चुकीच्या समजुतीनें आपल्या बालिकेचा ल्हान वयांत विवाह लावून देतात व अशा बाळवयांत विवाह करण्याचें त्यांचें कारण एवढेंच कीं कदाचित माझ्या घरांत मुलगी रजस्वला झाली तर तें एक पाप आहे व तें पाप माझ्या हातून होऊं नये. अशा अज्ञान आईबापांची कींव करावी तेवढी थोडीच आहे. बिचारे लोकापवादाच्या भीतीला तसेंच खोट्या समजुतीला बळी पडून आपल्या अज्ञान बालिकेचा ल्हान वयांत विवाह

त्यांनीं आजन्म ब्रह्मचर्यव्रत पाळिलें. याचा प्रभाव असा झाला
की अकबरा सारख्या मुसल्मान राजाला प्रतिबोध करण्याला ते
समर्थ झाले. सुप्रसिद्ध जगद्गुरु श्री शंकराचार्य यांचें जीवन
जाणणाऱ्यांना माहितच आहे कीं त्यांनीं जन्मापासूनच ब्रह्मचर्य
पाळलें होतें. व त्या ब्रह्मचर्याच्याच प्रतापानें अखिल भारतवर्षांत
त्यांची ख्याति झाली. असे एक नाहीं पण शेकडों दृष्टान्त आ-
पणा पुढें मांडतां येतील. अशा दृष्टान्तांनीं इतिहासाचीं पानेंच्या
पानें भरलीं आहेत. आर्यावर्तांत असा कोण इसम आहे कीं
ज्याला भीष्मपितामहांची भीष्म प्रतिज्ञा आणि त्यांचीं अलौ-
किक कार्यें यांची माहिती नाहीं ?

या प्रसंगीं कोणी असा विचार करण्याचें अथवा विचार
...नांत आणण्याचें कारण नाहीं कीं—' संसारांतील सर्वत्र मनुष्यें
...र ब्रह्मचारी झालीं अथवा होतील आणि कोणीच लग्न करणार
...हीं तर या संसारांत मनुष्यांची उत्पत्ति कशी होईल ! संसार-
... व इतर व्यवहार कसे चालतील ! ' पण ही जी भीती
...ती अजीबात खोटी आहे कारण आजपावेतों असें झालें
... व असें पुढें केव्हांही होणें शक्य नाहीं. निसर्गाच्या नियमा
... संसारांतील सर्व कामें चालूंच राहतील. प्रत्येक मनुष्य
... स्वतः बद्दल जबाबदार असून तो आपल्या पुरताच
...मालक आहे. अशा विषयांत त्यानें आपल्या स्वतः पुर-
...र करावयाचा आहे. त्याला जगाची उठाठेव करण्याचें

करितात. पण त्यांची मीती तशीच त्यांची समजूत अनीनात खोटी आहे ही गोष्ट उपर्युक्त स्मृतिकारांच्या वचनावरुन स्पष्ट आहे.

आजन्म ब्रह्मचर्य पाळल्याचा प्रभाव.

वरील विवेचनावरून आपल्या हें लक्षांत आलेंच असेल कीं पुरुषानें कमींत कमी २५ वर्षे पावेतों व स्त्रीनें कमींत कमी १९ वर्षे पावेतों ब्रह्मचर्यव्रत अवश्य पाळलेंच पाहिजे. ब्रह्मचर्य पाळणें म्हणजे त्या वया पर्यंत वीर्याचें रक्षण करणें. खरोखर अशा तऱ्हेनें ब्रह्मचर्यव्रत पाळल्यानंतरच ते गृहस्थाश्रमी होण्याला पात्र होतात. पण आमची अशी समजूत आहे कीं मनुष्य आजन्म कडकडीत ब्रह्मचर्यव्रतानें राहिला तर त्याच्या ठिकाणीं इतकें अद्वितीय सामर्थ्य प्राप्त होतें कीं जगांत असें एकही कार्य नाहीं कीं तें त्याला साध्य होणार नाहीं. कलिकाल सर्वज्ञ **हेमचंद्राचार्य** यांनीं आपल्या वयाच्या पांचव्या वर्षीच दीक्षा ग्रहण करुन गुरुसेवेंत राहून आपलें सर्व आयुष्य ब्रह्मचारी म्हणून घालविलें. त्यांनीं आजन्म ब्रह्मचर्यव्रत पाळिलें; याचा परिणाम असा झाला कीं त्यांना कुमारपाल राजाला प्रतिबोध करण्याच्या कार्यांत यश मिळालें, तसेंच आपल्या अल्प जीवनकालांत त्यांना साडेतीन कोटी श्लोक रचतां आले. जगद्गुरु **श्रीहीरविजयसूरि** यांनीं आपल्या वयाच्या १३ व्या वर्षी दीक्षा ग्रहण करून आपलें सर्व आयुष्य ब्रह्मचारी या नात्यानें घालविलें;

त्यांनीं आजन्म ब्रह्मचर्यव्रत पाळिलें. याचा प्रभाव असा कीं अकबरा सारख्या मुसल्मान राजाला प्रतिबोध करण्याला समर्थ झाले. सुप्रसिद्ध जगद्गुरु श्री शंकराचार्य यांनें भी जाणणाऱ्यांना माहित आहे कीं त्यांनीं जन्मापासूनच ब्रह्मच पाळलें होतें. व त्या ब्रह्मचर्याच्याच प्रतापानें अखिल भारतवर्षी त्यांची ख्याति झाली. असे एक नाहीं पण शेकडों दृष्टान्त आ-पणा पुढें मांडतां येतील. अशा दृष्टान्तांनीं इतिहासाचीं पानेंच्या पानें भरलीं आहेत. आर्यावर्तांत असा कोण इसम आहे कीं ज्याला भीष्मपितामहांची भीष्म प्रतिज्ञा आणि त्यांची अलौ-किक कार्यें यांची माहिती नाहीं ?

या प्रसंगीं कोणी असा विचार करण्याचें अथवा विचार मनांत आणण्याचें कारण नाहीं कीं—' संसारांतील सर्वत्र मनुष्यें जर ब्रह्मचारी झालीं अथवा होतील आणि कोणीच लग्न करणार नाहीं तर या संसारांत मनुष्यांची उत्पत्ति कशी होईल ! संततिव व इतर व्यवहार कसें चालतील ! ' पण ही जी भीती वाटते ती अनीचित होती आहे कारण आमच्याकडे असे झालें नाहीं व असें पुढें केव्हांही होणें शक्य नाहीं. निसर्गाच्या नियमा प्रमाणें संसारांतील सर्व कामें चालूंच राहतील. प्रत्येक मनुष्य आपल्या स्वतः बद्दल जबाबदार असून तो आपल्या पुरताच स्वतःचा मालक आहे. अशा विषयांत त्यानें आपल्या स्वतः पुरताच विचार करावयाचा आहे. त्यास जगाची उठाठेव करण्याचें

कारण नाहीं. 'मी आजन्म ब्रह्मचर्यव्रत पालन करून खरा व अलौकिक शूर पुरुष कसा होईन' एवढाच त्यानें विचार करावयाचा आहे. मनसारखे सर्वत्र ब्रह्मचारी झाले तर जगाचें कसें होईल या विचारापासून त्यानें दूर राहिलें पाहिजे. जेव्हां कोणी एखादा मनुष्य कापडाचा, वकीलीचा, डॉक्टरीचा किंवा असा दुसरा धंदा करावयाला निघतो तेव्हां तो असा विचार केव्हांच करीत नाहीं कीं सर्वच जर कापडवाले, वकील, डाक्टर झाले तर दुसऱ्या धंद्यानें कसें होईल व दुसरे धंदे कोण करतील! हें तर सृष्टिक्रमाच्या नियमाप्रमाणें व्हावयाचें तें होतच आहे. मनांत कोणत्याही प्रकारच्या नोकसानाच्या भीतीला जागा न देतां ज्यांत आपला स्वतःचा फायदा आहे व वस्तुत. जें कार्य उत्तम आहे तें कार्य करण्या साठीं आपण आपली पराकाष्ठा करावी त्यांतच आपलें कल्याण असून तें कार्य करणें हाच श्रेयस्कर मार्ग आहे.

पुत्रेच्छेनें ब्रह्मचर्यव्रताचा भंग.

या ठिकाणीं अशी एक शंका घेण्यास जागा आहे कीं— " कित्येक ठिकाणीं

अपुत्रस्य गतिर्नास्ति स्वर्गो नैव च नैव च ।
तस्मात्पुत्रमुखं दृष्ट्वा स्वर्गं गच्छन्ति मानवाः ॥१॥

वरील प्रमाणें शास्त्र वचन आहे. तेव्हां कसें करावें ? अर्थात् निपुत्रिकाला सद्‌गति नाहीं. जर आजन्म ब्रह्मचर्यव्रतानें आपण राहिलों--अविवाहित राहिलों--तर पुत्र प्राप्ति कशी होणार व पुत्र झाले नाहीं तर सद्‌गति कशी मिळणार " !

या शंकेंत मुळींच तथ्य नाहीं. आपण या बाबतींत जरा दूरवर विचार करूं. वरील वचनाचा खरा तात्पर्यार्थ न समजणारे कित्येक इसम आर्थिक विचाराला तिलांजलि देऊन अष्टौप्रहर--रात्रंदिवस--इतके विषयासक्त होतात कीं कोंबडा, कुतरा आणि डुक्कर यांच्याप्रमाणें संततीची वृद्धीच करीत राहतात. म्हणून तशा मनुष्यांनीं वरील वचना बरोबरच मनुस्मृतीच्या पांचव्या अध्यायांतील खालील श्लोक देखील खास ध्यानांत ठेवला पाहिजे:---

अनेकानि सहस्राणि कुमारब्रह्मचारिणाम् ।
दिवं गतानि विप्राणामकृत्वा कुलसंततिम् ॥ १५९ ॥

अर्थात्---कुलवृद्धीचें साधन जी संतति ती उत्पन्न केल्या शिवाय ब्राह्मणांचे अनेक हजारो ब्रह्मचारी कुमार स्वर्गांत गेले--म्हणजे यावज्जन्म ब्रह्मचर्यव्रत पाळून वरून स्वर्गांत गेले.

सनक, वालखिल्य वगैरे अनेक महानुभाव स्वर्गांत गेल्याच्या गोष्टी हिंदुधर्माच्या प्राचीन इतिहासावरून सिद्ध आहेत.

कारण नाहीं. 'मी आजन्म आमरणपर्यंत पालन करून शूर व अलौकिक शूर पुरुष कसा होईन' एवढाच त्यानें विचार करावयाचा आहे. सगळेच सर्वत्र ब्रह्मचारी झाले तर जगाचें कसें होईल या विचारापासून त्यानें दूर राहिलें पाहिजे. जेव्हां कोणी एखादा मनुष्य कापडाचा, वकीलीचा, डॉक्टरीचा किंवा असा दुसरा धंदा करावयाला निघतो तेव्हां तो असा विचार केव्हांच करीत नाहीं कीं सर्वच जर कापडवाले, वकील, डाक्टर झाले तर दुसऱ्या धंद्याचें कसें होईल व दुसरे धंदे कोण करतील? हें तर सृष्टिक्रमाच्या नियमाप्रमाणें व्हावयाचें तें होतच आहे. मनांत कोणत्याही प्रकारच्या खोट्यानाट्या भीतीला जागा न देतां ज्यांत आपला स्वतःचा फायदा आहे व वस्तुतः जें कार्य उत्तम आहे तें कार्य करण्या साठीं आपण आपली पराकाष्ठा करावी त्यांतच आपलें कल्याण असून तें कार्य करणें हाच श्रेयस्कर मार्ग आहे.

पुत्रेच्छेनें ब्रह्मचर्यव्रताचा भंग.

या ठिकाणीं अशी एक शंका घेण्याला जागा आहे कीं— " कित्येक ठिकाणीं

अपुत्रस्य गतिर्नास्ति स्वर्गो नैव च नैव च ।
तस्मात्पुत्रमुखं दृष्ट्वा स्वर्गं गच्छन्ति मानवाः ॥१॥

वरील प्रमाणें शास्त्र वचन आहे. तेव्हां असें करावें ? अर्थात् निपुत्रिकाला सद्गति नाहीं. जर आजन्म ब्रह्मचर्यव्रतानें आपण राहिलों–अविवाहित राहिलों–तर पुत्र प्राप्ति कशी होणार व पुत्र झाली नाहीं तर सद्गति कशी मिळणार " ?

या शंकेंत मुळींच तथ्य नाहीं. आपण या बाबतींत जरा दूरवर विचार करूं. वरील वचनाचा खरा तात्पर्यार्थ न समजणारे कित्येक इसम आर्थिक विचाराला तिलांजलि देऊन अष्टौप्रहर–रात्रंदिवस–इतके विषयासक्त होतात कीं कोंबडा, कुतरा आणि डुक्कर यांच्याप्रमाणें संततीची वृद्धीच करीत राहतात. म्हणून तशा मनुष्यांनीं वरील वचना बरोबरच मनुस्मृतीच्या पांचव्या अध्यायांतील खालील श्लोक देखील खास ध्यानांत ठेवला पाहिजे:—

अनेकानि सहस्राणि कुमारब्रह्मचारिणाम् ।
दिवं गतानि विप्राणामकृत्वा कुलसंततिम् ॥ १५६ ॥

अर्थात्:—कुलवृद्धीचें साधन जी संतति ती उत्पन्न केल्या शिवाय ब्राह्मणांचे अनेक हजारो ब्रह्मचारी कुमार स्वर्गांत गेले–अर्थात् यावज्जन्म ब्रह्मचर्यव्रत पाळून करून स्वर्गांत गेले.

सनक, वालखिल्य वगैरे अनेक महानुभाव स्वर्गांत गेल्या-गोष्टी हिंदुधर्माच्या प्राचीन इतिहासावरून सिद्ध आहेत.

जर अपुत्रस्यगतिर्नास्ति हा नियम सर्वथैव सत्यच असता तर स्मृतिकार मनु यांच्या कथनाप्रमाणें यावज्जन्म ब्रह्मचर्य पालन करणारे हजारों ब्रह्मचारी स्वर्गातच कसे जाते ! इतकेंच नाहीं परंतु नियोग पद्धतीनें पुत्रप्राप्ति करावी या पेक्षां सर्वथैव ब्रह्मचर्यच पाळावें ही गोष्ट स्मृतिकार मनूंना अधिक संमत आहे. कारण नियोगाच्या योगानें अनेक अनर्थ उद्भवतात. स्मृतिकार मनु मनुस्मृतीच्या पांचव्या अध्यायांत सांगतात कीं:—

पाणिग्राहस्य साध्वी स्त्री जीवतो वा मृतस्य वा।
पतिलोकमभीप्सन्ती नाचरेत्किंचिदप्रियम् ॥ १५६ ॥

कामं तु क्षपयेद्देहं पुष्पमूलफलैः शुभैः ।
न तु नामापि गृह्णीयात् पत्यौ प्रेते परस्य तु ॥१५७॥

आसीताऽऽमरणात्क्षान्ता नियता ब्रह्मचारिणी ।
यो धर्म एकपत्नीनां काङ्क्षन्ति तमनुत्तमम् ॥ १५८ ॥

मृते भर्तरि साध्वी स्त्री ब्रह्मचर्ये व्यवस्थिता ।
स्वर्गं गच्छत्यपुत्रापि यथा ते ब्रह्मचारिणः ॥ १६० ॥

अपत्यलोभाद् या तु स्त्री भर्तारमतिवर्त्तते ।
सेह निन्दामवाप्नोति पतिलोकाच्च हियते ॥ १६१ ॥

नान्योत्पन्ना प्रजास्तीह न चाप्यन्यपरिग्रहे ।
न द्वितीयश्च साध्वीनां क्वचिद्भर्त्तोपदिश्यते ॥ १६२ ॥

पतिं हित्वापकृष्टं स्वमुत्कृष्टं या निषेवते ।
निन्द्यैव सा भवेल्लोके परपूर्वेति चोच्यते ॥ १६३ ॥
व्यभिचारात्तु भर्तुः स्त्री लोके प्राप्नोति निन्द्यताम् ।
शृगालयोनिं प्राप्नोति पापरोगैश्च पीड्यते ॥ १६४ ॥
पतिं या नाभिचरति मनोवाग्देहसंयता ।
सा भर्तृलोकमाप्नोति सद्भिः साध्वीति चोच्यते ॥१६५॥
अनेन नारीवृत्तेन मनोवाग्देहसंयता ।
इहाग्र्यां कीर्तिमाप्नोति पतिलोकं परत्र च ॥ १६६ ॥

अर्थातः—विवाहित स्त्रीचा पति जिवंत असो किंवा मृत असो परंतु पतिलोकाची इच्छा करणारी साध्वी स्त्री पतीला अप्रिय असें कार्य केव्हांही करणार नाहीं अर्थात् पुत्र प्राप्तीच्या इच्छेनें केव्हांही व्यभिचाराच्या मार्गाचें सेवन करणार नाहीं. १९६

साध्वी–सदाचरणी–स्त्री आपल्या शरीराला पुष्प, मूळ (कंद) आणि फळ यांच्या आहारा वरच ठेविते, स्वतःच्या शरीराचा नाश करून टाकते पण परपुरुषाचें नांव देखील घेत नाहीं. १९७.

स्त्रियांच्या एकपतीव्रतरूपी आदर्श धर्माची इच्छा करणारी स्त्री आपल्या मरणकाला पर्यंन्त क्षमाशील आणि कडकडीत ब्रह्म-चर्यव्रतानें राहते. १९८.

स्वपति स्वर्गस्थ झाल्यावर ब्रह्मचर्यांत लीन असलेल्या पुत्रहीन. स्त्रीला देखील जसें जनक, वालखिली वगैरे कुमार स्वर्गांत गेले त्या प्रमाणें स्वर्ग प्राप्ति होते. १६०.

पुत्र लोभाच्या इच्छेनें जी स्त्री आपल्या पतीला सोडून परपुरुषा बरोबर रममाण होते त्या स्त्रीची या लोकांत निन्दा होते व ती स्त्री पतिलोका पासून देखील भ्रष्ट होते. १६१.

अन्य पुरुषा पासून उत्पन्न झालेली प्रजा (संतति) अनीतीनें प्राप्त झालेली असल्यामुळें आपली स्वत ची म्हणून मानली जात नाहीं अर्थात्–स्त्रीनें परपुरुषा पासून तसेंच पुरुषानें परस्त्री पासून उत्पन्न केलेली प्रजा (संतति) दोघी त्यांची म्हणून गणना होत नाहीं, तसेंच साध्वी स्त्रीयांना, अन्य पति करावा असा उपदेश कोठेंही केलेला आढळून येत नाहीं. १६२

आपल्या दुर्बळ–अशक्त–पतिला सोडून जी स्त्री दुसऱ्या सबळ पुरुषाला ग्रहण करिते ती लोकांत निन्देस पात्र होते. अर्थात् प्रथम पति सोडून त्या स्त्रीनें दुसरा पति केला असा स्त्रिया विषयीं लोकांत गोष्टी सुरु होतात. १६३.

आपल्या पतीला सोडून देऊन परपुरुषा बरोबर रत होणारी स्त्री लोकांत निंदेस पात्र होते व मेल्यानंतर ती कोल्ही होते तसेंच कुष्ठादि रोगा पासून देखील ती पीडित होते. १६४.

भी श्री आपल्या पत्नीला सोडीत नाहीं आणि काया वाचा मनें करून पति जाणीं मनोहित लीन राहते ती लोक स्वर्गलोकामत्त नेते व त्यास सीता विजय लोक असेही म्हणतात. १६१.

या प्रमाणें स्त्रियांच्या शुद्ध आचार विचारानें वागणारी, काया वाचा आणि मन यांनी पवित्र्याची स्त्री या लोकांत उत्तम कीर्ति मिळविते व परलोकांत पति समवेत राहते आहे. १६६.

यांत स्मृतिकारांच्या वचनाच्या भावार्थावरून आपणाला एम करून येईल कीं—पुत्रेच्छेनें ब्रह्मचर्यव्रताचा भंग करणें ही कोणत्याही प्रकारे इच्छा करण्या सारखी गोष्ट नाहीं, अर्थात झाला नाहीं, तर सद्गति होणार नाहीं या आशेनें जे पुरुष ब्रह्मचर्यव्रताचा भंग करितात ते सर्वोत्तर फार मोठी करितात इतकेंच नाहीं पण अशा तऱ्हेच्या खोट्या नाट्या । धर्मसूत्र, धर्मगुरुंनीं मनुष्य जीवनाच्या महत्वाला तिलांजली देतात. मनुष्य जीवनाचें जें महत्व आहे तें समजून टाकतात. या शिवाय विशेष: इतर आपणाला एक दोन पुत्र असून देखील मात्र पुत्र उत्पन्न करण्याच्या नादीं लागतात व या त्यांच्या नादिष्ट स्वभावामुळें ते आपल्या स्वतःच्या शारीरीं पुष्कळ हानि करून घेतात; शिवाय ते आपल्या स्वतःची आर्थिक हानि करून घेतात इतकेंच नाहीं पण आपल्या देशाच्या

आर्थिक स्थितीच्या हानीला पुष्कळच कारणीभूत होतात. देशाच्या आर्थिक नुकसानीचा आपण पुढें विचार करूं. सध्यां तर आपण याच एका निर्णयावर येऊं कीं जे–संपूर्ण–यावज्जन्म ब्रह्मचर्यंना पाळण्याला असमर्थ असतील–अथवा शेवटपर्यंत ब्रह्मचर्य ज्यांच्या कडून पालन होणें शक्य नसेल ते या पूर्वी सांगितल्या प्रमाणें म्हणजे–पुरुष २५ वर्षांनंतर व स्त्री १६ वर्षांनंतर–लग्नाला अधिकारी होतात.

लग्न कोणा बरोबर करावें ?

लग्न करणाऱ्याला लग्न करण्याचा मुख्य हेतु काय आहे हें समजलें पाहिजे. जर मुख्य हेतु काय आहे हें त्याला माहीत नसेल तर त्याने त्याचा विचारपूर्वक करून तो समजून घेतला पाहिजे. अर्थात् ही गोष्ट खरी आहे कीं–संसारी गृहस्थाला तीन पुरुषार्थांची साधना करण्याचें सांगितलें आहे. धर्म, अर्थ आणि काम; व मोक्षाचे अधिकारी मुमुक्षु अथवा साधु हे आहेत असें शास्त्रविधान येत आहे. आतां आपण ' काम ' पुरुषार्थं विषयीं पाहूं. काम पुरुषार्थ कोणाला म्हणावें व त्याची साधना कशी करावी? अशाच मनुष्यें काम पुरुषार्थाची साधना करी: नाहींतर मग ते आपल्या जीवनाची साधना कर- [illegible] कामपुरुषार्थांची साधना [illegible] [illegible] [illegible] [illegible] प्रमाणेंच साधना करणारे

म्हणजे स्वत.ची पायमल्ली करून घेणारे असतात. हजार नाहीं परंतु दहा मनुष्यांतून देखील क्वचितच एखादा असा मनुष्य दृष्टीला पडतो कीं जो विवाह केल्या नंतर शास्त्रोक्त विधि प्रमाणें कामपुरुषार्थाची साधना करतो अथवा ज्यानें शास्त्रोक्त विधी प्रमाणें काम पुरुषार्थाला साधिलें आहे. या काम पुरुषार्थाचा अर्थ काय व त्याची साधना कशी करावी ? या बाबतींत जास्त स्पष्टीकरण करण्यापूर्वी अगाऊ एका गोष्टी कडे वाचकवर्गाचें सुद्धाम लक्ष ओढणें अगत्याचें वाटत आहे व ती गोष्ट म्हणजे ही कीं " लग्न कोणा बरोबर करावें ? "

लग्न–विवाह–याला शास्त्रकारांनीं गृहस्थाश्रमांतील जीवनाला मर्यादित करण्याचें कारण मानिलें आहे. व विवाह गृहस्थाश्रमांतील जीवनाला मर्यादित करितो असें मानूनच कलिकाल सर्वज्ञ श्री हेमचंद्राचार्य आपल्या योगशास्त्र नांवाच्या ग्रंथांत असें सांगतात कीं:—कुल–शीलसमैः सार्द्धं कृतोद्वाहोऽन्यगोत्रैजः अर्थात्:–ज्याचें कुल आणि शील (आचार) समान आहे जे अन्य गोत्राचे (भिन्न गोत्राचे) आहेत त्यांच्या बरोबरच लग्न संबंध करणारा धर्माचा अधिकारी होऊं शकतो.

या लहानशा वाक्यांत पुष्कळच गांभीर्यार्थ भरलेला आहे. सर्वांत प्रथमची मुख्य बाबत ही आहे कीं पुरुष आणि स्त्री दोघेही उत्तम कुळांतील पाहिजेत; अर्थात् उत्तम कुळांतील

पुरुषानें उत्तम कुळांतील स्त्री बरोबरच लग्न केलें पाहिजे. पुरुष उत्तम कुळांतील असून स्त्री अधम कुळांतील असली अथवा पुरुष अधम कुळांतील असून स्त्री उत्तम कुळांतील असली तर त्या पति पत्नींचें एकमेकांशीं जुळत नाहीं व त्यांचें एकमेकांवर प्रेम जडत नाहीं व परस्परांना एकमेकांचें बोलणें ऐकावें लागतें व एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढण्याचे नेहमीं प्रसंग येतात. स्त्री आणि पुरुष दोघेही समसमान कुळांतील—उच्च कुळांतील—असावेत. त्याच प्रमाणें शील म्हणजे आचारांत देखील एकमेकांचें साम्य असावें. एकाचा आचार एक व दुसऱ्याच्या निराळा असल्यास त्यामुळें देखील परस्परांशीं जुळत नाहीं, व लग्न झाल्यानंतर जर पुरुष व स्त्री यांचें एकमेकांवर प्रेम जडलें नसेल, तर अशी जोडपीं धार्मिक किंवा संसारिक बाबतींत कोणत्याही प्रकारची उन्नति करूं शकत नाहींत. याचा परिणाम असा होतो कीं अशा स्त्री पुरुषांचें सर्व आयुष्य नीरस होतें व तें त्यांना त्याच स्थितींत काढावें लागतें. पुरुष अमुक धार्मिक नियम पाळीत असला व स्त्री ते नियम पाळीत नसली अथवा स्त्री अमुक नियम पाळीत असून पुरुष ते नियम पाळीत नसला तर याचा परिणाम आपसांत वैमनस्य अथवा क्लेश या शिवाय दुसरा कव्हांही होत नाहीं. म्हणून शील म्हणजे आचार यांत देखील फरक नसावा.

या ठिकाणीं उल्लेख केला तर मला वाटते तो अस्थानीं

होणार नाहीं—कीं आजकालच्या अरहित स्वतंत्रतेच्या मना
कित्येक सुधारणा वादी म्हणविणाऱ्यांचें वर्तन आणि उप
यांच्या कडे लक्ष दिल्याम या भारतवर्षांत उपर्युक्त नियमां
बहुतेक अंशीं लोप होण्याची भीति वाटत आहे. लक्ष म्हणजे
काय, ल्म कशासाठीं करावें, याचा कोणत्याही प्रकारें हेतु
समजल्या वाचून कित्येक उच्च मानलेल्या कुळांतील पुरुष केवळ
आपली विषय वासना पूर्ण करण्यासाठीं हलक्यांत हलक्या कुळां-
तील व नीच–हलक्या–आचाराची स्त्री हुडकून निवडून आणून
आपल्या घरांत बसवितात–इतकेंच नाहीं पण व्यवहार व शास्त्र
यांच्या मर्यादा व आज्ञा यांचा भंग करून अशा नीच आचर-
णाच्या स्त्रीला आपली पत्नी म्हणून ओळखविण्याला त्यांना
थोडी देखील लज्जा वाटत नाहीं. आर्यावर्तांतील आर्य प्रजेचें हें
आर्यत्व !! ज्यांच्या शरीरांतून रक्तांतून तसेंच प्रत्येक धमनींतून
आणि हाडमांसांमधून आर्यत्वाचा–अध्यात्माचा अभिमान असला
पाहिजे तीच मनुष्यें सध्यां वाटेल त्या अधम कुळांतील आणि वाईट
आचाराच्या स्त्रीचा पति होण्यांत गौरव मानतात! शोभा सम-
जतात!! हें खरोखरच अतिशय खेदजनक दृश्य होय! अफसोस!
हे आर्यपुत्रांनो! हे भारत संतानांनो! तुम्ही आपल्या प्राचीन
ऋषी आणि महर्षींचीं वचनें थोडी तरी स्मृतींत आणा! त्यांचें
तुम्ही थोडें देखील स्मरण करा! त्यांच्याकडे काकदोळा करूं
नका. तसें करण्यांत तुमचें अहित आहे या कडे लक्ष असूं द्या.

तुमच्या आर्याभिमानी पूर्व पुरुषांच्या बहुमूल्य वचनांना हृदय पटलावर कोरून ठेवा. बेशक ही गोष्ट सूर्य प्रकाशा इतकी जरूरीची आहे की तुम्ही हलकीं कामें करणाऱ्यां जातींतील मनुष्यांना शिक्षण द्यावें, त्यांना, सत्य म्हणजे काय ? प्रेम ही काय वस्तु आहे ? ब्रह्मचर्य म्हणजे काय ? आहार व्यवहार याची शुद्धता कशी असावी ? इत्यादि बाबतींत समजून सांगितलें पाहिजे. त्यांचा आचार विचार यांची सुधारणा केली पाहिजे आणि त्यांना चांगलीं चांगलीं कामें करण्याला शिकविलें पाहिजे व हें सर्व करणें अत्यंत जरूरीचें नाहीं असें कोण म्हणेल ? परंतु एकदम तुमचे बरोबर त्यांना तुम्ही बसविलें किंवा त्यांच्या बरोबर तुम्ही भोजनाला बसलांत म्हणजे कांहीं तुम्ही त्यांना स्वर्गसुखाची प्राप्ति करून देत आहांत असें मात्र मानूं नका. तसेंच ज्या जातींचा आचार विचार तुमच्या जातींतील आचार विचारांशीं जुळत नाहीं आणि ज्या जातींची यथावत् प्रणालिका तुमच्या प्रणालिके बरोबर मिळत नाहींत, इतकेंच नाहीं तर त्या अगदीं भिन्न आहेत तेव्हां अशा जातींतील कन्या आणून तुम्ही त्याना आपल्या घरांत बसवुं नका, व अशा स्त्री बरोबर तुम्ही विवाह करूं नका !!

आपण थोडासा दूरवर विचार करून पाहूं लागलों तर आपल्या असें नजरेला येईल कीं ज्या देशांत ज्ञातिबंधन नाहीं, तेथें देखील उंच आणि नीच अशा तऱ्हेचा व्यवहार पाहण्यांत

येतो इतकेंच नाहीं पण त्याप्रमाणें व्यवहाराला अनुकूल असे कार्ये होतात. उदाहरणार्थः—यूरोपांत जे लोक राजकुटुंबी आणि लॉर्ड म्हणून ओळखिले जातात ते लोक मोची अथवा चांभाराचा धंदा करणाऱ्या लोका बरोबर एकाच टेबलावर बसून खाना खात नाहींत—जेवीत नाहींत. जेथें जातिबंधन नाहीं त्या देशांत देखील जर लोक उंच नीच व्यवहार ठेवितात तर आर्यावर्तांत उत्पन्न झालेल्या आर्य प्रजेनें कर्तव्या प्रमाणें उंच नीच व्यवहार ठेविला तर त्यांत नडलें कोठें ! व तसा व्यवहार ठेवणें हें कर्तव्य नाहीं काय ! जैन सिद्धांतांत देखील मनुष्यांचे जातिसंपन्न, कुलसंपन्न व त्याहून विपरित असे दोन विभाग दाखविले आहेत. वरील विवेचना वरून आम्ही इतर संकुचित दृष्टिनें विचार करणाऱ्या लोका प्रमाणें असें म्हणत नाहीं व आमची असें म्हणण्याची इच्छाही नाहीं कीं—शूद्रांना अथवा हलक्या जातीच्या लोकांना ज्ञान देऊं नये अथवा धर्म सांगू नये—धर्मज्ञान देऊं नये. किन्वेकांचें असें देखील म्हणणें आहे कीं—'शूद्रांना जो उपदेश करील अथवा शूद्राला जो एखादें व्रत सांगेल तो त्या शूद्रा बरोबरच असंवृत नांवाच्या नरकाला जातो. ही गोष्ट संकोच दृष्टि आणि पक्षपात यांनीं भरलेली आहे. शूद्रादिकांना देखील आत्मा आहे व तो मूळ स्वरूपीं सच्चिदानंदमयच आहे; परंतु कर्मांच्या कारणानें त्या लोकांना अमुक जाति प्राप्त झालेली आहे. म्हणून उचित व्यवहारपूर्वक त्यांना देखील अवश्य उपदेश दिला पाहिजे व त्यांना

तुमच्या आर्याभिमानी पूर्व पुरुषांच्या बहुमूल्य वचनांना हृदय पटलावर कोरून ठेवा. बेशक ही गोष्ट सूर्य प्रकाशा इतकी जरूरीची आहे कीं तुम्ही हल्कीं कामें करणाऱ्यां जातींतील मनुष्यांना शिक्षण द्यावें, त्यांना, सत्य म्हणजे काय ? प्रेम ही काय वस्तु आहे ? ब्रह्मचर्य म्हणजे काय ? आहार व्यवहार याची शुद्धता कशी असावी ? इत्यादि बाबतींत समजून सांगितलें पाहिजे. त्यांचा आचार विचार यांची सुधारणा केली पाहिजे आणि त्यांना चांगलीं चांगलीं कामें करण्याला शिकविलें पाहिजे व हें सर्व करणें अत्यंत जरूरीचें नाहीं असें कोण म्हणेल ? परंतु एकदम तुमचे बरोबर त्यांना तुम्ही बसविलें किंवा त्यांच्या बरोबर तुम्ही भोजनाला बसलांत म्हणजे कांहीं तुम्ही त्यांना स्वर्गसुखाची प्राप्ति करून देत आहांत असें मात्र मानूं नका. तसेंच ज्या जातींचा आचार विचार तुमच्या जातींतील आचार विचारांशीं जुळत नाहीं आणि ज्या जातींची यथावत् प्रणालिका तुमच्या प्रणालिके बरोबर मिळत नाहींत, इतकेंच नाहीं तर त्या अगदीं भिन्न आहेत तेव्हां अशा जातींतील कन्या आणून तुम्ही त्यांना आपल्या घरांत बसवूं नका, व अशा स्त्री बरोबर तुम्ही विवाह करूं नका !!

आपण थोडासा दूरवर विचार करून पाहूं लागलों तर आपल्या असें नजरेला येईल कीं ज्या देशांत ज्ञातिबंधन नाहीं, तेथें देखील उंच आणि नीच अशा तऱ्हेचा व्यवहार पाहण्यांत

आर्गो. असा मर्देने एकाच स्त्रीच्या सी पुरुषा बरोबर … मान्याने त्या मोहच्या पासून मी संतति उत्पन्न होते ती बहि… मुखी, ओंगळी, पांगळी, नशीबपूर्ण अशी असते. त्याचप्रमाणे असा संततीला शरीर आणि मन यांच्या ठिकाणीहि हीनत्व आलेले असते. म्हणुन श्रम करताना गोत्राच्या बाबतीत देखील विचार करण्याची अतिशय जरूरी आहे. म्हणजे सगोत्रीयाच्या बरोबर कदापि देखील श्रम करूं नये. या शिवाय वय आदि करून इतर बाबतीत देखील विचार करणेचा आहे पण इतक्या सर्व बाबतीचा विचार तुर्त बाजूला ठेवून आपण मुख्य मुद्याच्या गोष्टीचाच विचार करूं.

" काम " पुरुषार्थाची साधना कशी करावी ?

या पूर्वीच आपण विवेचन केलें आहे कीं गृहस्थांना ज्या तीन पुरुषार्थांची साधना करावयाची आहे त्या पैकीं तिसरा पुरुषार्थ म्हणजे काम होय. या पुरुषार्थांची साधना कशी करावी हें गृहस्थांनीं समजून घ्यावयाचें आहे पण त्याच्या हीं आधीं ' काम ' पुरुषार्थ कशाला म्हणतात हें जाणण्याची खास जरूरी आहे.

' कामाचें ' सामान्य लक्षण आहे—'अभिमानी करसानुविद्धा सर्वेन्द्रियप्रीतिः कामः ' अर्थात् काल्पनिक रसयुक्त प्रत्येक इंद्रियाच्या ठिकाणीं प्रीति होणें याचें नांव ' काम ' आहे.

नियमा प्रमाणें चालणारे तसेंच ज्ञानी करणें जरूरीचें असून तसें केलें पाहिजे. जातीच्या कर्तव्यामुळें ते आपल्या पेशां हलके असलें म्हणून हरकत नाहीं परंतु त्यांची सुधारणा करणें हें आपलें मुख्य आणि जरूरीचें कर्तव्य आहे.

सध्यां आम्हाला सांगावयाचें आहे तें एवढेंच कीं जेथें कुल आणि शील यांची समानता आहे अशाच ठिकाणीं लग्न व्यवहार करावा. विरुद्ध कुल–शीला बरोबर लग्न व्यवहार अथवा संबंध जडल्यास अनेक प्रकारच्या कारस्थानांना तसेंच तंटया बखेड्यांना जागा होऊन बरेच वेळा अप्रिय आणि अहितकर प्रसंग उद्भवतात; आणि जेथें अशी स्थिति असते म्हणजे जेथें कारस्थानें, कंकास आणि प्रेमाचा अभाव त्या ठिकाणीं इच्छित कार्य साधणें शक्य नसतें इतकेंच नाहीं पण संसारिक सुखाचा देखील उपभोग घेणें शक्य नसते म्हणजे संसारांतील सुखा पासून देखील तो मनुष्य पराङ्मुख होतो. वरील कुलशिला बरोबरच गोत्राचाही पण विचार केला पाहिजे. अर्थात् शास्त्रकारांनीं सगोत्रीयाचे बरोबर लग्न करण्या बाबतींत निषेध केला आहे; कारण–सगोत्रीय–संबंधी म्हणजे–एकच कुळांतील–बंधु गणले जातात. व मावाबहिणींचें अथवा बहिणीचें मावा बरोबर लग्न व्यवहारांत देखील निषिद्धच आहे. वैद्यकशास्त्रकार देखील असेंच सांगतात कीं–सगोत्रीय मनुष्यांचें रक्त एकच असतें–कारण त्यांच्या परंपरेनें एकच मूळ

मासक्त नसतात हेंही आपण पाहतों. पशूंमध्यें सर्वांत कामा-
क म्हणजे कुत्रा मानला आहे पण त्याच्या देखील कामवा-
नेचे महिने ठरलेले आहेत. दुर्दैव एवढेंच कीं मनुष्य मात्राला
त्वातत्त्वांचा विचार करण्याची शक्ति असून तसेंच स्वतःचें हित
थवा अहित कशांत आहे हें समजण्याची बुद्धि असून देखील
कामांध होऊन विषयाचे ठायीं एवढे आसक्त होतात कीं
यांना आपल्या शरीराचें भान राहत नाहीं, ते लोक निरंभी
र्वा करीत नाहींत इतकेंच नाहीं पण स्वतःच्या व दुसऱ्याच्या
मर्थ्याचा पण ते विचार करीत नाहींत. रात्रंदिवस त्यांना
ामवासनें शिवाय दुसरें कांहीं देखील दिसत नाहीं. वर्तमानपत्रांत
ापण अशा पुष्कळ गोष्टी वाचल्या आहेत कीं अमुक एक
सम विवाहानंतर अथवा फलशोभना नंतर एक महिन्याचे आंतच
रून गेला. अमुक एक इसम संसारिक झाल्यावर अथवा शांतिक
ाल्यानंतर पंधरा दिवसानंतरच मृत्यु मुखीं पडला. याचें काय
रें कारण असावें ? याचें कारण दुसरें तिसरें कांहींही नसून
ाम्ही वर सांगितलें तेंच. म्हणजे त्यांची विषयासक्तता. पुष्कळ
ोक विचार करितात म्हणजे असेंच समजतात कीं ही दासी—
ख्री जिचा खरा दर्जा अर्धांगनेचा आहे—आम्ही विषयसेवना-
ाठींच आणिली आहे. पण या त्यांच्या विषयासक्ततेचा परिणामच
यांच्या स्वतःच्या संसाराचा लौकरच अंत आणतो. याला
ांहीं कोणताही सुज्ञ कामपुरुषार्थाची साधना म्हणणार नाहीं व
ी कांहीं कामपुरुषार्थाची साधना पण नव्हे.

या पुरुषार्थाने नीति पूर्वक सेवन आल्यास काम पुरुषार्थाची योग्य साधना झाली असे म्हणतां येईल. पण नर शास्त्र मर्यादेचें उल्लंघन करून अनीति पूर्वक या पुरुषार्थाने सेवन केलें तर ती कामसाधना नसून कुकाम–दुष्कर्म साधना केली असे होईल. अशा तऱ्हेची कामसाधना म्हणजे कुकर्मच होय. जो पुरुष स्त्री बरोबर देखील मर्यादितच–म्हणजे वैद्यशास्त्र व धर्मशास्त्र यांच्या नियमानुसार–संसार सेवन करितो तोच काम पुरुषार्थाची साधना करितो असे म्हणतां येईल. असे नियमित वर्तन न करणारे म्हणजे मर्यादा भंग करणारे हे पशू पेक्षां देखील निकृष्टरे म्हणून गणले जातात. कारण पशू मध्ये देखील कित्येक पशू आपल्या नियमिततेचा भंग करीत नाहीत. याचा अर्थ असा की आपल्या घरी असलेल्या पशू पासून संतति व्हावी अशी जेव्हां घर मालकाला इच्छा होते तेव्हांच ते नर आणि मादी यांचा संभोग होऊं देतात. एरव्हीं मनुष्य नर आणि मादी या दोघांनाही ठाणावर बांधतो. याचा अर्थ एवढाच की स्वार्थापायी मनुष्य पशूंना कामसेवन करूं देत नाही. ही पशू मधील नियमितता कृत्रीम झाली. पण पशू मध्ये नियमित कालच विषय संभोगाचा आहे हें आपण पाहतो. शिवाय एखाद्या मादीनें गर्भ धारण केला की दुसरे पशू त्या मादी जवळ जात सुद्धां नाहींत. पशूला तें नैसर्गिक ज्ञान असतें. शिवाय नर आणि मादी हे रात्रंदिवस एक ठिकाणीं असुन देखील त्यांच्या ठराविक काला शिवाय पशू

बरोबर योग्य कार्णी संबंध ठेवणें-नियमित वेळा शिवाय अन्यवेळा संबंध न ठेवणें-म्हणजे " ब्रह्मचर्य " अशी व्याख्या होईल.

या नियमाच्या विरुद्ध जे वर्तन करितात, ते खरोखरच ब्रह्मचर्यव्रत भंग करितात. कित्येकांची अशी खोटी समजूत झालेली आहे कीं विवाहानंतर विवाहिता स्त्री शिवाय इतर स्त्रिया बरोबर संबंध ठेवणें अथवा वेश्यागमन करणें म्हणजे ब्रह्मचर्यव्रत भंग होय. परंतु वस्तुस्थिति मात्र तशी नाहीं. वेश्यागमन अथवा परस्त्रीसेवन हा एक प्रकारचा दुराचार आहे; परंतु अति आणि अनियमित स्वस्त्री संगानें ब्रह्मचर्यव्रताचा भंग होतो. स्वस्त्री बरोबर केव्हां व कशा परिस्थितींत संबंध केला म्हणजे ब्रह्मचर्य-व्रताचा भंग होतो त्याचीं कांहीं लक्षणें खालीं दिलीं आहेत:- अनियमित आणि अयोग्य प्रकारचें वर्तन ठेवणें, वीर्याचा मर्यादे बाहेर व्यय करणें, स्त्रीच्या इच्छेविरुद्ध बळजबरीनें विषयसेवन करणें, काळ आणि वेळ याचा विचार न करणें, रजस्वला, सगर्भा आणि व्याधिग्रस्त स्त्री बरोबर संबंध करणें वगैरे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ब्रह्मचर्याच्या नियमा विरुद्ध वर्तन करणें याचें नांव " ब्रह्मचर्याचा भंग " अथवा " व्यभिचार " होय.

गृहस्थाश्रमांत असें मुद्दाम नमूद करून ठेवण्यांत आलें आहे कीं, ' पुत्रकामः स्वदारेष्वधिकारी ' अर्थात्-पुत्राची इच्छा करणार याचा आपल्या पत्नीच्या ठायीं अधिकार आहे. परंतु हें

लग्ना नंतर देखील पाळावें लागणारें ब्रह्मचर्य.

मनुष्यांनीं हें खूप ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं लग्न होण्यापूर्वी त्यांच्यावर ब्रह्मचर्य पाळण्याची जेवढी जबाबदारी होती व त्यांना ब्रह्मचर्य पाळण्याची जेवढी आवश्यकता होती तितकीच किंबहुना त्याहूनही ब्रह्मचर्य पाळण्याची जास्त जबाबदारी व अवश्यकता लग्न झाल्यावर देखील त्यांच्यावर आहे असें आपण म्हटल्यास तें सत्याला सोडून नाहीं.

विवाहाचे आधीं वीर्याचें चांगल्या प्रकारें रक्षण करणें हें जसें ब्रह्मचर्य आहे त्याच प्रमाणें विवाहानंतर वीर्याचा अतियोग अथवा मिथ्यायोग न होऊं देणें हें देखील एक प्रकारचें 'ब्रह्मचर्य' च आहे. व या दुसऱ्या ब्रह्मचर्याचें पालन करणें पहिल्याहून जास्त कठीण आहे. विषयवासनेच्या पूर्णतेला अनुकूल परिस्थिति असून देखील मन आपल्या ताब्यांत ठेऊन विषय वासनेला दाबून ठेवणें हें कठीण नाहीं काय ? या प्रमाणें मनाला जे आपल्या ताब्यांत ठेऊं शकत नाहींत तेच स्त्रियांना बघितल्या बरोबर वेडे बनतात. परंतु सरोगर, गृहस्थांनीं असलें वेडेपण न करतां ब्रह्मचर्याचें अवश्य पालन केलें पाहिजे. गृहस्थांच्या म्हणजे विवाहितांच्या ब्रह्मचर्याची जर आपण व्हावनशी व्याख्या करूं लागलों तर " प्रजोत्पादनाच्या हेतूनें आपल्या विवाहिता स्त्री

असल्या दुराचारी मनुष्या करितां शास्त्रांमध्यें पुष्कळच सांगितलें आहे. असल्या दुराचारी लोकांविषयीं आपण बेधडक एवढें विधान करूं शकतों कीं त्यांच्या अंतःकरणांत धर्माला जागाच नाहीं. नव्हे नव्हे ते अधर्मी आहेत असें म्हटलें तरी चालेल. ही गोष्ट अथवा हा आरोप कित्येकांना पटत नाहीं पण या विषयीं एकच दृष्टान्त पुरेसा आहे व तो असाः—समजा एक परस्त्री रत मनुष्य आहे व त्यानें आपल्या कामपाशाला असा संदेश पाठविला कीं अमुक वेळेला अमक्या ठिकाणीं मी येऊन भेटेन. अथवा आपल्या कामपाशाशी रजा घेण्याचे वेळेस असें ठरविलें कीं उद्यांक अमुक ठिकाणीं इतके वाजतां येऊन आपण प्रेम गोष्टी करूं. त्याच्या दुर्दैवानें—वा सुदैवानें—त्याच वेळेला त्याच्या गावात त्याच्या जातींतील अत्यंत पूजनीय व श्रेष्ट गुरुवर्य आले अथवा प्रत्यक्ष परमेश्वर अवतरला तरी देखील सदरहू मनुष्य आपल्या गुरुच्या अथवा परमेश्वराच्या दर्शनाला जाणें शक्य आहे काय ! कदापि देखील नाहीं. उलट आपली महत्वाची हजारों कामें टाकून देऊन तो आपल्या माननीय देवीच्या दर्शनाला जाणार. यावरून काय सिद्ध होतें ! त्याच्या अंतःकरणांत धर्मवासनेचा अभाव दुसरें कांहींच नाहीं. तेव्हां असे धर्महीन आणि दुराचारी इसम आपल्या स्वतःची, सर्व तऱ्हेनें धूळधाणी करून घेतात ही स्पष्ट गोष्ट आहे. आतां सख्खी बरो-
[illegible] अमर्यादित विषय सेवन करणाऱ्याची स्थिति पाहिली तर

केव्हां ! तो योग्यवयांत आल्यानंतर, नेहमीं करितो नाहीं, शिवाय त्यानें विशिष्ट नियमानें पालन केलें तर. जर त्यानें नियमानें पालन केलें नाहीं, अनियमित रीतीनें वर्तन केलें, तर तो तिर्यंच्याहूनही हलक्या जातीचा मानला जातो. या बाबतींत भक्तशिरोमणी श्री तुलसीदास यांचा एक मार्मिक दोहा आहे कीं.—

कार्तिक मासके कुतरे तजे अन्न और प्यास ।
तुलसी वांकी क्या गति जिसके बारे मास ॥ १ ॥

कुत्रा एक महिन्याच्या विषयसेवनानें पिसाळतो; त्याचे केस गळून पडतात; त्याच्या अंगावर चट्टे पडतात; त्याच्या कानांत किडे पडतात; व कित्येक तर मृत्युमुखीं देखील पडतात. एक महिन्याच्या विषयसेवनानें जर वर प्रमाणें स्थिति होते तर जे बाराही महिने विषय सेवन करितात त्या मनुष्य प्राण्याची काय स्थिति झाली पाहिजे याचा वाचकांना विचार करतां येण्या सारखा आहे.

परस्त्री सेवन आणि वेश्या गमन यांच्या योगें जे आपल्या ब्रह्मचर्याचा भंग करितात त्यांची गोष्ट आपण बाजूला ठेवूंया. कारण परस्त्री सेवन आणि वेश्या गमन करणारे ब्रह्मचर्याचाच भंग करितात इतकेंच नाहीं पण ते दुराचाराचें सेवन करितात.

असल्या दुराचारी मनुष्या करितां शास्त्रांमध्यें पुष्कळच सांगितलें आहे. असल्या दुराचारी लोकांविषयीं आपण बेधडक पुष्पावेनों विधान करूं शकतों कीं त्यांच्या अंतःकरणांत धर्माला जागाच नाहीं. जवळ जवळ ते अधर्मी आहेत असें म्हटलें तरी चालेल. ही गोष्ट अथवा हा आरोप कित्येकांना पटत नाहीं पण या विषयीं एकच दृष्टान्त पुरेसा आहे व तो असाः—समजा एक परस्त्री रत मनुष्य आहे व त्यानें आपल्या कामपात्राला असा संदेश पाठविला कीं अमुक वेळेला अमक्या ठिकाणीं मी येऊन भेटेन. अथवा आपल्या कामपात्राशीं रमा घेण्याचे वेळेस असें ठरविलें कीं उद्यां अमुक ठिकाणीं इतके वाजतां येऊन आपण प्रेम गोष्टी करूं. त्याच्या दुर्दैवानें—वा सुदैवानें—त्याच वेळेला त्याच्या गावांत त्याच्या मार्गातील अत्यंत पूजनीय व श्रेष्ट गुरुवर्य आले अथवा प्रत्यक्ष परमेश्वर अवतरला तरी देखील सदरहू मनुष्य आपल्या गुरूच्या अथवा परमेश्वराच्या दर्शनाला जाणें शक्य आहे काय ! कदापि देखील नाहीं. उलट आपली महत्वाची इतरीं कामें टाकून देऊन तो आपल्या माननीय देवीच्या दर्शनाला जाणार. यावरून काय सिद्ध होतें ! त्याच्या अंतःकरणांत धर्मभावनेचा अभाव दुसरें कांहींच नाहीं. तेव्हां असे धर्महीन आणि दुराचारी इसम आपल्या स्वतःची, सर्व तऱ्हेनें पायमल्ली करून घेतात ही स्पष्ट गोष्ट आहे. आतां स्वस्त्री बरो-बर अमर्यादित विषय सेवन करणाऱ्याची स्थिति पाहिली तर

तेंहेही आपणाला असेंच दिसून येईल कीं विषयाच्या अति हव्यासानें स्त्री बरोबर अमर्यादित विषय सेवन करणारा देशांत आपल्या स्वतःच्या शरीराची पायमल्ली करून घेतो. म्हणून मनुष्यमात्रानें शास्त्रमर्यादेचा विचार तर अवश्यमेव केलाच पाहिजे.

विषय सेवनाची मर्यादा.

ही मर्यादा शास्त्रविनानां भावप्रकाशांत असें सांगितलें आहे कीं:—' ऋतौ भार्यामुपेयान् ' अर्थात् ऋतुकाळीं पुरुषानें स्त्री जवळ जावें; स्त्री रजस्वला झाली त्या दिवसापासून १६ दिवस पर्यंतच्या काळाला ' ऋतुकाल ' म्हणतात. स्त्री रजस्वला झाली याचा अर्थ स्त्रीला ' ऋतुस्राव ' झाला तो काल समजावयाचा आहे. वैद्यक शास्त्राच्या नियमाप्रमाणें स्त्री गर्भवती राहण्याचा हाच काल आहे. या वरील सोळा दिवसांपैकीं स्त्री पुरुषानें एक दिवस नक्की केला पाहिजे. असें सांगतात कीं सोळा दिवसाचा हा ऋतुकाल संपल्या नंतर स्त्रीचें गर्भाशय बंद होतें; व तदनंतर गर्भधारणेच्या हेतूनें संयोग करणें निरर्थक आहे. येथें हेंही ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं वरील सोळा दिवसाच्या अवधींत जितके दिवस स्त्रीचा रक्तस्राव चालू असेल त्या दिवसांत चुकून सुद्धां स्त्री समागम करूं नये. वरील सोळा रात्रींत देखील अमुक अमुक रात्री वर्ज करण्यांत आल्या आहेत. या सर्व बाबतींत स्त्री समागम करण्यापूर्वी पुरुषानें विचार करण्याचा आहे.

वस्तुस्थितीचा विचार केला म्हणजे असें दिसून येतें कीं प्रत्येक मनुष्याला कमींत कमी एकसारखें अठरा महिने ब्रह्मचर्य पाळण्याचा प्रसंग जरूर मिळतो व तितक्या मुदतीपर्यंत त्यानें ब्रह्मचर्य हें अवश्यमेव पाळलेंच पाहिजे.

शास्त्रकारांचें वरील कथन सत्य आहे. व शरीरशास्त्राच्या नियमा प्रमाणें ही गोष्ट सर्वथैव सत्य आहे कीं—ज्या दिवशीं स्त्रीच्या ठिकाणीं गर्भधारणा होते त्या दिवसा पासून पुरुषानें स्त्री समागम करूं नये. हा नियम—म्हणजे स्त्री समागम वर्ज करणें—बालकाचा जन्म होऊन बालकानें दूध पिण्याचें सोडून अन्न खाण्याला सुरवात करी पावेतों पाळण्याचा आहे. जेव्हां बालक दूध पिण्याचें सोडून देतें व अन्न खाऊं लागतें त्याच वेळीं निरोगी स्त्रीला पुनः ऋतुस्राव प्राप्त होतो. हा सर्व काल जवळ जवळ अठरा महिने अथवा त्याहून थोडा अधिक होतो. या मुदतींत पुरुषानें चुकून सुद्धां स्त्री समागम करूं नये. यांचेंच नांव "ब्रह्मचर्य". स्त्री असून तसेंच स्त्रीपासून पुत्र प्राप्ति झाली असून सुद्धां वरील नियमानें चालणारा गृहस्थ हा खरा ब्रह्मचारीच समजला जातो. विवाहित पुरुषाचें ब्रह्मचर्य तें हेंच.

या प्रमाणें अठरा महिने पावेतों विवाहित पुरुषानें ब्रह्मचर्य जरूर पाळिलेंच पाहिजे असें एक इंग्रजी विद्वान देखील विशेष जोर देऊन सांगतो इतकेंच नाहीं पण याच्या ही पुढें जाऊन

त्याचें असें सांगणें आहे कीं–अठरा महिन्याची मुदतींत स्त्री फारच अशक्त झालेली असते आणि म्हणून स्त्री सुदृढ व शक्तिमान होई पावेतों पुरुषानें स्त्री समागम करूं नये. वर प्रमाणें स्त्रीला पूर्ण शक्ति येण्याचा काल सदरहू इंग्रज विद्वान आणखी बारा किंवा पंधरा महिने पुढें ढकलतो. म्हणजे एकंदर अडीच अथवा तीन वर्षें पावेतों पुरुषानें ब्रह्मचर्य अवश्यमेव पाळावयाचें आहे. अशा तऱ्हेनें ब्रह्मचर्य पाळणाऱ्या पुरुषाला–वीर्याचें रक्षण करणाऱ्या पुरुषाला–अथवा अशा नियमानें संसार सेवन करणाऱ्या पुरुषाला महान तेजस्वी, विशाळ आणि रुंद छाती असलेला, बलवान व शूर पुत्र झाला तर त्यांत नवल तें कोणतें ? व अशा तऱ्हेच्या सुदृढ संतती पासून पुढें चांगली संतति होऊन उत्तरोत्तर आर्य संसार सुधरेल हें बनणें शक्य नाहीं काय ?

काय ? जास्त विषय सेवनानें कामाची तृप्ति होते ?

या प्रसंगीं एक खुलासा करणें जरूरीचें आहे आणि तो हा कीं कित्येक जण असें समजून जास्त विषय सेवन करितात कीं–अमुक काल पर्यंत एकसारखें विषय सेवन करण्यांत आलें म्हणजे त्या संबंधीं संपूर्ण तृप्ति होते व तदनंतर त्या बाबतींत इच्छा राहत नाहीं. परंतु ही समजूत अग्नींत तूप ओतल्यानें अग्नि शांत होईल हें जितकें सत्य तितकींच सत्य मानतां येईल. विषय

सेवन वाटेल तितकें केलें करण्यांत आलें तरी त्याची निवृत्ति होणें दूरच राहिलें परंतु उलट विषय सेवनाची इच्छा जास्त प्रबल मात्र होते. स्मृतिकार मनू मनुस्मृतीच्या दुसऱ्या अध्यायांत असें सांगतात कीं.—

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ॥ ९४ ॥

अर्थात्—विषयोपभोगानें कामाची शांति कदापि देखील होत नाहीं पण अग्नीमध्यें तूप टाकल्यानें जसा अग्नि जास्त प्रज्वलित होतो तद्वत कामाची देखील वृद्धि होते.

कलिकाल सर्वज्ञ श्री हेमचंद्राचार्य हे देखील योगशास्त्राच्या दुसऱ्या प्रकाशांत या बाबतींत खालीं दिल्या प्रमाणें सांगतातः—

स्त्रीसंभोगेन यः कामज्वरं प्रतिचिकीर्षति ।
स हुताशं घृताहुत्या विध्यापयितुमिच्छति ॥८१॥

अर्थात्—जो मनुष्य, स्त्रीच्या संभोगाच्या योगें कामज्वराला शांत करूं पाहतो—शांत करण्याची इच्छा करितो—तो तुपाच्या आहुतींनीं अग्नीला शांत करूं पाहतात तद्वत प्रयत्न करितो; अर्थात तुपाच्या आहुतींनीं जसा अग्नि शांत न होतां

उष्ण प्रकृति होते त्यात भी संभोगाची कामना [illegible] होते उष्ण तो भ्रम [illegible] [illegible] [illegible] [illegible] उष्ण नुकसानकारक आहे.

विषय सेवनाची भावना मद्य–गांजे–भांगेनी जी ती भ्रम करीत त्यांत गुप्त राहते. मनुष्याच्या मन अन्य त्याच्या आवडीचा भंग होतो. विषयाची इच्छा आणि त्याची [illegible] मनुष्य दुःख, रोग, शोक, चांचल्य वाढ पण [illegible] [illegible]. त्या शरीराची अपूर्ण सामग्री आणी तरी देखील त्याची पर्वा न करिता भावना अनुभवाचा संस्कार देत घेतो त्याची आम- [illegible] राहतो. कामविषया वाढीस म्हणतात तो हाच व या कामाची तृप्ति केव्हांच होत नाहीं म्हणून सुज्ञ माणसानें अति विषय सेवनापासून नेहमीं अलिप्त रहावें.

थोडें देखील वीर्यस्खलन किती नुकसान करितें ?

आजकाल आपण अशीं पुष्कळ मनुष्यें पाहतों कीं शारीरिक बळ तर त्यांच्या अंगीं नमनेंच पण त्या बरोबरच त्यांचें मानसिक बळ इतकें कमजोर असतें कीं अगदीं लहानमहान कार्य करण्याला देखील त्यांची हिंम्मत चालत नाहीं. या त्यांच्या मानसिक दौर्बल्याचें कारण दुसरें कांहींही नसून अति–अधिक–विषयसेवन च होय. ज्यांचें अगदीं थोडें वीर्यस्खलन झालें–ज्यांच्या हातून

ब्रह्मचर्याचा—एकाद दुसरा वेळ थोडासा प्रमाद पडला अथवा ब्रह्मचर्याचा किंचित भंग झाला तर त्यांना देखील आपल्या कोणत्याही कार्यांत यश प्राप्त होत नाहीं उलट अपयशच मिळतें, याचीं अनेक उदाहरणें आपल्या समोर आहेत; तेव्हां ज्यांनीं आपलें ब्रह्मचर्याचा भंग करण्याचे बाबतींत कोणतीही मर्यादाच ठेविली नाहीं अथवा ज्यांनी ब्रह्मचर्याचा भंग करण्याचे बाबतींत आपला पहिला नंबर लाविला ते प्रत्येक कार्यांत विजय न मिळविता मागे पडले—त्यांना प्रत्येक कार्यांत अपयश आलें—तर त्यांत आश्चर्य मानण्या जोगें कांहीं आहे काय ! मुळींच नाहीं. सर्व युरोपखंडाला हालवून सोडणारी व्यक्ति नेपोलियन बोनापार्ट याची माहिती कोणाला नाहीं ! तो एक नामांकित पुरुष होऊन गेला. असे असून सुद्धां तो आपल्या पदावरून ढासळला. त्याचे अंगीं सामर्थ्य असून सुद्धां तो हरला. याचें काय बरें कारण असावें ! याचें कारण इतिहासांतून दिव्याच्या प्रकाशा सारखें स्पष्ट असें मिळतें की.—संग्रामाला जाण्याच्या अगोदर त्यानें आपला स्वतःचा घात स्वतःच करून घेतला होता. अर्थात् संग्रामांत जाण्याचे अगोदरच्या रात्रींच त्यानें स्त्री समागमाचा योग आणला होता. स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे त्यानें आपल्या रात्रींच ब्रह्मचर्याच्या मर्यादेचा भंग केला होता. अभिमन्यु सारखा महा बलवान आणि साहसी योद्धा कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर कामास आला याचें तरी कारण काय ? याचें ही कारण हेंच होतें की

रणभूमीवर मारण्याच्या अगोदर त्यानें आपल्या व्रताचा भंग केला होता. असें सांगतात कीं—मेघनादाला मारण्यास कोण समर्थ आहे ! असा जेव्हां प्रश्न निघाला तेव्हां श्री रामचंद्र प्रभूंनीं असें उत्तर दिलें कीं—' ज्यानें बारा वर्षें पावेतों कडकडीत ब्रह्मचर्य व्रत पाळलें असेल,—ज्या मुदतींत आजिबात विषार देखील त्याच्या मनांत आले नसतील, तोच वीर पुरुष मेघनादाला मारूं शकेल. ' व वरील प्रमाणें कडकडीत ब्रह्मचर्य व्रत बारा वर्षें पावेतों भक्त शिरोमणी लक्ष्मणांनीं पाळिलें असल्या मुळें मेघनादाला वध करण्याचें कामांत लक्ष्मणाला यश मिळालें. ब्रह्मचर्याच्या मुदतींत वाईट विषार देखील लक्ष्मणाचे मनाला केव्हां ही शिवले नाहींत. शिवाय लक्ष्मणाच्या पवित्रते विषयीं जास्त काय सांगावें ! त्यावेळीं सीतामाईच्या विरहानें श्री रामचंद्र प्रभू शोकाकुल होऊन वनांत सीतादेवीचा शोध करीत होते त्यावेळीं फिरता फिरता सुग्रीवाला वनांत कांहीं आभूषणें मिळालीं तीं त्यानें प्रभु जवळ दिलीं. तीं आभूषणें प्रभूंनीं आपल्या बंधूला—लक्ष्मणाला—दाखविलीं व विचारलें ' बा लक्ष्मणा हीं आभूषणें देवी सीतेचीच आहेत *काय ?* तेव्हां लक्ष्मणानें उत्तर दिलें:—

भूषणे नैव जानामि नैव जानामि कुंडले ।
नूपुराण्येव जानामि नित्यं पादाभिवंदनात् ॥ १ ॥

हे प्रभो ! मी या कुंडलादि आभूषणांना ओळखीत नाहीं पण या नूपुरांना फक्त ओळखतों कीं ती सीतामाईचींच आहेत. हीं नूपुरें ओळखण्याचें कारण हेंच कीं मी माईच्या चरणकमलांचें वंदन करी तेव्हां तीं मी पाही व याचमुळें तीं तीच आहेत असें मी सांगू शकतों.

अहाहा ! केवढा सुंदर भाव ! किती सुंदर मर्यादा ! केवढें सुंदर आणि कडकडीत ब्रह्मचर्य ! कडकडीत ब्रह्मचर्यानें जसें सुंदर फळ मिळतें व अशा ब्रह्मचारी मनुष्याला जसें त्याच्या प्रत्येक कार्यांत यश मिळतें त्याच्या उलट ब्रह्मचर्याचें पालन करण्यांत थोडी देखील कसर झाली तर त्याचा तावडतोब अनिष्ट परिणाम होतो. अशीवर नकळत जरी पाय पडला तरी जसा त्याचा परिणाम होतो तद्वत ब्रह्मचर्याचें नकळत जरी एकवेळ खंडन झालें तरी त्याचा अनिष्ट परिणाम होतोच. अशा विषयीं वर अभिमन्यु नेपोलीअन यांचे दृष्टांत दिले आहेतच त्या वरून वाचकांची खात्री होईल. पण याच बाबतींतील एक ध्यानांत ठेवण्या सारखा एक आधुनिक दृष्टांत दिल्यास तो अनाठायीं होणार नाहीं.

थोड्या वर्षां पूर्वीची गोष्ट आहे. गुजराथेंत महिमाणा नांवाचें एक गांव आहे. तेथें एक वेळा दोन मल्लांची कुस्ती झाली. दोघेही मल्ल सुदृढ आणि मजबूत होते. त्यावेळीं एक देवळा जवळ ओटी (ज्यांत दगड माती भरतात ती-अथवा ज्यावर देवळे

अधिकारी असून गेलोने हमाल ठ्ठावरून छोडगात ती–) छोड-णारा होता व दुसरा देरासर (जैन मंदिर) मधील नोकर होता. लॉरी छोटणाऱ्या मल्ला येसी देरासरमधील मल्ल फारच मजबूत असून त्यानें बऱ्याच मल्लांना चीत केलें होतें. या कुस्तींत देरासर मधील मल्लानें लॉरीवाल्या मल्लाला चीत करण्यासाठीं पुष्कळ डावपेच लढविले पण त्याचा कांहीं देखील उपयोग न होतां शेवटीं लॉरीवाल्या मल्लानें देरासर मधील मल्लाला चीत केलें. देरासरच्या मल्लाला एकेदिवशीं एकांतात बोलावून विचारलें कीं– " त्वां तर मोठमोठ्या मल्लांबरोबर कुस्त्या मारल्यात; मग या वेळीं लॉरीवाल्या मल्लानें तुला चीत केलें तें कां ? " त्यानें अत्यंत दिल्गीर होऊन कळविलें कीं:–" मी एकच वेळा माझ्या वीर्याचा वाईट तऱ्हेनें नाश केला आणि मला मिळालेलें अपयश हा त्याचाच परिणाम आहे. "

ब्रह्मचर्या पासून अलभ्य लाभ.

वरील विवेचना वरून आपल्या हें पूर्णपणें ध्यानांत आलेंच असेल कीं, वीर्यहानि ही मनुष्याला सर्वच कामांत अहितकारिणी होते. वीर्यहानी पासून मनुष्यमात्राला प्रत्येक कार्यांत अपयश येते, सारांश वीर्यहानि हें या संसारांत दुःखाचें मूळ असून वीर्यहानी मुळेंच मनुष्यमात्राची अवनति झाली आहे. एके ठिकाणीं एका विद्वानानें वीर्य रक्षणाची अवश्यकता या बाबतींत असें,

म्हटलें आहे कीं—दिव्याला जितकी तेलाची अवश्यकता आहे तितकीच मनुष्यच्या शरीर रक्षणाला वीर्याची अवश्यकता आहे. म्हणजे तेला शिवाय जसा दिवा जळूं शकत नाहीं व जास्त तेलानें दिवा जसा जास्त प्रकाश देतो त्याच प्रमाणें वीर्या शिवाय मनुष्य जगूं शकत नाहीं आणि वीर्य रक्षणानें मनुष्य जास्त तेजस्वी दिसतो. कामवासनेच्या तृप्तीस्तव वीर्य क्षय केल्यानें मनुष्याच्या बुद्धीवर व शरीर प्रकृतीवर त्याचा परिणाम होतो व असा वीर्यक्षय न केल्यास तेंच वीर्य मनुष्याच्या आकर्षण शक्तीच्या व मानसिक शक्तीच्या वृद्धीला कारणीभूत होतें. वीर्य रक्षणानें मनुष्याच्या मानसिक शक्तीचा विकास होतो व त्याला आनंद होतो इतकेंच नाहीं पण त्याची संतति तेजस्वी व सुदृढ निपजते. कलिकाल सर्वज्ञ श्री हेमचंद्राचार्य हे देखील आपल्या योगशास्त्राच्या दुसऱ्या प्रकाशांत असें सांगतात कीं.—

चिरायुषः सुसंस्थाना दृढसंहनना नराः ।
तेजस्विनो महावीर्या भवेयुर्ब्रह्मचर्यतः ॥ १०५ ॥

अर्थात्—ब्रह्मचर्य पाळल्यानें दीर्घायुषी, सुसंस्थानिक, शरीरानें सुदृढ, तेजस्वी आणि अतिशय बळवान अशीं मनुष्यें होतात.

म्हणून आपल्या शरीराचें रक्षण व्हावें तसेंच आपणाला उत्तम संतति प्राप्त व्हावी अशी इच्छा बाळगणाऱ्या प्रत्येक

गृहस्थानें ब्रह्मचर्याचें पालन केलें पाहिजे. पुरुष जेवढा अशक्त असें पाहण्यांत येतें कीं वृद्धापकाळीं पुष्कळ मनुष्यांची बुद्धि मंद होते. असें का व्हावें ? वास्तविक पाहिलें तर वृद्धपणा हा हा तर बुद्धीचा परमोत्कर्ष होण्याचा काल पाहिजे. वृद्धपणीं मनुष्य अनुभव ज्ञानाची मूर्ति बनला पाहिजे. पण याच्या उलट नेहमीं स्थिति दिसून येते. बहुतांशीं कित्येक वृद्धांचे ठिकाणीं कारभारी देखील अक्कल उरत नाहीं; कित्येकांना आपण काय बोलतों याचें भान देखील राहात नाहीं व कित्येकांच्या अवस्था इतक्या बुद्धिगलित पावतात कीं त्यांच्या काहीं पारावार नसतो; पण इकडे शरीराची स्थिति पाहिली तर अशी विपन्न झालेली असते कीं त्या वृद्धांच्या शरीराचा प्रत्येक भाग ढासळ कमकुवत आणि ढीला तसेंच प्राय निर्जीव झालेला असतो कीं त्याना आपलें शेष आयुष्य अतिशय कष्टमय दुःखांत काढावें लागतें व त्यांचे अखेरीचा काळच भयंकर हाल होत जाऊन शेवटीं ते आपली संसार यात्रा संपवितात. या दुस्तर स्थितीचें काय बरें कारण असावें ? याचें एकच कारण आहे; व तें हें कीं त्या वृद्धांनीं ज्या प्रमाणांत ब्रह्मचर्य पाळावयाला पाहिजे त्या प्रमाणांत मुळींच पाळलेलें नसतें. उलट पक्षीं साठ अगर सत्तर वर्षांचे आपण कित्येक वृद्ध इसम पाहतों, त्यांची अशी स्थिति असते कीं ते एखाद्या धडधाकट पंचवीस तीस वर्षांच्या तरुणाच्या दुप्पट काम करितात. दहा पांच कोस पायीं जाणें म्हणजे त्यांची मजू

...पारशीच, व या दहा पांच कोमांच्या गुणावरून ते तुमचें
घाऊक मानात इतकेंच नाहीं पण त्यांच्या होणाऱ्या अथवा
त्यांच्यावर वीस पंचवीस जेर वसनाचें गायन अपडे तर त्या
करितां त्यांना निराळ्या दवाखान्याची अवश्यकता नसते. हे ते
सहज नेतात. त्यांच्या होड्याला बाटलीशीची गरज नसते. त्यांची
दृष्टि सतेज असते. या सर्वांचें काय बरें कारण असावें ? याचें
एकच कारण आहे व तें हेंच की त्यांनी आपल्या वयांत आपल्या
वीर्याचा दुरुपयोग केलेला नसतो. ब्रह्मचर्याच्या नियमाला अनुस-
रून त्यांनी आपला गृहस्थाश्रम चालविलेला असतो म्हणजे
तारुण्यावस्थेंत त्यांनी नियमितपणें संभोगसेवन केलेलें असतें व
याचाच परिणाम हा होतो की वृद्धावस्थेंत त्यांची अंगकाठी
मजबूत राहते व ते शक्तिहीन असत नाहींत.

एक पत्नीव्रताची अवश्यकता.

विशेषेंकरून गृहस्थांनी ब्रह्मचर्य पाळण्याच्या अंगभूत एक
दुसरी गोष्ट ध्यानांत ठेवण्याची आहे व ती ही की, एक स्त्री
असतांना दुसऱ्या स्त्री बरोबर विवाह करूं नये. एका पेक्षां अधिक
स्त्रिया बरोबर लग्न करणाऱ्या इसमाला ब्रह्मचर्येंतलाच अंश का-
यारा मनुष्य म्हणण्याला मुळींच हरकत नाहीं. या बाबतींत एका
...न्दी कवीनें असें लिहून ठेविलें आहे की— "नारी एक
...री है। पर तरा ब्रह्मचारी है॥" कबीरे म्हणजे सर्वेच

सत्य आहे. एक पत्नीव्रत पाळणारा गृहस्थ खरोखरच ब्रह्मचारी म्हणून मानण्याला योग्य पुरुष होय. खरें पाहूं गेलें असतां दोन स्त्रियांना पति होणाऱ्या पुरुषाला संसारांतील सुख तर मिळतच नाहीं पण उलट त्याचा सर्व जन्म आंतल्या आंत जळफळ करून त्याला काढावा लागतो. दोन स्त्रियांना पति होणाऱ्या इसमाची खरोखर इतकी वाईट स्थिति असते कीं त्याचें वर्णन केल्यास त्या बाबतीत एक स्वतंत्र ग्रंथ लिहितां येईल. शास्त्रकारांनीं या बाबतींत असें वचन आहे कीः—

वरं कारागृहे क्षिप्तो वरं देशान्तरभ्रमी ।
वरं नरकसंचारी न द्वीभार्या पुनः पुमान् ॥ १ ॥
अभोजनो गृहाद् याति नाप्नोत्यम्बुछटामपि ।
अक्षालितपदः शेते भार्याद्वययुतो नरः ॥ २ ॥

अर्थात्: — कारागृहांत वास करणारा बरा; देशान्तरीं भटकणारा चांगला, नरकांत संचार करणारा उत्तम; पण दोन स्त्रियांच्या पतीला घरून जेवल्या शिवाय बाहेर पडावें लागतें, त्याला पाणी देखील मिळत नाहीं आणि पाय धुतल्या शिवायच त्या बिचाऱ्याला निजून राहावें लागतें.

वरील गोष्ट कांहीं खोटी नाहीं. दोघींचें प्रेम संपादन 'करण्यासाठीं अथवा दोघींना राजी 'करण्यासाठीं त्याला ज्या 'अड-

चणी सोसाव्या लागतात त्या एका परमेश्वराला माहीत. वाटेल तेवढा शूरवीर, शहाणा आणि विचक्षण पुरुष असो पण तो दोन स्त्रियांचा पति झाला कीं त्याची शूरवीरता, त्याचें शहाणपण आणि त्याची विचक्षणता हे सर्व स्त्रियांच्या समोर पार कोठें पळून जातात. अमकीला कसें समजाविल्यां येईल व तिला समजाविण्याला आपण गेलों तर दुसरीचा रोष न होतां तिला कसें राजी ठेविल्यां येईल या अथवा अशाच तऱ्हेच्या चिंतेंत बिचाऱ्याचें सर्व आयुष्य जातें व या चिंताग्नीनें त्याच्या अंगीं घड अन्न देखील लागत नाहीं. शिवाय दोन स्त्रियांचे आपसांत जे तंटे बखेडे होतात ते मिटविण्या बाबतींत होणारी त्याची त्रेधा आणि या स्त्री कलहाच्या भवाड्यानें जगांत त्याची फजीती होते ती निराळीच. अशा दोन स्त्रियांच्या पतीची कींव आ-ल्यामुळें एका कवीनें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं —

बहुत बणिज बहुत बेटियाँ दो नारी भरतार ।
उसको क्या है मारना, मार रहा किरतार ॥

कवीचें वरील कथन अगदीं सत्य आहे. दोन स्त्रियांचा पति स्वतःच मेल्याहून मेलेला असतो. मेलेल्याला मारण्यांत काय पुरुषार्थ आहे. त्याला बिचाऱ्याला घड खाण्याला किंवा पीण्याला देखील मिळत नाहीं तेव्हां एखाद्या कार्यांत आनंद घेणें तरी त्याच्या कटलें नशीबीं असणार ! दोन स्त्रियांच्या पतीची त्रिशंकु सारखी

कशी स्थिति होते या बाबतींत एक लहानसा दृष्टान्त आहे तो असा कीं:—

" ज्या पुरुषानें दोन स्त्रिया केल्या होत्या—दोन स्त्रियांचा पति—अशा एका पुरुषाच्या घरांत एक दिवस एक चोर चोरी करावयाला गेला. एक स्त्री माडीवर निजली होती व दुसरी खालीं—खालच्या मजल्यावर—खोलींत निजली होती. तळमजल्याच्या खोलींतील एका बाजूस चोर गुपचिप येऊन आपला लाग साधण्याच्या विचारांत होता. इतक्यांत खोलींत आपल्या पत्नी बरोबर गप्पागोष्टी करण्याऱ्या शेटजीची माडीवरील राणीकडे जाण्याची इच्छा झाली. पण खालील पत्नी निद्राधीन होण्याची तो वाट पाहूं लागला. पत्नी निद्रिस्थ झाली असें समजून मोठ्या सावधपणानें त्या शेटजीनें दादर चढण्याची सुरुवात केली. पतीचा डाव त्या धूर्त स्त्रीनें तावडतोब ओळखला व लागलींच तिनें दादर चढतांना आपल्या पतिराजाचा पाय ओढला. माडीवरील राणी देखील पतिराजाच्याच आगमनाची मार्ग प्रतिक्षा करीत होती. दादरा वर पाऊलाची चाहूल ऐकतांच ती उठली व पाहते तों आपली सवत आपल्या पतिराजाला आपणाकडेस येण्याला प्रतिबंध करीत आहे. सवती मत्सराची तेथें मूर्तिमंत लढाई सुरू झाली. माडीवरील राणीनें पतिराज पाताळांत राहूं नयेत म्हणून पतिराजाची शेंडी धरून ओढण्याला सुरवात केली; व तळमजल्या-

वरील पट्टराणीनें आपल्या प्रिय पतिरामांनीं स्वर्गांत जाऊं नये म्हणून त्यांच्या तंगड्या ओढण्याची सुरुवात केली. पतिरामांना ही स्थिति सुखद तर वाटलीच नाहीं व त्यांनीं मनांत आणलें असतें तर एका राणीचा नकशा उतरून पाताळांत अगर स्वर्गांत सुखानें शयन केलें असतें. पण सुखद स्थिति पेक्षां त्रिशंकु सारख्या स्थितींत राहण्यांतच त्यांना विशेष आनंद वाटत होता असें दिसतें व त्या आनंदाचें एकच कारण होतें कीं त्रिशंकूच्या स्थितींत स्त्री जनांचा आप आपसांत कलह होईल पण दोघींचेंही आपणावर प्रेम राहील; नाहींतर एकीच्या प्रेमाला आपणाला खास अंतरावें लागेल व स्त्रीजनाचा राग अथवा रुसवा काढण्याला आपण दांतीं तृण धरून गेलों तरी त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. अशा तऱ्हेचा पोक्त विचार करून त्या दोन राण्यांच्या कलहा मध्यें आपल्या शरीराला मोठ्या हिमतीनें सुखांत त्रिशंकु समान त्यानें दादरावरच उभें केलें होतें. दोन्ही स्त्रिया आपआपल्या परी पतिरामाला आपआपल्या कडे ओढीतच होत्या. वरील तमाशा, धागडधिंगा अथवा फार्स पाहण्यात कोपऱ्यांत लपून राहिलेल्या चोराला इतकी मजा वाटली व या गमतीनें तो इतका रंगला कीं त्या घरांत आपण चोरी करण्याला आलों आहों याचें देखील त्याला भान राहिलें नाहीं व तो आपला हा फार्सच पाहात राहिला. सवती सवतीच्या भांडणांत आणि पतिराजाच्या ओढाताणींत सर्व रात्र निघून गेली

हें देखील त्या चोराच्या लक्षांत आलें नाहीं. सकाळ झाल्यामुळें तो चोर पकडला गेला. सदर चोराला मॉजिस्ट्रेट समोर उभें करण्यांत आलें तेव्हां तो चोर म्हणाला—मी चोरी करण्याला गेलों होतों ही गोष्ट खरी आहे व मी गुन्हा कबूल करितों. माझ्या गुन्ह्या बद्दल आपण मला वाटेल ती शिक्षा करावी ती मी सोसण्याला तयार आहें. आपण वाटल्यास दंड करावा, मला कैदेंत टाकावें, सक्त मजुरी अथवा अंधार कोठडीची शिक्षा द्यावी. माझ्या गुन्ह्या बद्दल आपल्याला योग्य वाटल्यास आपण मला फांशीची शिक्षा दिलीत तरी ती मी मोठ्या आनंदानें स्वीकारीन कारण मी गुन्हा करण्याला गेलों होतों; पण माझी एकच विनंति मान्य करण्या विषयीं मी आपणाला प्रार्थना करीत आहें तिचा मात्र आपण अनादर करूं नये. माझी एवढीच प्रार्थना आहे कीं वरील शिक्षा अपूऱ्या आहेत असें आपणाला वाटल्यास व याहून एखादी भयंकर शिक्षा देण्याचें आपल्या मनांत आल्यास आपण तशी शिक्षा शोधून काढावी पण कृपा करून दोन स्त्रियांचा पति होण्याची शिक्षा मात्र मला फरमावुं नये; त्या शिवाय आपणाला योग्य वाटेल ती सजा करावी. चोराचें वरील भाषण ऐकून कोर्टांत बराच हशा उडाला व मंडळींना थोडें आश्चर्यही वाटलें. मॉजिस्ट्रेट साहेबांनीं ही शिक्षा तुला कां नको याचें कारण विचारतांच चोर म्हणालाः—साहेब दोन स्त्रिया पासून शेजारीने काल रात्रीं जें दुःख भोगिलें त्या पुढें फांशीची शिक्षा भोगणें

वाहींच नाहीं अशी माझी समजूत आहे असें सांगून त्यानें पाहिलेली इत्थंभूत हकीकत कोर्टास सांगितली.

वरील दृष्टान्ता वरून आपल्या हें लक्षांत ध्यानांत येईल कीं दोन स्त्रियांचा पति होणाऱ्या पुरुषाचे भयंकर हाल होतात व त्याला सर्व आयुष्य कष्टांत, दुःखांत आणि मनोव्याधींत वाहावें लागत असून शेवटीं तो झिजून झिजून मरतो. एवढा धडधडीत मूर्खपणाचा इतका भयाण अनुभव समोर असून देखील पुष्कळ मनुष्यें एकामागून एक, दोन, तीन स्त्रिया बरोबर करितात याचें काय बरें कारण असावें ! आमच्या मतें याचें विषय लालसा हें एक कारण असून त्या शिवाय दुसरेंही एक कारण आहे व तें पुत्र प्राप्तीची इच्छा हें होय. एका स्त्री पासून पुत्रप्राप्ति न झाली तर दुसरी स्त्री करण्यांत येते; तिच्या पासून पुत्रप्राप्तीचा संभव नसला तर मनुष्य तिसरी स्त्री करितो शिवाय एका स्त्रीहून जास्त स्त्रिया करण्यांतच आपल्या श्रीमंतीचें खरें भूषण आहे असेंही कित्येक मग समजतात; पण अंत पाहूं गेलें तर त्याच्या या श्रीमंतीनें त्यांना कसें उत्तम फळ चाखावयाला मिळतें—दोन स्त्रियांच्या कचाट्यांत सांपडल्यामुळें कसा उत्तम तऱ्हेच्या मउ मउ ××× खावयाला मिळतात—हें एक फक्त त्यांच्या स्वतःच्या मनालाच ठाऊक असतें. ज्यांना सर्व लोक शहाणे समजतात, जे स्वतःला ज्ञानी म्हणवितात व दुसऱ्याला चार शहाण-

पणाच्या गोष्टी सांगतात असें सूत्र स्त्रियांच्या समोर कमें बाहरी सारखे नमून उभे राहतात तसेंच स्त्रियांच्या शिव्या जणूं गोड बासुंदीन पीत आहों त्या प्रमाणें कशा घट घट आपल्या घशा खालीं उतरवितात, तसेंच त्यांना राग येऊं नये म्हणून त्यांना आपल्या डोक्यावर बसवून घेऊन ते कसें नाचतात, याचा अनुभव संसारिजनांना सांगण्याचें प्रयोजन नाहीं. ती रोमच्या व्यवहारांतील त्यांच्या माहितीची गोष्ट आहे. हें सर्व कशासाठीं सहन करावें लागतें ? एकाच गोष्टी मुळें आणि ती ही कीं मनुष्य विषयाधीन झालेला असतो. खरें पाहूं गेलें तर पुरुषांचा प्रभाव स्त्रीवर पडाव-याला पाहिजे. परंतु आजकाल जें पाहण्यांत येतें तें सर्व याच्या उलट; म्हणजे स्त्रीचा प्रभाव पुरुषावर पडतो. याचें कारण पुरुष सत्वहीन बनले आहेत या परतें दुसरें कांहीं देखील नाहीं.

वरील विधान एकाचवेळीं एकापेक्षां जास्त स्त्रिया करण्या बाबतींतील आहे म्हणजे बहु पत्नीत्वा विषयीचें आहे. प्रथम पत्नीच्या निधना नंतर दुसरी पत्नी करण्याला रूढीचा व शास्त्राचा आधार आहे व त्यामुळें एकपत्नीव्रताचा भंग होत नाहीं असें शास्त्रकार सांगतात; पण ज्या शास्त्रांतील आज्ञे मुळें १२ वर्षांच्या गतभर्तृकेला आपलें सर्व आयुष्य दु:खांत काढावें लागतें त्या शास्त्रांत पुत्र प्राप्ती साठीं पुरुषानें वाटेल तेव्हां वाटेल तितके वेळ लग्न करावें व तें शास्त्रसंमत असून त्या लग्नानें एकपत्नीव्रताचा भंग होत

नाहीं असा आधार असल्यास तो नीतीला, न्यायाला आणि व्यवहाराला धरून नाहीं म्हणून ग्राह्यही नाहीं.

आम्हाला माहीत आहे कीं हें विधान पुष्कळांना रुचणें शक्य नाहीं. पण रोग्याला ताप आला म्हणजे जसा क्विनाइनचा कडु डोस देणें जरूरीचें आहे त्याप्रमाणें आम्हाला एक पत्नी-मनाची खरी व्याख्या देणें भाग आहे. ज्याप्रमाणें स्त्रियांनीं एकाच पतीच्या समागमांत आपला जीवनकाळ घातल्यानें त्या एक पति-व्रताचें योग्य तऱ्हेनें पालन करूं शकतात तद्वतच मनुष्यानें ही आजन्म एकपत्नीव्रत पाळण्याचें आहे. व ब्रह्मचर्याचें पालन करण्याऱ्यानें खरोखर याच प्रकारच्या एकपत्नीव्रताचें पालन केलें पाहिजे.

एक पत्नी मृत झाल्यानंतर पुत्र प्राप्तीच्या नावा खालीं दुसरी पत्नी करणें म्हणजे एक पत्नीव्रताचा भंग आहे.

मनुष्यांनीं स्वैर वर्तन करूं नये म्हणून दगडापेक्षां धीट मऊ या न्यायानें जगांत अनीतीचा प्रचार होऊं नये म्हणून दुसऱ्या लग्नाची रूढी पडली.

ध्येय उत्तम असावें लागतें व तें १०० पायऱ्या चढून गेल्यावर मिळेल अशा ठिकाणीं ठेवलेलें असतें. जो तितकी मजल मारूं शकत नाहीं तो पडूं नये म्हणून मध्यें विसावे असतात; ही दुसऱ्या लग्नाची गोष्ट आहे.

म्हणून प्रत्येकानें एकपत्नीव्रताचें खरें व उच्च ध्येय आपल्यें पुढें ठेवावें.

जास्त पुत्रप्राप्ति मुळें आर्थिक दृष्टीनें होणारें नुकसान.

आम्ही येथें आतां जें कांहीं सांगणार आहोंत तें जास्त पुत्रप्राप्ति संबंधानें आहे. असे पुष्कळ पुरुष पाहण्यांत येतात कीं, ज्यांच्या घरांत डझन सवा डझन मुलें खेळतांना दृष्टीस पडतात, ज्यांचें वय सत्तर वर्षाचें झालेलें असतें व अशी स्थिति असून देखील ते विषया पासून निवृत्त होत नाहींत व त्यांच्या ठीकाणीं संतोष वृत्तीचा वास असत नाहीं; त्यांची इच्छा अशी असते कीं दोन चार वर्षें आपण जास्त जगल्यास त्या अवधींत आपणाला चार पांच जास्त मुलें झालीं तर उत्तम; पण असे पुरुष आर्थिक दृष्टीनें भारतवर्षाची किती दुर्दशा करीत आहेत याचा ते अथवा त्यांच्या सारखेच दुसरे थोडा देखील कधीं विचार करीतात काय? कोणत्याही देशाचा प्राचीन इतिहास आपण तपासून पाहिल्यास आपणाला असें आढळून येईल कीं जेव्हां जेव्हां त्या देशांत मर्यादे बाहेर लोकसंख्येचें प्रमाण वाढते त्या त्या वेळीं त्या देशावर निसर्गाचा जंगली-क्रूर-कार्यक्रम सुरु झालेला असतो. महामारी (प्लेग, कालेरा, देवी, ईनफ्लुएन्झा-वगैरे) दुष्काळ, धरणीकंप, आणि लढाई हीं निसर्गाच्या क्रूर कार्यक्रमांतील जंगली

हत्यारे आहेत. जेव्हां जेव्हां सृष्टि—नियमाच्या मर्यादेचें उल्लंघन होत तेव्हां तेव्हां दुनियेचें पारडें समतोल—सारखें—रहावें म्हणून निसर्गाकडून आपल्या या क्रूर आणि जंगली हत्यारांचा उपयोग करण्यांत येतो अथवा निसर्ग आपल्या हत्याराचा उपयोग केल्या शिवाय रहात नाहीं. शिवाय ही देखील एक गोष्ट विचारण्या लायक आहे कीं—भारतवर्षांत वैरभाव आणि स्वार्थ परायणता यांचा नाश होत नाहीं याचें काय बरें कारण असावें ? यांचें कारण देखील वस्तीच्या प्रमाणाचें बाहुल्यच आहे. वरील गोष्ट वरवर विचार करणाऱ्या माणसांना समजणें शक्य नाहीं. या बाबतींत फार खोल आणि दूरवर विचार करण्याची अवश्यकता आहे. ज्या देशाची प्रजोत्पत्ति जमीनीच्या पैदाशीच्या-उत्पन्नाच्या-प्रमाणांत आहे, त्याच देशांतील मनुष्यें वैरभाव रहित म्हणजे एकमेकांशीं शत्रुत्व न ठेवितां आपलें जीवन गुजारूं शकतात. भरत भूमीची आजची स्थिति याच्या अगदीं उलट आहे. हिंदुस्थान देशानें कोबडीं आणि कुत्रीं यांच्या प्रमाणें प्रजोत्पादन करण्यांत दुसऱ्या देशावर ताण केली आहे. निदान प्रजोत्पादनाच्या बाबतींत तरी हिंदुस्थान देश दुसऱ्या देशाच्या पुढें आहे; पण याच्या उलट द्रव्योत्पत्तींत दुसऱ्या सर्व देशांच्या मागें आहे. या बाबतींत एका इसमानें असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं हिंदुस्थानांत एका इसमाला सोळा मनुष्यांच्या पोटा साठीं खुराक पुरा करावयाचा असतो म्हणजे

एका इसमाचा मोठा भागनें आरंभून अगदीं व त्या भाग-भागी मालिक आपण अडीच लाखे असो. अर्थात् एका भाग-साठा अडीच लाखांचा आपले मीठव गुलामाचें भागी. असा स्थितींत आपआपसांतील मनुष्यांनीं नीतीनें वागणें, वैरभावाचा त्याग करणें आणि प्रत्येक जातीच्या मनुष्या बरोबर एकीनें व प्रेमानें राहणें हें कोणत्याही काळीं बनणें शक्य आहे काय! पंधरा गायी असलेल्या एका आवारांत एकाच गायी पुढें गवत अथवा कडबा टाकण्यांत आला तर त्या गरीब गायी देखील खाण्या करितां आपआपसांत मारामारी केल्या शिवाय राहतील काय! पंचविस कुत्र्यांना एकत्र करून त्यांचा पुढें एक दोन भाकरी टाकण्यांत आल्या तर कुत्रे देखील एकमेकांची फाड-तोड केल्या शिवाय राहतील काय? केव्हांही नाहीं. ही सृष्टि क्रमा विरुद्ध गोष्ट आहे. निसर्गाला हें पसंतच नाहीं. खरोखर या दुनियेंत मर्यादेचा भंग होत आहे!

खरोखर ही एक मोठीच आश्चर्यकारक गोष्ट म्हटली पाहिजे कीं ज्या मनुष्याचा घरांत स्वतःच्या कुटुंबाचें पोषण होईल इतकी देखील आवक नाहीं, व कुटुंबाच्या पोषणा साठीं त्याला रात्रदिवस चिंता करावी लागत असून निरंतर परिश्रम करावे लागतात असें असून देखील तो मनुष्य एक सारखें प्रजोत्पादन करण्याचे बाबतींत थोडा देखील मागें राहत नाहीं किंवा या बाबतींत तो आपल्या मनांत मागचा पुढचा थोडा देखील

विचार न करितां धडाक्याने पुत्रोत्पादन करीत असतो. अ
त्या मनुष्याचा अविचाराचा परिणाम तरी काय येणार
' सर्वांनीं असा वाचून मरण्याचा ', या शिवाय दुसरा कोणता
पांच किंवा सात रुपये मिळविणारा एक मनुष्य, स्वतःचें, आप
त्या स्त्रीचें आणि त्या शिवाय असल्यास आपल्या एक किंवा
दोन मुलांचें रक्षण करण्याला–त्यांचा पोटाला पुरेसें अन्न
देण्याला–देखील समर्थ नसतो, पण तोच मनुष्य दर वर्षी अथवा
दर दुसऱ्या वर्षी असलेल्या संतानांत आणखी भरती करितो–
नास्न मुलांचा बाप होतो–तेव्हां भविष्य काळीं त्या मनुष्याचा
कृतीचा काय परिणाम होणार याचा वाचक स्वतःच निर्णय करूं
शकतील. म्हणून जर आपल्या देशाला–भारत मातेला–दारिद्र्यां-
तून वाचवावयाचें असेल, महामारी, दुष्काळ, धरणीकंप आणि
लढाई या निसर्गाच्या चार जंगली हत्याराचा भक्षस्थानीं पडूं
द्यावयाचें नसेल, व भारतवर्षांत ऐक्यतेचें साम्राज्य स्थापावयाचें
असेल, तर मनुष्यानें निदान आर्थिक दृष्टीनें तरी विषय वासनेला
कमी करून पुत्रोत्पत्तीच्या प्रवाहाला थांबविलें पाहिजे.

त्याचप्रमाणे जर मनुष्यांनीं विचार केला तर त्यांना तेव्हांच
कळून येईल कीं उंदरा प्रमाणें पुष्कळ संतति उत्पन्न केल्यानें
काहीं लाभ नाहीं व त्यांत कांहीं पुरुषार्थही नाहीं. परिपक्व वीर्या
पासून, तेजस्वी, मजबूत अंगकाठीचा आणि सुदृढ असा एकच
मुलगा झाला तर तो गृहस्थांना मोठाच आधारभूत होऊन त्या

[illegible]

[illegible] ।
[illegible] ॥

अर्थात् [illegible]

मराठीत आजवर [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] अन्य [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible], [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible], [illegible] [illegible] अथवा [illegible] [illegible], [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible],–[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible], काय बी कारण असावें ? [illegible] [illegible]. [illegible] [illegible] साहित्ये नाहीं, मात्र बहुत गेले आहेत, [illegible] [illegible] आपले दोन्ही [illegible] आणि केवळ [illegible] [illegible] [illegible]

देखील श्रम करण्याची इच्छा करावी–नव्हे-श्रम करावे–ही किती निंद्य गोष्ट आहे खरें ! या गोष्टी बद्दल केवढी खरें तुच्छता प्रदर्शित करणें जरूरीचें आहे ! पण एवढी निंद्य आणि तुच्छ गोष्ट असुन देखील दररोज असें वृद्ध विवाह असून बालंब आहेत हें आपण पाहतों. याच प्रमाणें वेश्या गमन, परस्त्री गमन वगैरे सारख्या निंद्य कार्यांत मनुष्य लुब्ध झालेला आढळतो याचें दुसरें तिसरें कोणतेंही कारण नसून त्यांची प्रबळ विषय वासनाच होय. हीं मनुष्यें पूर्णपणें विषयांधच झालीं आहेत असें म्हणण्यांत थोडी देखील चूक नाहीं. अशा विषयांधतेच्या योगानें त्यांना जडलेल्या वाईट सवयीपासून त्यांचें स्वतःचें तसेंच त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या माणसांचे किती हाल होतात, त्यांना कसलीं कसलीं संकटें सोसावीं लागतात हें नव्यानें सांगण्याची अवश्यकता नाहीं. कारण विषयांधतेचे अनिष्ट परिणाम काय होतात हें सर्वांना ठाऊकच आहे. म्हणून त्या विषयीं विशेष कांहीं न सांगतां प्रस्तुत एका विशिष्ट गोष्टीकडे वाचकांचें लक्ष ओढणें जरूरीचें आहे; व ती गोष्ट अथवा बाबत म्हणजे ही आहे कीं–या विषयांधतेच्या व पुत्र प्राप्तीच्या इच्छेनेंच कित्येक जण अशा विवाहाचा प्रचार करण्याला पुढें आले आहेत. परंतु विवाहा पासुन वस्तुतः किती नुकसान होतें या गोष्टी त्यांना नर समजल्याच नाहींत.

विधवा विवाह पासून होणारें नुकसान.

सर्वांत पहिलें नुकसान म्हणजे विधवा विवाहाच्या प्रचारानें संसारांत व्यभिचार—व्यभिचारच नाहीं, पण दुराचार देखील वाढतो. पतीच्या मरणानंतर आपल्या लहान मुला बाळांचा स्त्री त्याग करून देखील निघून जातें, कदाचित पति मेला नसून जिवंत असला व त्याच्या अंगीं एकादी कोणती खोड असली अथवा कमतरता असली तर त्याला हर प्रयत्नांनीं मारून टाकून अथवा त्याचा त्याग करून स्त्री दुसरा पति करण्याला मागें पुढें पहात नाहीं. तसें करण्याला तिला यत्किंचितही भीति वाटत नाहीं; दुसऱ्या पती बरोबर न बनलें तर त्याला मारून तिसरा पति करते; कारण पतीच्या ठिकाणीं वसणाऱ्या प्रेमाचा अथवा पतीच्या ठिकाणीं वसणाऱ्या पतिभक्ति विषयींचा तिच्या मनांत अंकुर सुद्धां नसतो; याचा परिणाम असा होतो कीं ती आपल्या मनाप्रमाणें वर्तन करूं लागतें. वरील अनर्थ कशानें झाले ? तर विधवा विवाहाची परवानगी मिळाल्यानें आणि विषयाच्या लोलुपतेनें. कित्येक निर्लज्ज आणि हीन कुलांतील विधवा यांना आपली मर्यादा बरोबर राखता न आल्यामुळें त्यांच्या हातून बालहत्यें सारखें अत्यंत नीच काम घडून येते ही गोष्ट खरी खरी आहे तरी विधवा विवाहाच्या प्रचारानें बालहत्या बंद होणारी नाहीं. विधवा विवाहानें उलट कैक अनर्थ होणारे आहेत. म्हणून

प्रकार अशा शास्त्रकारांचे पुष्कळ कारण काय काय होते हेच पाहिजे व त्याचा कारण निरर्थक केला पाहिजे, त्याचप्रमाणे विवाहाच्या कडीचे पुष्कळ कारण नाहीं लिखाण मी शास्त्रविचार करून इद्-विचार हे होय, म्हणून विधवा विवाहाचा प्रचार करण्याऐवजी अधिक होय हुए शास्त्रीय पद्धतीने अथवा आता उपयोगी पाहिजे व त्या कारणास्तव बंद केला पाहिजेत, अधिक दोन्ही हुए स्त्रीचा एक प्रकार—त्या व्यवहारामुळे नाहींसा व्हावा—मग विवाहाच्या अंतर्गत वृद्धि होण्याचे बंद होईल. बाल विवाह व वृद्ध विवाह बंद केल्याने या पुढे दोन्ही देशीय विधवा होणार नाहीं हे आम्ही मुद्दाम आहे नवी विशेषी केल्या कारण कमी होऊन, व त्या विधवांना आपल्या पूर्व कर्माचे फळ म्हणून केवळ दुःख प्राप्त होईल त्यांच्या सर्वांगीण प्रकाराने विवाहाचा कायदा त्यांना मिळत नाहीं. आहे तर त्या विधवांचे वाईट वर्तन करण्याची भीति राहणार नाहीं व त्या समाजाच्या हिताने आपले आयुष्य धार्मिकरीतीने व भले आपण बनवेल्या कारण उपयोगी पडून अथवा मोठ्या आवडीने त्यांना सहाय करील. म्हणून हे शास्त्रांचे कारण पुढे करून विधवा विवाहाचा प्रचार करण्याची इच्छा करितात, त्यांनी या बाबतीत त्यांच्या दूसरा विचार केला पाहिजे. विवेक केला नसता पुरता विचार न केल्या मुळे अथवा दुराग्रहाने व्हा आल्या मुळे सारासार विचार न करता अथवा बुद्धीच्या मार्गाने अवलंबन करितात, भारत वर्षांत

काका आपल्या येथें रोज येतात काय? आई म्हणाली:—'मुळीच नाहीं. कधीं कधीं क्वचित् येतो.' मुलानें सर्व हकीकत ऐकून घेतल्या प्रेमानें व अधिकारानें आईला सांगितलें:—' आई ! आजोबा वारल्याला [illegible] आहेत ते घरत आहे म्हणजे मी त्यांना सांगेन की मी शाळेत जात होतों आणि आई घरीं एकटी राहात होती. [illegible] काका आपल्या घरीं येत होते. आई उपाशी व काकांशी भांडण करत होतीस. '

मुलाचें भाषण ऐकून आईच्या मनांत भीति उत्पन्न झाली; [illegible] कदाचित् मुलानें आपल्या [illegible]

[illegible]

मुलगा निद्राधीन झाल्यावर त्या मारिणीनें आपल्या माराला बोलाविलें, जार व मारिणी यांनीं त्या गृहांत प्रवेश केला. या वेळीं त्या घरांत पूर्ण शांतता होती. ते निरपराधी बालक निद्रादेवीच्या पर्यंकीं सुखानें शयन करीत होतें, त्या बिचाऱ्याला कुठली कल्पना येणार कीं आपलीच आई आपल्या जिवावर उठेल! सख्या आईचें कधीं तरी कोण्या मुलाला भय असणें शक्य आहे काय! अशी कोणती निष्ठुर आई आहे कीं मी आपल्या पोटच्या गोळ्याच्या जिवावर गदा आणीन! पण या सर्व साधारण सच्या कल्पना असल्या तरी सात्विक माता आणि मारिणी माता यांच्या ठिकाणीं वात्सल्य प्रेमाच्या कल्पना निराळ्या असतात असें म्हणणें भाग पडतें. विषय-वासनें! धन्य आहे तुम्या मायावी पाशाची, कीं तुम्या परिचयानें माता देखील आपल्या बालकाचा खून करण्याला प्रवृत्त होतात. ' आम मुद्दाम बोलावण्याची आपणाला लहर आली ' अशा प्रश्न मारानें विचारतांच ' तसेंच कांहीं काम आहे ' असें उत्तर देऊन ती मारिणी आपल्या माराला म्हणाली हैं पहा या निजलेल्या बालकाचा खून करण्या साठीं तुम्हाला बोलाविलें आहे. हं! चला आटपा ' मारिणीचे शब्द ऐकतांच त्या मनुष्याचे हातपाय लटलट कांपावयाला लागले व तो आर्ततानें म्हणाला:—बाई! तुम्या एकुलत्याएक मुलाला तूं मारावयाला सांगतेस याचा अर्थ तरी काय! आई मुलाचा केर-

ढाही भयंकर अपराध असला तरी पोटांत घालतें, मग तूं हें काय करितेस ! अशा निर्दोष बालकाला मारणें भयंकर पाप आहे. हें काम आपल्या हातून होणार नाहीं.' आपल्या जाराचें भाषण ऐकून त्या स्त्रीचा क्रोध अनावर झाला व ती क्रोधा वेशांत म्हणाली:—' परस्त्रीगमन करणें पुण्य आहे वाटतें ! म्हणून तुम्ही तें करीत आहांत. तुमच्या नादीं लागल्या मुळें माझ्या अब्रूच्या ठिकऱ्या झाल्यात. समजलांत? मला नव्हतें माहीत कीं पुरुषा सारखे पुरुष असून तुम्ही इतके बायका सारखे भित्रे असाल. माझ्या मुलाचा खून करण्याला मी तुम्हाला सांगतें त्यांतलें इंगित तसेंच आहे. मुलगा जिवंत राहिला कीं तुमच्या व माझ्या संबंधाचा माझ्या गावभर डंका वाजेल. माझे सासरे आले कीं मुलगा सर्व हकीकत त्यांच्या कानावर घालील. कारण आपली गोष्ट त्याच्या लक्षांत आली आहे. म्हणून मी म्हणतें तुम्ही हें काम लौकर उरकून घ्या.' स्त्रीचें क्रोधानें भाषण ऐकून त्या जाराच्या मनावर थोडा परिणाम झाला; तरीपण त्याची तें नीच काम करण्याला हिंमत होईना. जाराची गर्भगळीत स्थिति त्या स्त्रीच्या लक्षांत आली, तेव्हां मोठ्या दिमाख्यानें ती म्हणाली ' या इकडे या, माझ्या हातांतल्या बांगड्या तुमच्या हातांत घाला म्हणजे मला तरी पुरुषासारखें काम करतां येईल. तुमच्यानें काम होत नाहीं तर मला नुसती मदत तरी करा. या चाकूच्या पातीनें मी माझ्या मुलाचा खून करतें. त्यानें आरडओरड फर्ू

नये म्हणून तुम्ही त्याच्या तोंडांत बोळा घाला,' आपल्या जारिणीचा हुकूम अमान्य करणें शक्य नव्हतें. एखाद्या कळसूत्री बाहुल्या प्रमाणें तो तिच्या मागें गेला. मुलाच्या तोंडावर त्यानें बोळा ठेऊन तो घट्ट धरतांच त्या जारिणी मातेनें आपले पाय झाडले आणि या ममघ्नीनें आपल्या मुलाच्या गळ्यावर पाऊलें पाय फिरविलें. रक्ताच्या थोडक्या पिचकाऱ्या उडाल्या व त्या निर्दोष बालकाचा प्राण त्या अर्धकुडींतून निघून गेला. त्या पापी जोडप्यानें घराच्या मागच्या बाजूला असलेल्या आंगणांत खड्डा केला व त्यांत त्या निर्दोष बालकाचें प्रेत पुरून टाकिलें. रक्ताचे डाग जमीनीवर पडले होते ते शेणानें सारवून घेतले. त्यांच्यानें शक्य तितकें हे काम त्यांनीं गुप्तपणें केलें, पण त्या पाप्यांना ही कल्पना देखील शिवली नाहीं कीं मानवांतील बऱ्या वाईट गोष्टींचें अवलोकन करण्यासाठीं सर्वांचा " बाबा " गुप्तपणें संचार करीत आहे. त्या काळाला निरनिराळे दर्शनकार निरनिराळ्या नांवांनें संबोधतात. कोणी त्याला भवितव्यता म्हणतात, कोणी त्याला देव म्हणतात, कोणी ती एक अद्भुत शक्ति आहे असें मानतात. त्या जोडप्यानें राहिलेली रात्र आनंदांत घालविली. पुष्कळशा त्यांची ही नवीनच आग भूमीवर अवतरली असें म्हणावें लागेल. हा विषयवासने ! तुझ्या पंजांत पडलेले अत्यंत नीच काय देखील करण्यास मागें पुढें पाहत नाहींत तेव्हां तुझ्या प्रभावाला काय म्हणावें ! तुझ्या विषय विचार करणें उचित!!!

तिसऱ्या दिवशीं मुलाचा आजा गांवाहून परत आला. त्या आजोबाचें आपल्या नातवावर फारच प्रेम होतें. येतांच अमृतलाल -कोठें आहे ! ' असा त्यानें आपल्या सुनेला प्रश्न केला. ' अमृतलाल शाळेंत गेला ' असें सुननें उत्तर दिलें. अमृतलाल बारा वाजून गेले तरी घरीं आला नसल्या मुळें म्हातारा तेवढ्या उन्हांत आपल्या नातवाचा तपास करण्या साठीं शाळेंत गेला. तेथें चौकशी करतां त्याला असें कळलें कीं अमृतलाल आज दोन दिवस शाळेंतच आला नाहीं. म्हाताऱ्याच्या मनांत एकदम कसेंसेंच झालें. घरीं येऊन म्हाताऱ्यानें आपल्या सुनेला पुनः विचारलें तेव्हां ती म्हणालीः–' मुलगा उनाड आहे कोठें तरी उनाडावयाला गेला असेल. ' म्हातारा चुकून मुलाच्या खोलींत गेला; पण तेथें जातांच त्याच्या दृष्टीला एक निराळेंच दृश्य दिसलें. मुलाची निजण्याची जागा सारविलेली व कांहीं ठिकाणीं रक्ताचे डाग पडलेले. ' हाय ! हाय ! एथें रक्ताचे डाग काय म्हणून व ही जागा सारविली काय म्हणून ? ' इत्यादि अनेक कल्पना त्याच्या मनांत घोळावयाला लागल्या. आपल्या सुनेला त्यानें या विषयीं विचारलें तेव्हां सुनेनें उत्तर दिलें:–' मांजरीनें एक उंदीर मारला होता. त्याचें रक्त पडलें होतें म्हणून जागा सारविली. चुकून कोठें रक्त तसेंच राहिलें असेल.

नातवाच्या चिंतेनें म्हाताऱ्याचें मन उद्विग्न झालें. तो

वेडा झाला. शेजाऱ्या पाजाऱ्याला विचारतां त्या बाबतींत कोणाला आधारभूत अशी कोहींच माहिती नव्हती असें दिसलें. परवां शाळेंतून घरीं येतांना आम्हीं त्याला पाहिलें असें एकजण म्हणाला. एका इसमानें अमृतलाल परवा रात्रीं दहाचे सुमारास ओरडल्याचें स्मरतें असें सांगितलें. या इतक्या तुटक माहिती वरून म्हाताऱ्याचें कांहींच समाधान होईना. त्याला निरनिराळ्या शंका येऊ लागल्या.

शेवटीं त्याला आपल्या सुने विषयीं शंका येऊं लागली. प्रत्यक्ष पोटचा मुलगा घरीं आला नाहीं तेव्हां त्याचा आईला राहवतें तरी कसें याचें त्याला आश्चर्य वाटलें. मुलगा घरीं आला नाहीं तर त्या बद्दल जेव्हां आईच्या तोंडावर थोडी देखील उदासीनता दीसली नाहीं, शिवाय मुलाच्या तपासा विषयीं ती थोडीशी देखील चौकशी करीत नाहीं तेव्हां त्याच्या मनानें पक्कें घेतलें कीं मुलाचें कांहीं तरी बरें वाईट झालें हें खचित. त्यानें या बाबतींत पोलिसाला वर्दी दिली. पोलिसांनीं म्हाताऱ्याला सर्व हकीकत विचारली तेव्हां म्हाताऱ्यानें आपल्या सुनेचें मुलाविषयींचें उदासीन वर्तन पाहून तिच्या विषयीं आपली शंका प्रदर्शित केली. पोलीसांनीं तपास सुरुं केला. सुनेच्या कपड्याची तपासणी करतां लुगड्याला रक्ताचे डाग पडलेले होते ते दिसले. पोलिसांनीं पुष्कळ विचारपूस केली तरी त्या स्त्रीनें गुन्हा कबुल केला नाहीं.

शेवटीं पोलिसांनीं आपली समजूत देण्याला सुरवात करतांच ती जारिणी धाय धाय रडूं लागली व आपल्या मुलाचे गुण आठवूं लागली. साधारण माणसाला त्या अबलेची दयाच आली असती; पण पोलीसांना गुन्हेगारांचा नेहमींच संबंध पडत असल्या मुळें तिच्या कांगावखोरपणानें ते न फसतां त्यांनीं आपल्या समजुतीचें कार्य नेटानें चालू ठेविलें. थोड्याच वेळांत ती जारिणी पूर्ण शुद्धीवर आली व तिनें आपल्या पापाचा घडा वाचला. लागलीच पंचा समक्ष तिनें सांगितलेल्या व दाखविलेल्या ठिकाणीं खोदण्यांत आलें. तेथें मुलाचें प्रेत मिळालें. जास्त विचारपूस करतां तिनें आपल्या साथीदाराचेंही नांव सांगितलें. त्यालाही चतुर्भुज करून धरून आणण्यांत आलें. योग्य वेळीं चौकशी होऊन पुरुषाला—जाराला—फांशीची व त्या दुष्ट जारिणी स्त्रीला जन्मठेप काळे पाण्याची न्याय कोर्टातून शिक्षा मिळाली. ”

प्रियवाचक ! वरील अत्यंत निर्दय व नीच कृत्य त्या स्त्रीनें काय म्हणून केलें ? कोणाच्या आधीन झाल्या मुळें तिनें केलें ? विषयाच्या ! ती स्त्री विषयाधीन झाली व परपुरुषाच्या ठिकाणीं लंपट झाली त्याचाच हा परिणाम. तिला वाटत होतें कीं दुष्कृत्य आपण अंधारांत करीत आहोंत व या मुलाचा नाश केल्यानें तें आपणाला दडवितां येईल. पण तिची समजूत भ्रममूलक होती. विषयांध होऊन तिनें तें निंद्य कृत्य केलें. ‘ पाप आड्या वरुन

बोध मारतें ? अशी एक म्हण आहे ती सर्वथैव खरी आहे. तेव्हां या जगांत सर्वांनीं पाप कृत्या पासुन दूर रहावें.

स्त्रियांनीं ठेवावयाची सावधानता.

वरील दृष्टान्ता कडे लक्ष देऊन पुरुषा प्रमाणेंच दरेक स्त्रीनें पण हे ध्यानांत ठेवावें कीं आपल्या पति शिवाय परपुरुषाच्या ठिकाणीं कधींही दंग होऊं नये. आपल्या शीलाचें रक्षण करण्यासाठीं—ब्रह्मचर्याचें पालन करण्यासाठीं—कोणत्याही दुराचारी पुरुषाच्या फंदांत फसुं नये. कारण या संसारांत कित्येक वेषधारी असे फिरत असतात कीं मनुष्य देखील त्यांच्या वेषाला भुलून जाऊन त्यांच्या जाळ्यांत सापडतो; तेव्हां बिचाऱ्या भोळ्या बापड्या व चंचल स्त्रियांची गोष्टच कशाला ! ते वेषधारी ढोंगी स्त्रियांना युक्ती सारी फसवितात; त्यांचा वेश जरून संन्याशाचा अथवा साधूचा असतो पण त्यांची कृति आणि आचार अधमाच्या अधमतेहून देखील जास्त अधम असतात. ते गोड गोड बोलून सरळ अंतःकरणाच्या विधवांना आणि सधवांना आपल्या जाळ्यांत पकडून त्यांच्या जीवनाची खराबी करतात. त्यांना स्वर्गप्राप्तीचें खोटें आमिष दाखवून पापाचरण करण्याला लावतात. एके वेळीं एक वेषधारी साधु एका बाईला पाहून म्हणालाः—' बाई आज-काल मठांत तुम्ही कांहीं येतानां दिसत नाहीं ! साधु संतांचें दर्शन करण्याला देखील तुम्ही विसरलां वाटतें ! तुम्ही मठांत

आल्यास तुम्हाला ब्रह्मज्ञानाच्या दोन अक्षरांचे ज्ञान मिळेल. वास्तविक या वयांत आतां तुमच्यासाठीं संत समागमन उचित आहे. कारण ' राधा वल्लभ कृष्ण है । विधवा वल्लभ संत असें शास्त्रवचन आहे. तेव्हां वेळ मिळाला म्हणजे मठांत जरूर येत जा. ब्रह्मज्ञानाच्या कामासाठीं कसेंही करून वेळांत वेळ काढला पाहिजे. '

या वरील शास्त्रवचनाला वेषधारी दुरात्म्याची कुटिल नीति अथवा कपटजाळ म्हटलें तर त्यांत मुळींच वावगें होणार नाहीं. म्हणून विधवा अथवा सधवा सर्व स्त्रियांनीं असल्या धूर्त आणि मायावी वेषधारी कपटी लोकांच्या जाळांत फसूं नये म्हणून नेहमीं सावधगिरी ठेवावी; व त्या बरोबरच आपल्या शीलाचें रक्षण करावें. परपुरुषा समोर उभे राहूं नये. त्यांच्या दृष्टीशीं दृष्टि मिळवूं नये; परपुरुषा बरोबर एकांतात बसूं नये; तसेंच इकडे तिकडे भटकत पण राहूं नये. शिवाय मर्यादेचें उल्लंघन होईल अशा तऱ्हेचा वेष देखील धारण करूं नये; विचार करण्या सारखी गोष्ट आहे कीं प्रातःकाळीं ज्या पवित्र सतींचीं नांवें घेऊन आपण पवित्र होतो, त्यांचीं सती अथवा साध्वी म्हणून कशा मुळें गणना झाली ? दानानें ? तपानें ! भावानें ? परोपकारानें ? नाहीं मुळींच नाहीं. त्यांना सतीत्व पद प्राप्त झालें तें फक्त एकच गोष्टीनें—म्हणजे

शीलसंरक्षणानें, शीलसंपन्न, एतनेच अयपर्यंत. शीलाला मानणारी स्त्री केव्हांही दुःखी होत नाहीं. शिवाय सासुब सासरे यांची देखील तिजवर ममता असते. तिच्यावर सर्वजण प्रेम करितात. साध्वी स्त्री सर्व लोकांमध्ये पूज्य होते. स्त्री अथवा पुरुष दोघेही निद्रा पुनीत समजतात. त्यांत प्रथमें शीलवती स्त्री म्हणजे विनय, विवेक इत्यादि गुणांची सागर आहे असें समजतात. विशेष काय सांगावें ! सर्व सद्गुण त्या स्त्रीच्या ठिकाणीं येऊन वास करितात, व हेच सर्व कायां, वाचा, मनें करून त्या साध्वीच्या शीलाचें रक्षण करितात व शीलामें पोषण ही करितात. कदाचित वाचा आणि मन आपल्या ताब्यांत न राहिलें तर कायेनें तरी अवश्य अवश्य पाळलेंच पाहिजे. शरीरानें ब्रह्मचर्यव्रत पाळल्यास मग तो पुरुष असो किंवा स्त्री असो—त्यास देखील इहलोकीं सुख प्राप्त होऊन भवान्तरांत आधि व्याधि आणि उपाधि पासून तो अलग राहतो. सध्यां अनेक स्त्रिया वैरी कांहीं बालपणांत विधवा होतात, कांहीं जन्मभर पुत्रहीन म्हणून मनांत झिजवितात, कांहीं मेलेल्या मुलाला जन्म देतात असें आपण पाहतों. इत्यादि होण्यामें काय बरें कारण असावें ! कारण एवढेंच कीं पूर्वजन्मीं त्यांचा हातून त्यांच्या शीलाचें रक्षण झालें नसतें पाहिजे. या बाबतींत शास्त्रकार असें सांगतात कीं:—

आल्यास तुम्हाला ब्रह्मज्ञानाच्या दोन अक्षरांचें ज्ञान मिळेल; वास्तविक या वयांत आतां तुमच्यासाठीं संत समागमन उचित आहे. कारण ' राधा वल्लभ कृष्ण है । विधवा वल्लभ संत असें शास्त्रवचन आहे. तेव्हां वेळ मिळाला म्हणजे मठांत जरूर येत जा. ब्रह्मज्ञानाच्या कामासाठीं कसेंही करून वेळांत वेळ काढला पाहिजे. '

या वरील शास्त्रवचनाला वेषधारी दुरात्म्याची कुटिल नीति अथवा कपटजाळ म्हटलें तर त्यांत मुळींच वावगें होणार नाहीं. म्हणून विधवा अथवा सधवा सर्व स्त्रियांनीं असल्या धूर्त आणि मायावी वेषधारी कपटी लोकांच्या जाळ्यांत फसूं नये म्हणून नेहमीं सावधगिरी ठेवावी; व त्या बरोबरच आपल्या शीलाचें रक्षण करावें. परपुरुषा समोर उभें राहूं नये. त्यांच्या दृष्टीशीं दृष्टि मिळवूं नये; परपुरुषा बरोबर एकांतात बसूं नये; तसेंच इकडे तिकडे भटकत पण राहूं नये. शिवाय मर्यादेचें उल्लंघन होईल अशा तऱ्हेचा वेष देखील धारण करूं नये; विचार करण्या सारखी गोष्ट आहे कीं प्रातःकाळीं ज्या पवित्र सतींचीं नांवें घेऊन आपण पवित्र होतो, त्यांची सती अथवा साध्वी म्हणून कशा पुढें गणना झाली ? दानानें ! तपानें ! मायानें ! परोपकारानें ' नाहीं मुळींच नाहीं. त्यांना सतीत्व पद प्राप्त झालें तें फक्त एकच गोष्टीनें—म्हणजे

कष्ट सोसण्याचा प्रसंग आला पण जर ती धर्मबाह्य म्हणजे धर्मविरुद्ध नसली तर उचित आज्ञा मानावी. उलट जी आज्ञा सुगम व पाळण्यापासून एकप्रकारचा आनंद होतो, मनाची करमणूक होते पण तिच्या पालनाच्या योगानें धर्माचा लोप होतो तर ती आज्ञा अनुचित आज्ञा समजावी. अनुचित पति आज्ञाचें पालन न केल्यानें पतिव्रता धर्माचें पालन होत नाहीं असें मात्र मुळींच नाहीं. उचित आज्ञा पालन करण्यांत आपल्याला भयंकर कष्ट भोगावे लागले इतकेंच नाहीं पण ती आज्ञा पालन करण्यांत आपल्या प्राणावर जरी गदा येत असली तर त्या उचित पति आज्ञेचें जरूर पालन केलें पाहिजे. अशी एक आख्यायिका आहे कीं—एका स्त्रीला तिच्या पतीनें तिची परीक्षा करण्यासाठीं म्हणा किंवा इतर दुसऱ्या कारणानें म्हणा आज्ञा केली कीं—' या तो सर्प जात आहे त्याला किती दांत आहेत ते मोजून मला सांग.' त्या स्त्रीनें विचार केला कीं पतिची आज्ञा पालन करण्यांत कदाचित—फार झालें तर आपला प्राण जाईल पण धर्म हानि होण्याचा संभव नाहीं, तेव्हां आज्ञा ही पाळलीच पाहिजे. असा विचार करून ती त्या सर्पा जवळ गेली तोंच सर्प फूं करून तिच्या अंगावर आला. ती खाली वांकली आणि दचकून एकदम पाठीमागें सरली. सर्व सपाट्यानें निघून गेला. पण या सर्व घोटाळ्यांत त्या स्त्रीचा जन्माचा फायदा झाला. त्या स्त्रीची बरगडी एक जीर दुमडली असल्यामुळें ती आपणा पावेतों कुबडी

कुरंडरंडत्तणदूहगाई वज्झत्तनिंदुविसकन्नगाई ।
जम्मंतरे खंडिअसीलभावा नाऊण कुज्जा दढसीलभावं ॥

अर्थात—जन्मांतरांत-पूर्वजन्मीं-केलेल्या शीलभंगामुळें, कुरांडपण, बालवैधव्य, दुर्भाग्यादि वंध्यापण, मेलेल्या पुत्राला जन्म देणें आणि विष कन्यादि अवतार वाट्याला येतात. म्हणून सतीनें आपल्या सतित्वाचें म्हणजे शीलाचें रक्षण करावें.

पतिव्रता धर्म कशाला म्हणतात.

सर्व गुणांत महत्वाचा आणि उत्तम मानला जाणारा स्त्रियांमधील सद्गुण म्हणजे पतिव्रता धर्मच आहे. 'पति आज्ञेंत राहणें, पतीच्या सुख दुःखांत वांटेकरी होणें म्हणजे पति सुखी तर आपण सुखी व पति दुःखी तर आपण दुःखी ' हेंच पतिव्रता धर्माचें प्रधान लक्षण आहे. पतीनें देखील आपल्या स्त्रीला धर्म न्याय आणि नीति यांना धरूनच योग्य आज्ञा कराव्यात. अनुचित, अधर्मप्रवर्तक, अनीतिकारक अथवा अशाच तऱ्हेच्या अन्यायमूलक आज्ञा पतीनें आपल्या पत्नीला केव्हांही करूं नयेत. स्त्रीनें देखील आपल्या पतीच्या न्याय्य आणि उचित अशाच आज्ञांचें पालन करावयाचें आहे. अनुचित अतएव अन्यायी अथवा अनीतिमूलक आज्ञा पाळावयाच्या नाहींत. आतां येथें योग्य व अयोग्य आज्ञा कोणत्या याचें विवेचन केलें पाहिजे, पतीची आज्ञा वाटेल तेवढी कठीण असली, ती पाळण्यामाधीं प्राणांतिक

कष्ट सोसण्याचा प्रसंग आला पण जर ती धर्मबाह्य म्हणजे धर्मविरुद्ध नसली तर उचित आज्ञा मानावी. उलट जी आज्ञा सुगम व पाळण्यापासून एकप्रकारचा आनंद होतो, मनाची करमणूक होते पण तिच्या पालनाच्या योगानें धर्माचा लोप होतो तर ती आज्ञा अनुचित आज्ञा समजावी. अनुचित पति आज्ञाचें पालन न केल्यानें पतिव्रता धर्माचें पालन होत नाहीं असें मात्र मुळींच नाहीं. उचित आज्ञा पालन करण्यांत आपल्याला भयंकर कष्ट भोगावे लागले इतकेंच नाहीं पण ती आज्ञा पालन करण्यांत आपल्या प्राणावर जरी गदा येत असली तर त्या उचित पति आज्ञेचें जरूर पालन केलें पाहिजे. अशी एक आख्यायिका आहे कीं—एका स्त्रीला तिच्या पतीनें तिची परीक्षा करण्यासाठीं म्हणा किंवा इतर दुसऱ्या कारणानें म्हणा आज्ञा केली कीं—' या तो सर्प जात आहे त्याला किती दांत आहेत तें मोजून मला सांग. ' त्या स्त्रीनें विचार केला कीं पतिची आज्ञा पालन करण्यांत कदाचित्—कार झालें तर आपला प्राण जाईल पण धर्म हानि होण्याचा संभव नाहीं, तेव्हां आज्ञा ही पाळलीच पाहिजे. असा विचार करून ती त्या सर्पा जवळ गेली तोंच सर्प फूं करून तिच्या अंगावर आला. ती स्त्री भ्याली आणि दचकून एकदम पाठीमागें सरली. सर्प सपाट्यानें निघून गेला. पण या सर्व घोटाळ्यांत त्या स्त्रीचा जन्माचा फायदा झाला. त्या स्त्रीची परगाठीतील एक शीर दुमटली असल्यामुळें ती आतां पावेतों कुबरी

fully thirty years of age and then only for purpose of having a child, which shall from heaven and ready to become one of inmates of the kingdom of heaven by born again."

"हें बीं (वीर्य) हाडांना मज्जा समान आहे, खोराक आहे, सांध्याचें तेल आहे, श्वासोश्वासाला गोडी माधुर्य आणतें. जर तुम्ही मनुष्य असाल तर आपल्या तीस वर्षां पावेतों या पदार्थाचा (वीर्याचा) एक गमावूं नका व तदनंतरही जर तुम्हाला वीर्याचा वयाचा असेल—जर तें वापरावयाचें असेल—तर फक्त स्तवच वापरा. अशा तऱ्हेनें वीर्याचा उपयोग केल्यानें कृपाप्रसादानें जें पुत्ररत्न तुम्हाला लाभेल तें प्रथम स्वर्गीतच राहील असें होईल. (धन्वंतरीचा जून, जुलै सन १९१८ चा अंक पृ. २१०)

आपले पुर्वीचे ऋषि, महात्मे आपल्या मनाला अध्यात्मिक विषयांत बरेच पुढें जात व शेवटीं ज्ञानी—आत्मिक ज्ञान संपादन करणारे—होत हें कोणाच्या वीर्यरक्षणानें. कारण वीर्याच्या ठिकाणीं जी अद्भुत तिचाच हा प्रभाव. वीर्यासारख्या उत्तम आणि पदार्थाचा दुरुपयोग करणारा अथवा त्याचा वाईट

निरर्थक व्यय करणारा इसम खरोखर केवढा मूर्ख असला पाहिजे हें बुद्धिमान मनुष्य सहज समजूं शकतात. या पदार्थाचा-वीर्याचा व्यय होऊं न देणें, अथवा या पदार्थाचें रक्षण-करणें याचेंच नांव "ब्रह्मचर्य," व हें या पूर्वीच स्पष्टपणें अनेकदां सांगण्यांत आलें आहे.

मनुष्य आपल्या जवळील लक्ष्मी—हिरा, मोती, माणीक, सोनें, पैसा वगैरे—नाहींशी होऊं नये म्हणून किती सावधगिरी ठेवतो, तिचें किती काळजीपूर्वक जतन करितो, तिच्या पासून एक क्षण देखील तो दूर राहत नाहीं, तशीच वेळ आल्यास तिच्या जवळ दुसरा रक्षक ठेवतो, या त्याच्या कृतीकडे पाहतां सखेदाश्चर्य वाटल्या शिवाय राहत नाहीं. समजा कीं एका इसमाजवळ एक पंचवीस हजाराच्या किंमतीचा एक हिरा आहे. हा हिरा त्यानें एका पाकीटांत ठेवला. पाकीट जाकीटाच्या आंतील खिशांत ठेऊन मग त्यानें खिशाचें तोंड शिवून घेतलें. जाकीटावर कोटही घातला व कोटावरून थंडी वाजूं नये म्हणून अथवा कपड्याचा लोकांना भपका दाखवावा म्हणून अथवा जाकीटांतील हीऱ्याचें रक्षण व्हावें म्हणून एक दुशाला अथवा घावळी पांघरली, अशा थाट माटांत एक इसम मल्ल चाळणाऱ्या व जिची वेगाविषयीं खात्री आहे अशा ईस्ट .. आगगाडींत दुसऱ्या वर्गाचा रीझर्व डबा करून .

fully thirty years of age and then only for the purpose of having a child, which shall be blessed from heaven and ready to become one of the inmates of the kingdom of heaven by being born again."

"हे वीर्य (वीर्य) हाडांना मज्जा समान आहे, मेंदूचा खोराक आहे, डोळ्यांचें तेज आहे, श्वासोच्छ्वासाला गोडी भाषा माधुर्य आणते. जर तुम्ही मनुष्य असाल तर आपल्या वयाच्या तीस वर्षां पावेतों या पदार्थाचा (वीर्याचा) एक थेंब देखील गमावूं नका व तदनंतरही जर तुम्हाला वीर्याचा उपयोग करा-वयाचा असेल—तर ते वापरावयाचें असेल—तर फक्त पुत्रप्राप्ती-साठच वापरा. अशा तऱ्हेनें वीर्याचा उपयोग केल्यानें परमेश्वराच्या कृपाप्रसादानें जें पुत्ररत्न तुम्हाला लाभेल तें पुढील जन्मी स्वर्गांतच राहील असें होईल. (धन्वंतरीचा जून, जुलै व आगष्ट सन १९१८ चा अंक पृ. २१०)

आपले पूर्वज ऋषि, महात्मे आपल्या मनाच्या विशुद्ध आध्यात्मिक विचार करून पूर्ण ज्ञान व शेवटी ज्ञानी—योगी अध्यात्मिक ज्ञान मिळवून ब्रह्मज्ञानी—होत हे कोणाच्या प्रतापानें! ब्रह्मचर्यानें. कारण वीर्याच्या ठिकाणी ही अद्भुत शक्ति आहे निःसंशय हे समजा. वीर्याचा उत्तम आणि सर्वोत्कृष्ट कार्यांत उपयोग करावा अथवा त्याचा वाईट मार्गानें नाश

निरर्थक व्यय करणारा इसम सरोगर केवळ मूर्ख झाला पाहिजे हें बुद्धिमान मनुष्य सहज समजूं शकतात. या पदार्थाचा-वीर्याचा व्यय होऊं न देणें, अथवा या पदार्थाचें रक्षण-करणें यालाच नांव " ब्रह्मचर्य, " व हें या पूर्वीच स्पष्टपणें अनेकदां सांगण्यांत आलें आहे.

मनुष्य आपल्या नवळील लक्ष्मी—हिरा, मोती, माणीक, सोनें, पैसा वगैरे—नाहींशी होऊं नये म्हणून किती सावधपणा ठेवतो, तिचें किती काळजीपूर्वक जतन करितो, तिच्या पासून एक क्षण देखील तो दूर राहत नाहीं, तशीच वेळ आल्यास तिच्या जवळ दुसरा रक्षक ठेवतो, या त्याच्या कृतीकडे पाहतां सखेदाश्चर्य वाटल्या शिवाय राहत नाहीं. समजा कीं एका इसमाजवळ एक पंचवीस हजाराच्या किंमतीचा एक हिरा आहे. हा हिरा त्यानें एका पाकीटांत ठेवला. पाकीट जाकीटाच्या आंतील खिशांत ठेऊन मग त्यानें खिशाचें तोंड शिवून घेतलें. जाकीटावर कोटही घातला व कोटावरून थंडी वाजूं नये म्हणून अथवा कपड्याचा लोकांना मपका दाखवावा म्हणून अथवा जाकीटांतील हीऱ्याचें रक्षण व्हावें म्हणून एक दुशाला अथवा धाबळी पांघरली, अशा थाट मारांत एक इसम मल्द चालणाऱ्या व जिची वेगाविषयीं खात्री आहे अशा ईस्ट इंडिया कंपनीच्या आगगाडींत दुसऱ्या वर्गाचा रीझर्व डबा करून त्यांत बसलेला

आहे. या शिवाय इव्यांत त्याच्या कुटुंबांतील माणसां शिवाय दुसरा कोणीही इसम नाहीं. अशा स्थितींत त्या इसमाचा थोडा डोळा लागावयाला लागतांच तो चटदिशी आपल्या खिशावर हात ठेविता. केवढी वरें ही हुशारी अथवा सावधानता. चंचल लक्ष्मीच्या संरक्षणासाठीं केवढी मोठी चपळ दक्षता ! लोकांवर पाहिलें तर कोणीही आलें नाहीं, गाडी कोठेंही उभी राहिली नाहीं, इव्यांत स्वतःच्या माणसा शिवाय तिसरें कोणीही नाहीं, असें असून देखील स्वतःचा हात अचूक व अचानक खिशावर. कारण हिरा कोणी नेऊं नये. हिरे, मोतीं, माणीक वगैरेंच्या संरक्षणासाठीं जेव्हां मनुष्य इतकी दक्षता ठेवतो तेव्हां ज्या वीर्यावर मनुष्याचें सर्व जीवन अवलंबून त्या वीर्याच्या रक्षणासाठीं त्यानें किती काळजी ठेविली पाहिजे. पण तसें न होतां उलट मनुष्ये वीर्यरक्षणाची मुळींच पर्वा करीत नाहींत व वीर्यसंपातच–वीर्यपात होण्याचे वेळीं–एक प्रकारचें सुख मानतात. तेव्हां त्यांची ही एक प्रकारची भयंकर भूल अथवा थोड्या एवढी चूक नाहीं तर काय ! विषय सेवनाच्या वेळेचें–वीर्यपात होण्याचे वेळचें–सुख हें कुत्रा हाडकाला फोडफोडून खातो व त्यांत तो जें सुख मानतो त्या प्रकारचें सुख आहे. हाडकाला फोडतांना कुत्र्याच्या दातांतून रक्त निघत असतें तरी तो त्यांत सुख मानतो कारण त्याच्याच दांतांतील रक्ताचा त्याला स्वाद मिळतो. तद्वतच कामी पुरुष जेव्हां कामज्वरानें पीडित होतो–काम ज्वराच्या तडाक्यांत

स्त्रीसंगी–मैथुनी आपल्या मनाच्या परिश्रमानें तयार केलेल्या वी-र्याच्या पतनाला तो सुखाचें कारण समजतो. वस्तुतः वीर्यक्षया पासून सुख मिळतें ही भावनाच चुकीची आहे. हें सुख नाहीं पण दुःखाची पूर्ति आहे. ज्या मनुष्याला कामज्वराची पीडा होत नाहीं व जो नेहमीं ज्ञान, ध्यान, तप, जप, परोपकार आणि आत्मतत्त्व यांत रममाण झालेला असतो, तो मनुष्य ज्या सुखाचा अनुभव घेतो तेच खरें आणि वास्तविक–खरें–सुख होय. हाताला फोड आला, त्यांत पू झाला, वेदना असह्य होऊं लागल्या तेव्हां डाक्टरनें येऊन तो फोड चिरला व त्यांतील पू-रक्त–बाहेर काढला. पू बाहेर काढतांच रोग्याला त्या क्षणाला बरें वाटलें व तो म्हणाला–'हा ! हा ! हा !—किती तरी बरें वाटतें म्हणून सांगूं. या वेळेचें सुख खरोखर अलौकिक आहे. डाक्टर साहेबांच्या कुशलतेची धन्य आहे.' ज्याला फोड झालेला नाहीं त्याला हा! हा! हूं! करण्याचा अथवा हा! हा! हा! करण्याचा कधीं प्रसंग तरी येईल काय ! कदापि नाहीं. तेव्हां आतां असेंच म्हणावें लागतें कीं कामी पुरुष ज्या वेदनांनीं पीडित होत होता त्या वेदनांचा अंत झाला व याला तो सुख मानतो. पण आपण जें वीर्यपतनांत अनुभवतों अथवा मानतों तें सुख नाहीं पण ती दुःखाची पूर्ति आहे. खरें सुख तर निष्कामी पुरुषच अनुभवितात. अशा निष्कामी अवस्थेंत म्हणजे ब्रह्मचर्यावस्थेंत राहून मनुष्यांनीं वास्तविक म्हणजे खऱ्या सुखाचा आनंद लुटला पाहिजे इतकेंच

नाहीं तर त्या गुणाला अनुप येणें व त्या स्थितींत राहणें यांतच मनुष्य जीवनाची खरी सार्थकता आहे.

ब्रह्मचर्याचा महिमा.

ब्रह्मचर्याच्या वर्णनांत जितकें लिहावें तितकें थोडेंच आहे. धार्मिक ग्रंथ, वैद्यकीय ग्रंथ तसेंच मानसशास्त्रा वरील ग्रंथामधून ठिकठिकाणीं ब्रह्मचर्याविषयीं पुष्कळच प्रमाणबद्ध चर्चा केलेली आहे व ब्रह्मचर्याचें महत्व निदर्शनास आणून दिलेलें आहे. वरील ग्रंथांतून दिलेले आधार, श्लोक आणि वाक्यें हीं काढून तींजर एका ग्रंथांत एका ठिकाणीं करण्याचें मनांत आणलें तर महाभारता एवढा एक प्रचंड ग्रंथ होईल. व तसें करण्याच्या भरीस पडलों तर हे लहानसें पुस्तक लिहण्याचा जो उद्देश आहे, तो सिद्धीस जाणार नाहीं. म्हणून ब्रह्मचर्याचा थोडा महिमा वर्णन करून या पुस्तकाला पूर्ण करण्यांत येईल.

या ब्रह्मचर्याचा अर्थात् शीलाचा महिमा दाखवितानां शास्त्र कारांनीं असें म्हटलें आहे कीं:—

शीलं प्राणभृतां कुलोदयकरं शीलं वपुर्भूषणं
शीलं शौचकरं विपद्भयहरं दौर्गत्यदुःखापहम् ॥
शीलं दुर्भगतादिकन्ददहनं चिन्तामणिः प्रार्थिते
व्याघ्रव्यालजलानलादिशमनं स्वर्गापवर्गप्रदम् ॥१॥

अर्थात्–शील मनुष्याच्या कुळाचा उदय करणारें आहे, शील शरीराचें भूषण आहे, शील पवित्र करणारें आहे, शील आपत्तींचें हरण करणारें आहे, शील दुर्गतीच्या दुःखाचें नाशक आहे आणि दौर्भाग्य आदिरूप कंदांना मूळपासुन जाळणारें शीलच आहे. आपल्या इच्छा पुरविण्याला शील म्हणजे खरोखर चिंतामणी रत्ना प्रमाणें आहे इतकेंच नाहीं परंतु शील वाघ, सर्प, पाणी अग्नि इत्यादिकांच्या उपद्रवा पासुन रक्षण करणारें आहे, त्यांना तें सहज शांत करणारे आहे. या शिवाय शील हें स्वर्ग आणि मुक्तीला देणारें आहे.

दूरवर विचार करून पाहिलें तर एका ब्रह्मचर्य धर्मापासून सर्व धर्मांची प्राप्ति होऊं शकते. महर्षी नारदाचें नांव कोणाला ठाऊक नाहीं ! कलह प्रिय, क्लेश प्रिय, एकमेकांचें तंटे लावणारे द्रौपदी सारख्या महासतीचें हरण करावयाला लावणार, सती द्रौपदीच्या ब्रह्मचर्या विषयीं, पवित्रते विषयीं लोकांच्या मनांत शंका येतील अशा तऱ्हेच्या वचनांचा प्रयोग करणारे, अपरोक्ष निन्दा करणारे, आणि हजारो मनुष्याच्या संहाराला कारणीभुत होणारे या त्यांच्या गुणावरून सर्वजण नारद महर्षींना ओळखतात. असें असून देखील महर्षी नारदांना महापुरुषांच्या पंक्तींत बसविलेले आहे व त्यांना " मुक्ति गामी " असें म्हणतात. हें सर्व केवळ त्यांच्या शुद्ध ब्रह्मचर्याच्याच मतापानें. यांचा

चर्या शिवाय दुसरें कोणतेंच कारण नाहीं. अशा ब्रह्मचर्याची तारीफ करावी तेवढी थोडीच. तत्वज्ञानी असें सांगतात कीं:—

तुर्यं ब्रह्ममतं नाम परब्रह्मकारणम् ।
शौचानां परमं शौचं तपसां च परं तपः ॥ २ ॥

अर्थात्–चौथें मत ब्रह्मचर्य हें होय. तें मोक्षाचें कारण आहे. शौचामध्यें उत्कृष्ट शौच आहे आणि तपा मध्यें उत्तम तप आहे.

जैन सिद्धांतांत देखील असें सांगितलें आहे कीं:—

तवेसु वा उत्तमबंभचेरं ।

सर्व प्रकारच्या तपा मध्यें उत्तम तप ब्रह्मचर्य आहे ! साधु असो वा तपस्वी असो जर त्याच्या ठिकाणीं ब्रह्मचर्य नाहीं तर त्या साधूच्या ठिकाणीं तपस्वीपणा नाहीं. त्याचें ज्ञान, क्रियाकांड हें सर्व मारभूतच आहेत. म्हणून ब्रह्मचर्याचें तर दरेकानें पालन केलेंच पाहिजे. या ब्रह्मचर्याच्या बाबतींत वर दाखविण्यांत आलेंच आहे कीं त्याचा इतका मोठा प्रताप आहे कीं वाटेल त्या भयंकर आपत्ती मधून मग ती जला पासून असो वा अग्नि पासून असो अथवा इतर पंच महाभूता पासून असो अथवा कोणी त्यावर आणली असो, ब्रह्मचर्य आपणाला वाचवितें. या ठिकाणीं एका स्त्रीनें आपल्या ब्रह्मचर्याच्या पवित्रतेच्या प्रतापानें आपल्या पतीला दाखविलेल्या चमत्काराच्या एका अलौकिक दृष्टांताचें आपण निरीक्षण करूं:—

" एक मनुष्य आपल्या स्त्रीला घरीं एकटी ठेऊन परदेशीं गेला. स्त्री पतिव्रता धर्म पाळनांत-ब्रह्मचर्याच्या पाळनांत इतकी दृढ होती कीं तिनें स्वप्नांत देखील पर पुरुषाची ईच्छा केली नव्हती. दोन वर्षां नंतर जेव्हां तिचा पति परदेशाहून घरीं परत आला तेव्हां पतीला चांगलें स्नान वगैरे घालून तिनें पतीला उत्तमोत्तम भोजन घातलें. भोजनानंतीं पानसुपारी दिली. नंतर पतीला थोडीशी विश्रांति मिळावी म्हणून ती म्हणाली-' आपण माझ्या मांडीवर डोके ठेऊन थोडा वेळ विश्रान्ति घ्यावी. ' पतीनें त्या प्रमाणें विश्रांति घेण्याला सुरवात केली व पति निद्रस्थ झाला; या वेळीं त्या घरांत ती स्त्री, तिचा पति व तिचें अर्दीच वर्षांचें बालक या शिवाय दुसरे कोणी ही नव्हते. बालक अंगणांत खेळावयाला लागलें. खेळतां खेळतां तें बालक अंगणांतील अग्नि-कुंडा जवळ गेलें. (हें अग्निकुंड कांहीं कारणामुळें त्या स्त्रीच्या घराच्या अंगणांत केलें होतें. त्या स्त्रीनें आपल्या मुलानें अग्नी च्या कुंडा पासून दूर राहण्या विषयीं हातानें पुष्कळ खुणा केल्या; परंतु तें बालक दूर सरलें नाहीं व शेवटीं धगधगणाऱ्या अग्नीच्या कुंडांत जाऊन पडलें. जेव्हां आपला मुलगा कुंडाच्या इतका जवळ गेला हें तिनें पाहिलें तेव्हां हा कुंडांत अग्नीनें पडेल असें जरी त्या स्त्रीला वाटलें होतें तरी या वेळीं मी उठलें किंवा बोलले तर पतीच्या निद्रेचा भंग होईल या भावनेनें-असा भयानें-तिनें हातानें खुणा करण्यां शिवाय कांहीं केलें नाहीं,

याचा असा परिणाम झाला कीं तें बालक धगधगणाऱ्या अग्नि-कुंडांत जाऊन पडलें.

सुमारें अर्धातासानंतर त्या स्त्रीचा पति जागा झाला. जागा झाल्यानंतर त्यानें पाणी मागवून तोंड धुवून साफ केलें व झोंपेची असर नाहींशी केली. एकदोन इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्या नंतर लागलीच त्यानें विचारलें—बाळ कोठें गेला ? स्त्री थोडावेळ घाबेली तर स्तब्धच राहिली. तिला काय सांगावें हेंच सुचेना. पण लागलीच तिनें हळूंच सांगितलें–' महाराज ! बाळ त्या पलीकडच्या अग्निकुंडांत पडला आहे. ' पतीनें रागानें विचारलें तो अग्निकुंडांत पडत आहे हें तुला माहित होतें ना ! स्त्रीनें नम्रतेनें उत्तर दिलें–" होय. ' लागलीच पतीनें कर्कश स्वरानें विचारलें " मग तूं त्याला कां वाचविलें नाहींस ? " स्त्रीनें उत्तर दिलें " महाराज मी त्याला वाचविणें कसें शक्य होतें ? मी जर उठलें असतें अथवा आवाज केला असता तर आपल्या निद्रेचा भंग झाला असता. ' पतीनें लागलींच टोमणा दिला व म्हटलें मेवढी पतिव्रता ! कीं पतीच्या निद्रेचा भंग होईल या भयानें मुलगा गमावला ! ! मला वाटतें तुझ्या सारख्या दहा पांच वेड्या दुनि-यन सांपडतील कीं नाहीं ही शंकाच आहे. ' स्त्री म्हणाली:– महाराज ! पतिव्रता धर्माचा भंग करण्यापेक्षां बालक गमविणें मला जास्त उचित वाटलें. ' पत्नीच्या पतिव्रता

धर्माच्या या वेडगळ समजुतीनें पती पत्नीवर खूप रागावला त्या रागाच्या भरांत त्यानें पांच-पंचवीस × × × × ही दील्या. या सरस्वीचा (?) प्रसाद त्या स्त्रीनें शांतपणें ग्रहण केला व ती समभावपूर्वक शान्तच राहिली. नंतर दोघेही जण उठले व कुंडा-पाशीं जाऊन पाहतात तो त्या कुंडांत अग्निनारायणाचें नांव देखील नसून तें कुंड पाण्यानें भरलें होतें व त्या पाण्यांत तें बालक आनंदानें विहार करीत होतें. त्या कुंडांत त्या बालकाला उड्या मारतांना पाहून दोघेही स्तब्ध झाले. त्यांत देखील त्या पुरुषाला फारच आश्चर्य वाटलें. आपल्या पत्नीस आपण सरस्वती देवीचा उगाच प्रसाद दिला या बद्दल त्याला फार पश्चाताप झाला. हळूं हळू विचारांनी त्याची खात्री झाली कीं हा सर्व साध्या स्त्रीच्या पतिव्रता धर्माचा प्रभाव आहे. अग्नीचें पाणी होण्याला पतिव्रता धर्माच्या प्रभावा शिवाय दुसरें कांहींच कारण नाहीं. धन्य आहे या शीलवती प्रमदांची कीं ज्यांच्या शीलाच्या प्रतापावर आज दुनिया चालली आहे. " अग्नीचें पाणी " हा केवढा मोठा पतिव्रता धर्माचा प्रभाव ! !

वरील प्रकारचे-पातिव्रत्याच्या महिम्याचे अनेक दृष्टान्त शास्त्रग्रंथांतून सापडतात. परंतु ते सर्व दृष्टान्त देऊन पुस्तकाची पानें भरून काढण्याची व पुस्तक वाढविण्याची अवश्यकता नाहीं. दिलेल्या थोड्या दृष्टान्तावर जर मनुष्यानें लक्ष पूर्वक विचार केला

तरी पुष्कळ आहे. वरील श्री प्रमाणेंच सती सीतादेवीला, पण दाखला लोकांना माहित नाहीं असें योडेंच आहे. सीते सारखी महासती रावणासारख्या दुराचारी पुरुषाच्या हातांत सांपडली असून सुद्धां तिनें आपल्या शीलाचें—पातिव्रत्याचें—अथवा ब्रह्मचर्याचें मोठ्या धैर्यानें कसें उत्तम प्रकारें रक्षण केलें याची कथा अत्यंत मनोरंजक आहे.

ऐश्वर्यराजराजोऽपि रूपमीनध्वजोऽपि च ।
सीतया रावण इव त्याज्यो नार्या नरः परः ॥

ऐश्वर्यांत राजराजेश्वर आणि रूपांत कामदेवा समान असा रावणाचा ज्याप्रमाणें सती सीतादेवीनें त्याग केला त्याचप्रमाणें अन्य स्त्रियांनीं पर पुरुषाचा त्याग केला पाहिजे.

सीते सारख्या एका अबलेनें रावणासारख्या एका सकल—सर्व सत्ताधारी—पुरुषाच्या हातांत सांपडून देखील आपल्या ब्रह्मचर्याचें अखंड पालन केलें हें आश्चर्य होय. खरोखरीच रावणाचा वध केल्यानंतर लौकिक व्यवहारानुरूप रामचंद्राला देखील शंका आली कीं रावणासारख्या जबरदस्त आणि परस्त्री अभिलाषी माणसाच्या घरीं इतकीं वर्षे राहिलेली सीता इनें आपलें शील—पातिव्रत्य—कायम ठेवलें असेल काय !—रामचंद्राच्या या शंकेचें निरसन करण्यासाठीं सती सीता देवीनें एक अग्निकुंड तयार करविलें व देव, दानव, यक्ष आणि राक्षस या सर्वांसमक्ष खालील श्लोक म्हणत तिनें अग्निकुंडांत प्रवेश केला:—

मनसि वचसि काये जागरे स्वप्नमध्ये
यदि मम पतिभावो राघवादन्यपुंसि ।
तदिह दह शरीरं पावकं पावकेदं
सुकृतविकृतभाजां येन लोकैकसाक्षः ॥ १ ॥

अर्थात्–' हे अग्नि! माझें मन, वचन आणि काया यांमध्यें जागृतावस्थेंत किंवा स्वप्नावस्थेंत, रामचंद्राला सोडून दुसऱ्या पुरुषाच्या ठिकाणीं माझा पतिभाव झाला असता तर माझ्या या पापी शरीराला जाळून भस्म कर! कारण प्राण्याच्या सुकृत आणि दुष्कृतांचा तूं साक्षी आहेस!'

महासती सीतादेवीनें अग्निकुंडांत उडी टाकली पण सत्याचा हमेशां जयच होत असतो. मन, वचन आणि काया यांनीं पाळलेल्या ब्रह्मचर्याचा प्रभाव दूर नसतो. सतींच्या सतीत्वाच्या उज्वल कीर्तीवर डाग कदापि लागणें शक्य नाहीं. सीतादेवी अग्नीच्या कुंडांत पडतां क्षणींच अग्नीनें जलरूप धारण केलें, तेव्हां लोकांनीं जयजयकार केला व दरेक सीतादेवीच्या शीलाची–पातिव्रत्याची अथवा ब्रह्मचर्याची मुक्तकंठानें प्रशंसा करूं लागला. शीलवतीच्या ब्रह्मचर्याच्या प्रभावाचें आपण वर्णन तरी काय करूं शकणार! ज्या स्थूलभद्राचें चौऱ्याशी चोवीशी पर्यंत–हें युग संपे पर्यंत–नांव अमर राहणार असें जैन शास्त्रकार उद्घोषणा पूर्वक सांगतात तें देखील स्थूलभद्र यांनीं पाळलेल्या ब्रह्मचर्याच्या प्रभावानेंच. याच प्रमाणें ब्रह्मचर्यव्रताचें पालन करणाऱ्या विजयशेट व

विजयाराणी विषयीं पण असें सांगतात कीं चौऱ्यांशी हजार मुनींना दान देणें आणि एकवेळ विजयशेट व विजयाराणी यांना भोजन घालणें या दोहोंचें पुण्य सारखेंच. हा देखील एक ब्रह्मचर्याचाच प्रताप आहे. ब्रह्मचर्याच्या प्रतापा शिवाय यांत दुसरें काय आहे ? कांहींच नाहीं.

खरी गोष्ट अशी आहे कीं, जो ब्रह्मचारी आहे त्याला सदासर्वदां जयच मिळतो. ज्या घरांत ब्रह्मचारी वास करीत असेल तें घर सुखी. ज्या कुटुंबात ब्रह्मचर्य विद्यमान असेल तें कुटुंब सुखी; व ज्या देशांत ब्रह्मचर्य ओतप्रोत भरलें असेल त्या देशांत दारिद्र्याचें नांव देखील घ्यावयाला नको. जास्त काय सांगावें ! जीवनाचें मुख्य औषध, उन्नतीचें मूळ कारण, व्रतांच्या रक्षणाचें चिलखत, लक्ष्मी, माल मिळकत, वगैरे संपत्ति, आणि शेवटीं परमब्रह्म—मोक्षाचें कारण अथवा साधन देखील ब्रह्मचर्यच आहे. असा हा ब्रह्मचर्याचा महिमा आहे.

एक ब्रह्मचर्य नाहीं म्हणजे कांहींच नाहीं. म्हणून प्रत्येकानें ब्रह्मचर्यव्रताचें पालन करावें व परम सुखाची प्राप्ति करून घ्यावी अशी रहान मोठ्या सर्वांना नम्रतापूर्वक विनंति करण्यांत येत आहे.

